# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १०/०४/२००८.**

**प्रकरण क्र. ०१ :- दि. २०/०२/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. 01 :-

दि. २०/०२/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :-

अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

2

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १०/०४/२००८

<u>प्रकरण क्र. ०२ :- मा. महासभा दि. १८/०३/२००८ ठराव क्र. ३२ प्रमाणे महिला व बालकल्याण समिती गठीत करण्याबाबत.</u>

~~मा. महासभा दि. १७/१०/२००७ ठराव क्र. ०५ अन्वये गठीत केलेल्या महिला व बालकल्याण समितीची सदस्य संख्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्रक्र. मिभामनपा ११०७/१६३७/प्र.क्र.३६३/०७/नवि- २८ दि. १४/११/२००८ रोजीच्या पत्रान्वये ९ (नऊ) निश्चित करुन महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.~~

<u>ठराव :-</u> ०२

मा. महासभा दि. १७/१०/२००८ ठराव क्र. ५ अन्वये गठीत करावयाच्या महिला व बालकल्याण समितीची सदस्य संख्या २१ केल्याचा ठराव पारित करण्यांत आला होता. मा. महापौरांनी आयुक्तांच्या मार्फत शासनाकडून सदर ठराव चुकीचा असल्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा असे पत्र क्र. १) मनपा/आयुक्त/१६३/२००७-०८ दि. ०५/११/२००७ अन्वये कळविले होते.

वरील पत्रानुसार मा. कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांनी पत्र क्र. मिभामनपा-११०७/१६३७/प्र.क्र. ३६३/०७/नवि- २८ दि. १४/११/२००७ अन्वये सदर समितीची संख्या ९ गृहित धरणे योग्य होईल अशा सुचना देऊन व सदस्य संख्या २१ करावयाची असल्यास सभा कामकाज नियमामध्ये बदल करण्याची कार्यवाही करावी लागेल असे कळविले होते. त्यानुसार महानगरपालिकेने सदस्या संख्या २१ करणेबाबत दि. १२/०३/२००८ रोजी लोकमत व सुरजप्रकाश या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

परंतू वरील ठरावावर व संयुक्त लोकशाही आघाडीने कायद्याच्या तरतुदी उपसचिव नगरविकास विभाग यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांनी पत्र क्र. मिभामनपा/ ११०७/१६३७/प्र.क्र.३६३/०७/नवि- २८ दि. १३/०३/२००८ अन्वये त्याचे समक्रमांकाचे पत्र दि. १४/११/२००७ च्या पत्रामधील सूचना रद्द करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (७) नुसार कार्यवाही करु शकते असे कळविले आहे.

दि. १३/०३/२००८ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका / १९४९ चे कलम ३० (१ अ) व ३० (७) अन्वये महिला व बालकल्याण समितीची सदस्य संख्या एकूण २१ (एकविस) करणारा महासभा दि. १७/१०/२००७ चा ठराव क्र. ०५ बहुमताने मंजूर झाला असून तो कायम करण्यांत येऊन पक्षीय (तौलनिक) संख्याबळानुसार सदस्यांची नियुक्ती करण्यांत येत आहे असा ठराव मांडत आहे.

सोबत संयुक्त लोकशाही आघाडीचे सदस्यांची यादी जोडली आहे

सुचक :- [signature]

अनुमोदक :- [signature]

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

ड. शफीक अहमद सादत खान
बी.ए.एल.एल.बी.
**नगरसेवक**
ौद / गटनेता - संयुक्त लोकशाही आघाडी
स्थायी समिती सदस्य
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

नशेमन को. ऑप. हा. सोसायटी लि., फ्लॅट नं. 41, प्लॉट नं. 52, नया नगर, स्टेशन रोड, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे - 401 107.
दूरध्वनी (निवास) : 2811 0336 कार्यालय : 2855 4173 मोबाईल : 9322668845/20642821.

वक क्र.______________ दिनांक : १०/४/०८

प्रति
सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महिला व बालकल्याण समितीमध्ये नेमणूक करावयाच्या महिला सदस्यांची नावे खालीलप्रमाणे कळवित आहे.

१) सौ. भानु जी. गोहिल
२) सौ. उमा इनाम पाटील
३) सौ. पुष्पा वासुदेव व्यास
४) सौ. नयना गजानन म्हात्रे
५) सौ. निर्मला बाबुराव सावळे
६) सौ. सुनिता शालिग्राम मोर्डे
७) सौ. शेख मुमताजबानु इब्राहिम
८) सौ. रापाट उमा विश्वनाथ
९) सौ. ~~[illegible] [illegible]~~ वेणी विजया हेमचंद्र
१०) सौ. मालती प्रेरणा प्रमोद
११) सौ. डिसा मार्लिन नर्मिन

(श्री. शफीक अहमद सादत खान)
गट नेता

दिनांक : 10-04-08

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- महिला बाल कल्याण समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ **(2)** नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे **25** इतके संख्याबळाच्या प्रमाणात आमच्या गटास, महिला बाल कल्याण समितीच्या **9** सदस्यांपैकी **3** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| 1 | सौ हेलन जॉर्जी गोविंद |
| 2 | सौ दिव्या अशोक तिवारी |
| 3 | सौ वर्षा गिरधर भानूशाली |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे त्यांचे आपण नामनिर्देशन करून महिला बाल कल्याण समिती सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

दिनांक / /२००८

प्रति,
**मा. महापौर महोदय**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- महिला बालकल्याण समिती सदस्याकरीता संख्या बळानुसार सुचविलेली नावे.**

**महोदय,**

मी **अनंत पाटील,** शिवसेना या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या २००७ (सुधारित) नियमांतील प्रकरण ३ नियम ६ चे ३१ अ (२) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून आघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार शिवसेना पक्षाचे ५ इतके संख्या बळाच्या प्रमाणात आमच्या गटास महिला बालकल्याण समितीच्या ९ सदस्या पैकी १ सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नावे**

| अ.क्र | नांव |
|---|---|
| १ | सौ. मंदाकिनी आत्माराम गावंड |
| २ | |
| ३ | |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे त्याचे आपण नामनिर्देशन करुन महिला बालकल्याण समिती सदस्य म्हणून नांवे घोषीत करावीत, ही विनंती.

**सही**

अ.रा.पाटील

**अनंत रामचंद्र पाटील**
**(गटनेता)**

6

(५)

दिनांक १० / ४ / २००८

प्रति,
**मा. महापौर महोदय**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- महिला बालकल्याण समिती सदस्याकरीता संख्या बळानुसार सुचविलेली नावे.**

**महोदय,**

**मी ओमप्रकाश गाडोदीया,** बीजेपी या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या २००७ (सुधारित) नियमांतील प्रकरण ३ नियम ६ चे ३१ अ (२) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून आघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार बीजेपी पक्षाचे ९ संख्या बळाच्या प्रमाणात आमच्या गटास महिला बालकल्याण समितीच्या ९ सदस्या पैकी १ सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणे.

नामनिर्देशित सदस्यांची नावे

| अ.क्र | नांव |
|---|---|
| १ | सौ. सिसिलिया विजय वाविघर |
| २ | |
| ३ | |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे त्याचे आपण नामनिर्देशन करुन महिला बालकल्याण समिती सदस्य म्हणून नांवे घोषीत करावीत, ही विनंती.

सही

Omprakash G Gadodia

ओमप्रकाश गाडोदीया
(गटनेता)

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१०/०४/२००८ ⑨

प्रकरण क्र. ०३ :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) बाबत.

ठराव क्र. ०३ :-

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्कच्या नव्याने जागा उपलब्ध करणेकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्यात आले होते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४३ (अ) अन्वये पे ॲन्ड पार्कवरती (वाहनतळावरती) नियंत्रण करण्याची तरतूद आहे.

जाहिरात विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अहवालानुसार खालीलप्रमाणे पे ॲन्ड पार्कच्या जागा (स्थळ) जुन्या दोन व नविन चार अशा सहा जागा प्रस्तावित आहेत.

(अ) पे ॲन्ड पार्कच्या (वाहनतळाच्या) जागा

| अ.क्र | झोन क्र. | स्थळ | सध्याची स्थिती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | १ | मिरा रोड रेल्वे स्टेशन जवळ आरक्षण क्र.१८४. | चालू आहे. |
| २ | २ | मिरा रोड, शांतीस्टार शॉपिंग सेंटर समोर, रिक्क्षा स्टॅन्ड ते मच्छी मार्केटनाका, पुनमसागर रोड, मिरा रोड (पु) गटाराच्या स्लॅबवर. | नविन प्रस्ताव |
| ३ | ३ | शांतीसागर हॉटेलच्या उजव्या बाजूच्या रोडवर, मिरा रोड स्टेशन (शांतीसागर हॉटेलच्या बाजूने) | नविन प्रस्ताव |
| ४ | ४ | जेसल पार्क,शिवसेना कार्यालयाकडून रेल्वे ट्रॅकच्या बाजूनी चौपाटीकडे जाणा-या रोडवर,भाईदर (पु) (गटाराच्या स्लॅबवर) | नविन प्रस्ताव |
| ५ | ५ | एस.टी.स्टॅन्ड ते मच्छी मार्केट,जय अंबे झोपडपट्टीकडे जाणा-या रोडवर,भाईदर (प.) (गटाराच्या स्लॅबवर) | नविन प्रस्ताव |
| ६ | ६ | रेल्वे उडाण ब्रीजखाली, भाईदर (पु). | चालू आहे. (फक्त ६ महिन्यांकरीता) |

## (ब)- पे ॲन्ड पार्कचे सुधारीत दरपत्रक

| अ.क्र | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | खाजगी वाहने | ६ तासाकरीता | १२ तासाकरीता | २४ तासाकरीता | महिन्याचा पास |
| (I) | सायकल | रु.१ | रु.३ | रु.५ | रु.१०० |
| (ii) | दुचाकी वाहने | रु.५ | रु.८ | रु.१२ | रु.२७५ |
| (iii) | चार चाकी वाहने | रु.१० | रु.१५ | रु.२० | रु.४५० |
| २ | व्यावसायिक वाहने | | | | |
| (I) | दुचाकी/ तीन चाकी/ चार चाकी(टॅक्सी,टेम्पो,इ.हलकी वाहने, | रु.२० | रु.२५ | रु.५० | रु.१२०० |
| (ii) | ४/सहा चाकी - (ट्रक,बस, टुरीस्ट बस,इ. जड वाहने,) | रु.२५ | रु.५० | रु.१०० | रु.२५०० |

वरील नमुद केलेल्या मिरा भाईदर क्षेत्रातील सहा ठिकाणांवरील पे ॲन्ड पार्कच्या (वाहनतळाच्या) धोरणात्मक निर्णयास व प्रस्तावित प्रमाणे सुधारीत दरास मान्यता देण्यात येते.

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३२६ वर मंजुर विकास योजनेचे ट्रक टर्मिनल करीता मातीभराव करणे, ट्रक टर्मिनलकडे जाणारा रस्ता तयार करणे. तसेच ज्या ठिकाणी पे ॲन्ड पार्कसाठी (वाहनतळासाठी) जागा निश्चित करण्यात आल्या आहेत त्याठिकाणी गटारावर स्लॅब टाकणे, टेंपर मारणे (आर.ए.एम.पी), गटारालगत रेलिंग टाकणे इत्यादी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरीत करण्याकरीता तसेच कामे परिपुर्ण झाल्यानंतर त्यावर निविदा काढून निविदा मंजुर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धोरणात्मक प्रस्तावाचा (पे ॲन्ड पार्कचा) तीन वर्षाकरीता ठेका देण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे निविदा मागवून निविदा काढण्यास, तसेच नव्याने पे ॲन्ड पार्कच्या जागा उपलब्ध झाल्यास त्याबद्दलचा निर्णय घेण्यास मा.आयुक्तांस ही सभा प्राधिकृत करते.

उपरोक्त प्रस्तावाला ही मा.महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार | अनुमोदक :- श्री. धनेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १०/४/२००८

**प्रकरण क्र. :-** ४

**ठराव क्र.** ०४ :-

**विषय :-** **पावसाळ्यापुर्वी मनपा. क्षेत्रातील करावयाच्या कच्चे/ पक्के नाले सफाई कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रे हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्यास वसले असून शहराच्या तीन बाजूने खाडीचा परिसर आहे. पावसाळ्या दरम्यान राष्ट्रीय उद्यानाच्या डोंगराळ भागातून मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी शहरामधील कच्च्या/पक्क्या नाले/ गटारातून निचरा होत असतो. विकासकर्त्यामार्फत पडीक जमीनीमध्ये मातीचा भराव होत असुन दरवर्षी नाल्यांच्या मार्गात बदल होत असतो. ज्या ठिकाणी नाले खाडीला मिळतात अशा ठिकाणी खाड्यांचे पात्र रूंद करणे, पक्के व बंद स्वरूपाचे नाले/गटारे सफाई करणे, कामातून निघालेला गाळ/माती/कचरा वाहतुक करणे, तसेच पावसाळया दरम्यान साचलेल्या पाण्याचा निचरा जलदगतीने होण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी रोड क्रॉसिंग मध्ये आर.सी.सी. पाईप टाकणे तसेच सखल भागात साचलेल्या पाण्याचा उपसा सक्शन पंपाद्वारे करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेवून शहरातील नाले/गटारे सफाई/खोदाई करणे कामी प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यानुसार तसेच विकासकर्त्यामार्फत पडीक जमिनीवर होत असलेल्या माती भरावामुळे सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा होणे कामी कच्चे नाले खोदणे कामी आवश्यकतेनुसार जे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटीसह पोकलन मशिन, सक्शन पंप, आदी भाड्याने घेणे, कंत्राटपध्दतीने मनुष्यबळ, वाहने घेणे, तसेच आर.सी.सी. पाईप खरेदी करणे कामी हि सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत असून इतीवृत्तांताची वाट न पाहता सदर कामाच्या निविदा मागविण्यास मान्यता देत असून सदर कामी तरतुद अपुरी पडल्यास मनपा.च्या अन्य विभागाच्या लेखाशिर्षातील तरतुदीतून पुर्नविनियोजन करणेस हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री लक्ष्मण जंगम

अनुमोदन :- श्री दिनेश गायकवाड

महापौर
*मिरा भाईंदर महानगरपालिका*

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. १०/४/२००८

**प्रकरण क्र. ०५ :-** **प्रभागनिहाय साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन करण्याकामी निविदा मागविणेच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. :-** ०५

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे ७९ चौ.कि.मी एवढे विस्तारीत असून महापालिकेची सध्याची लोकसंख्या अंदाजीत आठ ते साडे आठ लाख एवढी आहे. महानगरपालिका क्षेत्र हे मुंबई व ठाणे महानगरास संलग्न आहे. या करीता शहरामध्ये नागरीकांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होवून झपाट्याने नागरीकरण होत आहे. त्यामुळे दैनंदिन निघणारा कचरा वाहतुक करणे व शहरातील रस्ते, गटारे सफाई करणे कामी दरवर्षी खाजगीकरणातुन कंत्राटीपध्दतीने मजूर व वाहनां मार्फत करण्यात येते. सदर निविदाकाराकडून औषध / धुर फवारणी करणे कामी प्रत्येक गटातून आवश्यकतेनुसार कंत्राटी मजुर वर्ग करण्यात यावे. त्याच धर्तीवर सन २००८-०९ या आर्थिक वर्षात दैनंदिन गट निहाय प्रभाग साफसफाईची कामे करणेबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार विविध गटाकरीता एकुण १६४१ कंत्राटी मजूर व एकुण ६० वाहने कचरा वाहतुक घेणे कामी आवश्येक आहे. असे प्रशासनाचे मत आहे.

या मजुरांवर वाहनांवर व साफसफाईवर नियंत्रण ठेवणेसाठी महानगरपालिकेच्या तज्ञ अधिकाऱ्यांचे नियंत्रण असावे. तसेच प्रभागातील रस्ते, नाले, गटारे यांची लांबी तपासून त्याप्रमाणे झोनप्रमाणे फेर रचना करुन कामगार घेण्यात यावेत व गरज भासल्यास झोन वाढविण्यात यावेत तसेच प्रत्येक गाडीवर जी.पी.आर.एस. सिस्टीम बसविण्यात यावी व हजेरी करता थंब इंप्रेशन मशीन ठेकेदाराकडून लावण्यात यावेत. व त्याचे नियंत्रण मुख्य कार्यालयातून करण्यात यावे. सदर मशीन आदेश प्राप्त झालेपासून ठेकेदाराने बसवून घ्यावेत. ठेकेदाराने मशीन बसविले नंतरच ठेकेदाराचे देयक अदा करण्यांत यावे. उपरोक्त विषयास हि सभा आर्थिक प्रशासकिय मंजुरी देत असून, इतीवृत्तांताची वाट न पाहता सदर कामाच्या निविदा मागविण्यास तसेच निविदास अंतिम मंजुरी मिळेपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांस कामाची १५ दिवस मुदतवाढ देत असून सदर कामी तरतुद अपुरी पडल्यास मनपा.च्या अन्य विभागाच्या लेखाशिर्षातील तरतुदीतून पुर्नविनियोजन करणेस हि सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ गजानन पाटील** **अनुमोदन :- श्री. मधुसुदन पुरोहित**

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १०/०४/२००८

**प्रकरण क्र. ०७ :- चित्रपटगृह, नाटक, तमाशा, सर्कस यावरचे थिएटर कर नियमांस मंजूरी मिळणे बाबत.**

**ठराव क्र. ७८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सद्या चित्रपटगृह, नाटक, सिनेमा, सर्कस इत्यादींवर नगरपालिका काळापासून निश्चित केलेले दर प्रती खेळा मागे रु. १५/- याप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिका वसूल करीत आहे. सध्याचे दर हे नगरपालिका काळापासून लागू केलेले आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आधुनिक पध्दतिने सिनेमागृह बांधलेले असून पूर्विच्या सिनेमा दरापेक्षा आत्ताचे दर मोठया प्रमाणात वाढलेले आहेत. महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने सध्या आकारत असलेल्या दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९ चे पोटकलम १ व १२७ चे पोटकलम २ खंड (ड)" अन्वये अशा प्रकारे कर लागु करण्याची तरतुद आहे. कलम ४५७ खंड ७, उपखंड (अ) मध्ये अशा प्रकारे करासंबंधी नियम करण्याची तरतुद आहे.

वरील प्रमाणे अधिनियमातील तरतुदीनुसार "मिरा-भाईंदर महानगरापालिका थिएटर कर नियम २००७" नियम करण्यांत आले आहेत. सदरहु नियमामध्ये खालीलप्रमाणे दर प्रस्तावित केलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ | सिनेमा | रु. १००.०० प्रति शो |
| ब | नाटक | रु. १००.०० प्रति शो |
| क | तमाशा | रु. १००.०० प्रति शो |
| ड | (अ) सर्कस | रु. १००.०० प्रति शो |
| | (ब) आनंद बाजार जत्रा | रु. १००.०० प्रति शो |
| इ | (अ) उपहारगृहातील संगीत<br>समुह नृत्य<br>जादूचे प्रयोग | रु. ५०.०० प्रति शो |
| | (ब) संगीत, समुह नृत्य<br>जादूचे प्रयोग<br>जत्रा इतर ठीकाणी | रु. ५०.०० प्रति शो |

वरील प्रमाणे तयार केलेल्या "मिरा-भाईंदर महानगरापालिका थिएटर नियम २००७" या नियमावलीच्या मसुद्यास मंजूरी देणेत येत आहे.

सुचक :- श्री. बर्नड डिमेलो

अनुमोदन :- श्री. राजेश म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

१२

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १०/०४/२००८

**प्रकरण क्र. ०८ :- महानगरपालिका हद्दीतील मोकळया जागेवर कर आकारणी करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. :- ०८

महानगरपालिकेने शहरातील विकास कामे व नागरीकांना सुविधा देणाच्या दृष्टीने ५० दशलक्ष लिटर पाणी योजना, रेल्वे मार्गावरील उड्डाण पुल काशिमिरा रोड रुंदीकरण या कामासाठी एकुण ९४ कोटी इतके कर्ज घेवून कामे केली आहेत. त्या कर्जाची परतफेड व त्यावरील व्याज यासाठी दरवर्षी १२ कोटी इतकी रक्कम भरावी लागत आहे.

मिरा-भाईदर शहरात नागरीकांना विविध सुविधा देण्यांच्या दृष्टीने जवाहरलाल नेहरु अर्बन रिनीवल मिशन अंतर्गत विविध कामे १९२५.१७ कोटीची प्रस्तावित केली असुन सदर कामांना महासभा ठराव क्र. ६५ दि. १७/११/२००६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. या योजनेतील कामासाठी केंद्र सरकारकडुन ३५% व राज्य सरकार कडुन १५% अनुदान मिळणार आहे. उर्वरीत खर्च रु. ९६० कोटी महानगरपालिकेस उभे करावे लागणार आहेत. या कामी पुन्हा कर्ज घेणे आवश्यक ठरणार आहे. महानगरपालिकेने सध्या घेतलेले कर्ज व **जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM)** या योजने अंतर्गत कामांसाठी घ्यावयाचे कर्ज परतफेड करण्यासाठी महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेने यापुर्वी घेतलेले कर्ज, भविष्य काळात विकास कामासाठी घ्यावी लागणारी कर्जे याची परतफेड महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या साधनातूनच करावी लागणार आहे. कर्जाची परतफेड, शहराच्या विकास कामांसाठी उत्पन्न वाढविणे तितकेच आवश्यक होउन बसले आहे.

महानगरपालिकेच्या विकास कामासाठी जादा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादीत असून विकास कामांसाठी होणारा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. महानगरपालिकेने उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सध्या करदात्यांवर वाढीव कराचा बोजा न लावता **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ व १३२ नुसार शहरातील मोकळया जागेवर कर लावण्याची तरतुद आहे.**

अशा प्रकारे मोकळया जागेवर कर आकारणी करण्याच्या दृष्टीने खालील निकष ठरविणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**मोकळया जागा :-** ज्या जागेत बांधकाम प्रारंभपत्र महानगरपालिकेने दिले आहे. त्या दिनांकापासून त्या मोकळया जागा म्हणुन कर आकारणीस पात्र राहतील जागेतील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र हे कर आकारणीसाठी बांधकाम क्षेत्र म्हणुन गृहीत धरण्यांत यावे.

(७) १५

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**मा. महासभा दि. १०/०४/२००८**

प्रकरण क्र. ९ - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) मधील तरतुदीनुसार “अवैध इमारतींवर” शास्ती बसविणे बाबत.

ठराव क्र. ९ -

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग ४ महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व विनियमामधील सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अधिनियमात सुधारणा करण्यात आलेल्या असुन त्यामध्ये कलम २६७ (अ) नव्याने समाविष्ठ करण्यात आलेले आहे. दि. ४ जानेवारी २००८ रोजी सदर अधिनियम प्रथमतः प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

नव्याने समाविष्ठ करण्यात आलेल्या तरतुदीनुसार अवैध इमारतींवर शास्ती बसविणेबाबत उल्लेख केलेला आहे. सदर कलम २६७(अ) नुसार जो कोणी कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीचे भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुर्नबांधकाम करील तो अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत त्याच्या विरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी अशा इमारतींवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल.

ज्या इमारती ग्रामपंचायत, नगरपालिका कालावधीपासून रहीवास व्याप्त आहेत. त्यांना नगरपालिकेने /महानगरपालिकेने यापुर्वीच कराची आकारणी केलेली आहे. अशा इमारतीमधील

१) सदनिका धारकांनी चटई क्षेत्रफळ चुकीचे असल्याने त्याची दुरुस्ती करुन फेर कर आकारणी करणेबाबत,

२) सदनिका धारकांनी वापरातील बदल केल्या प्रकरणी उदा. रहिवास ऐवजी वाणिज्य वापर फेर कर आकारणी करणेबाबत.

३) सदनिका धारकांना आकारण्यात येणाऱ्या भाडेपट्टीच्या रक्कमेतील वाढ वा घट प्रकरणी फेर आकारणी करणेबाबत.

४) सदनिका धारकांना चुकीची कर आकारणी केलेली असेल व सदनिका धारकाने सुधारीत कर आकारणी करणेबाबत मागणी केल्यास.

वरील प्रकरणी महानगरपालिकेने फेर कर आकारणी करताना ही शास्ती लागू करु नये.

परंतु

१) कोणतेही वापरात असलेल्या औद्योगीक गाळ्यांच्या किंवा इमारतींच्या मुळ संरचनेत संपुर्ण बदल करुन व त्यात वाढीव बांधकाम केल्यास अशा प्रकरणी संपुर्ण क्षेत्राला फेर आकारणी करताना सदरची शास्ती लागू करण्यात यावी.

२) दि. ०१/०४/२००८ नंतर कर आकारणी करताना कर विभागाने मागणी केल्याप्रमाणे ज्या इमारतींना नगर रचना विभागाने प्रारंभ पत्र दिलेले आहे व इमारत बांधकाम पुर्ण झाले असुन त्यास भोगवटा दाखला दिलेला नाही किंवा घेतलेला नाही परंतु प्रत्यक्ष वापर सुरु झालेला आहे. अशा इमारतींच्या सदनिकांचे किंवा गाळ्यांचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे केलेले आहे किंवा नाही याची तपासणी नगर रचना विभागाने करुन त्यामध्ये मंजुर नाकाशाप्रमाणे केलेले सदनिका/ गाळे नुसार बांधकामाचे अधिकृत क्षेत्रफळ व अनधिकृत बांधकामाचे क्षेत्रफळ नमुद करुन संपुर्ण तपशील कर विभागास सादर करावा. व त्यानुसार करविभागाने अनधिकृत बांधकामाखालील क्षेत्रफळाला कर आकारणी करताना शास्ती लागू करावी.

३) ज्या इमारतींना भोगवटा दाखला दिलेला आहे अशा इमारतींच्या सदनिकांचे किंवा गाळ्यांचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे केलेले आहे किंवा नाही याची तपासणी नगर रचना विभागाने करुन त्यामध्ये मंजुर नकाशाप्रमाणे केलेले सदनिका/ गाळे नुसार बांधकामाचे अधिकृत क्षेत्रफळ व अनधिकृत बांधकामाचे क्षेत्रफळ नमुद

करुन संपुर्ण तपशील कर विभागात सादर करावा व त्यानुसार कर विभागाने अनधिकृत बांधकामाखालिल क्षेत्रफळाला कर आकारणी करताना शास्ती लागू करावी.

सदर राजपत्र दि. ४ जानेवारी २००८ रोजी प्रसिद्ध झाले असुन अधिनियमातील सुधारणा व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६७(अ) मधील तरतुदीचे पालन काटेकोरपणे प्रशासनाने करावयाचे असुन सदर तरतुदीनुसार पात्र असणाऱ्यास अर्थिक वर्ष १ एप्रिल २००८ पासुन शास्ती लावण्यात यावी. सदर कलम २६७(अ) च्या पोटकलम २ नुसार शास्तीची रक्कम ही मालमत्ता कराची रक्कम असल्या प्रमाणे ती रक्कम निर्धारीत करणे व वसुल करणे हे कर विभागाचे काम असून शास्तीच्या रक्कमेच्या आकारणी कर संकलक व निर्धारक अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक - श्री. प्रफुल्ल पाटील** **अनुमोदक - श्री. तुळशीदास म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. चंद्रकांत वैती व अनुमोदक एस. ए. खान यांनी सुचना मांडली ती पुढील प्रमाणे.**

या विषयावर झालेल्या ठरावास उपसुचना सादर करीत आहे की, मिभामपा क्षेत्रात १९ गावे असून पिढ्यानपिढ्या गावकरी तिथे राहतात. कुटुंब वाढल्यामुळे अथवा मोडकळीस आलेली जुनी घरे दुरुस्ती किंवा पुर्नबांधकाम केले जाते अशा गावठणांस या शास्तीतून वगळण्यांत यावे.

| .अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | .अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | .अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | खान शफीक अहमद सादत | | निरंक | १ | नरेंद्र मेहता |
| २ | म्हात्रे मिलन वसंत | | | २ | शेख आसिफ गुलाब |
| ३ | शानू जो. गोहिल | | | ३ | पाटील जयंत महादेव |
| ४ | दिनेश नलावडे | | | ४ | दिव्या अशोक तिवारी |
| ५ | शेट्टी गणेश गोपाळ | | | ५ | सिंह मदन उदितनारायण |
| ६ | वेतोसकर राजेश शंकर | | | ६ | जाधव मोहन महादेव |
| ७ | पाटील सुनिता कैलास | | | ७ | पाटील प्रविण मोरेश्वर |
| ८ | पाटील प्रभात प्रकाश | | | ८ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र |
| ९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | | ९ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम |
| १० | पाटील धनेश परशुराम | | | १० | पाटील मिलन गोविंदराव |
| ११ | व्यास सुधा वासुदेव | | | ११ | पाटील अनंत रामचंद्र |
| १२ | म्हात्रे नयना गजानन | | | १२ | म्हात्रे कल्पना महेश |
| १३ | भोईर सुनिता शशिकांत | | | १३ | डिमेलो बर्नड आल्बर्ट |
| १४ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | १४ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी |
| १५ | पाटील प्रफुल्ल काशिनाथ | | | १५ | .अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| १६ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | | १६ | शर्मा भगवती |
| १७ | जंगम लक्ष्मण गणपत | | | १७ | पालांडे प्रशांत भगवंतराव |
| १८ | सपार उमा विश्वनाथ | | | १८ | बावीधर सिसिलीया विजय |
| १९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | | | १९ | माळी हेमा रविंद्र |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | पुजारी कांचन शेखर | | | २० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| २१ | मुंज वासुदेव भास्कर | | | २१ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| २२ | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | | | २२ | पांडे स्नेहा शैलेश |
| २३ | भाटकर प्रेरणा प्रमोद | | | २३ | भोईर राजू यशवंत |
| २४ | डिसा मर्लिन सर्विन | | | २४ | दुबे रामनारयण सदानंद |
| २५ | वैती विजया हेमचंद्र | | | २५ | .अनिता जयवंत पाटील |
| २६ | ठाकुर कल्पना हरिहर | | | | |
| २७ | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | | | | |
| २८ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | | |
| २९ | भट दिप्ती शेखर | | | | |
| ३० | वैती चंद्रकांत सिताराम | | | | |
| ३१ | सावंत अनिल दिवाकर | | | | |
| ३२ | शेख सलिम दाउद | | | | |
| ३३ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | | |

ठराव बहुमताने मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १०/०४/२००८

**प्रकरण क्र. १० :-** वेदर शेड करिता भाडे आकारणी बाबत.

**ठराव क्र. १० :-**

मिरा-भाईंदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानासमोर/हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणे बाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबंधित अर्जदारास/मालकांस रु. २,५००/- इतके शुल्क आकारुन तात्पुरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास परवानगी देण्यात येते. सदरच्या परवानगीतील नमुद वेदरशेड खालील जागेवर वाणिज्य वापर करता येणार नाही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली आहे. तथापि असे निदर्शनात आले आहे की, वेदरशेड खालील जागेचा वापर बहुतांशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जातो.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २२७/१ (ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वगैरे तात्परते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. ५८ - इ मध्ये तात्पुरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतुद आहे.

महापालिकेच्या उत्पन्न वाढीचा स्त्रोत म्हणून मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनातर्फे माडण्यांत आलेला आहे. सदर प्रस्ताव हा शहराच्या हिताचा नाही व अगोदरचा रस्त्यावर आलेल्या दुकानाच्या शेडमुळे निर्माण झालेल्या त्रासात भर टाकणार आहे. सहा महिन्यासाठी परवानगी दिल्यानंतर सहा महिन्यानंतर वेदरशेड काढण्याची कोणत्याही प्रकारची कार्यपध्दती अवलंबविण्यात येणार आहे. याचा कोणताही खुलासा गोषवारात नाही. दुकाना समोर व हॉटेल समोर वेदरशेड उभारण्यास महापालिकेने परवानगी दिल्यास व्यवसियकामध्ये गोधंळाचे वातावरण निर्माण होईल व काही ठिकाणी तर नागरिकांना रस्त्यावरुन चालणेही मुश्किल होईल. सध्या स्थितीत महानगरपालिका क्षेत्रातील दुकानासमोर असलेले पत्राशेड, हॉटेलच्या आवरात टाकण्यात आलेले शेड यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण महापालिकेचे नाही. त्यांच्यावर कोणतेही प्रकारची कारवाई अजुनपर्यंत महापालिकेने केलेली नाही. परवानगी देताना अधिकृत इमारत व अनधिकृत इमारत असा भेदभाव न करणे हे अधिकृत इमारत धारकांना अन्यायकारक होईल. नागरिकांना फूटपाथ वर चालणेही मुश्किल होईल. हॉटेल समोरील वेदर शेडला कोणत्याही प्रकाराची परवानगी देण्यांत येऊ नये व दुकानासमोर पावसाचे पाणी थांबविणेकरिता दुकानाचा शटर/दरवाजा पासून ३ ते ४ फुट लांब व श्टर / दरवाजाचा रुंदीच्या आकाराचे वेदरशेड उभारणेकरिता परवानगी देण्यांत यावी. त्याचे भाडे वर्षाला १ रुपया चौ. फुट प्रमाणे आकारण्यात यावे. असा महासभेपुढे मी ठराव मांडीत आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

| अ.क्र. | ठरवाच्या बाजुने | अ.क्र. | ठरवाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत वैती | | | | |
| २ | खान शफीक अहमद सादत | १ | नरेंद्र मेहता | | निरंक |
| ३ | शानू जो. गोहिल | | | | |
| ४ | दिनेश द नलावडे | | | | |
| ५ | वेतोसकर राजेश शंकर | | | | |
| ६ | पाटील सुनिता कैलास | | | | |
| ७ | प्रभात प्रकाश पाटील | | | | |
| ८ | सुनिता शशिकांत भोईर | | | | |
| ९ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | | | | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | जंगम लक्ष्मण गणपत | | | | |
| १२ | सपार उमा विश्वनाथ | | | | |
| १३ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | | | | |
| १४ | पुजारी कांचन शेखर | | | | |
| १५ | मुंज वासुदेव भास्कर | | | | |
| १६ | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | | | | |
| १७ | भाटकर प्रेरणा प्रमोद | | | | |
| १८ | डिसा मर्लिन मर्विन | | | | |
| १९ | वैती विजया हेमचंद्र | | | | |
| २० | ठाकूर कल्पना हरिहर | | | | |
| २१ | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | | | | |
| २२ | भट दिप्ती शेखर | | | | |
| २३ | सावंत अनिल दिवाकर | | | | |
| २४ | शेख सलिम दाउद | | | | |
| २५ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | | |
| २६ | शेट्टी गणेश गोपाळ | | | | |
| २७ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | | | |
| २८ | व्यास सुधा वासुदेव | | | | |
| २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | | |
| ३० | म्हात्रे नयना गजानन | | | | |
| ३१ | म्हात्रे मिलन वसंत | | | | |

**सुचक - श्री. चंद्रकांत म्हात्रे** **अनुमोदक - लक्ष्मण जंगम**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १०/०४/२००८

**शोकप्रस्ताव ठराव ११ :-**

घोडबंदर येथील जेष्ठ नागरिक व समाजसेवक स्व. चिंतामण नामदेव वैती यांचे दि. ०७/०४/२००८ रोजी दु:खद निधन झाले आहे. तसेच शिक्षण मंडळाने उपसभापती श्री. सुरेश दळवी यांचे भाउ आहेत त्यांचे निधन झाले आहे. त्याचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. विजया वैती.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १०/०४/२००८

**प्रकरण क्र. ११ :-** ''डी.पी. रोड लगत इमारत बांधकाम करणाऱ्या विकासकाकडून स्वखर्चाने रस्ते व गटारे बांधून घेणेबाबत.

**(सदर विषय मा. महापौर सो. यांच्या आदेशाने पुढील सभेत घेण्याचे ठरले.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १०/०४/२००८

**प्रकरण क्र. १२ :-** परवाना शुल्कात सुधारणा करणे, विलंब शुल्क लागू करणे व विना परवाना आस्थापनांवर करावयाच्या कारवाई बाबत निर्णय घेणेबाबत.

**(सदर विषय मा. महापौर सो. यांच्या आदेशाने पुढील सभेत घेण्याचे ठरले.)**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १९/०६/२००८.**

प्रकरण क्र. १३ :- दि. १८/०३/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १३ :-

दि. १८/०३/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- प्रशांत मल्हार पाटिल    अनुमोदन :- मिलन गोविंद पाटिल

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

२५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०६/२००८

**प्रकरण क्र . १४ :-** **डि.पी. रोड लगत इमारत बांधकाम करणाऱ्या विकासकांकडून स्वखर्चाने रस्ते व गटारे बांधून घेणे बाबत.**

**ठराव क्र. १४ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना, विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि. १४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि. २५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून अनुक्रमे दि. १५/०७/९७ व दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

गृहसंकुलाच्या जागेमधील विकास योजनेतील रस्त्याच्या बाजूच्या गटारासहित विकसीत करणे बंधनकारक आहे. तथापी शहराची भूयारी गटार योजना अद्याप झालेली नसल्यामुळे प्रत्येक गृहसंकुलाच्या गटारांचे बांधकाम वेगवेगळया आकारामध्ये होत असल्याचे निदर्शनास येते. इमारतींचे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. १८ प्रमाणे रस्त्याच्या खर्चाची वसुली संबंधीत विकासकांकडून करणे शक्य आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४-अ प्रमाणे जमिनीच्या विकासासाठी व होणाऱ्या बांधकामासाठी विकास आकार आकारण्याबाबतची तरतूद असून त्याप्रमाणे या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार जास्तीत जास्त विकास आकाराच्या दराप्रमाणे आकारणी सद्यस्थितीत करण्यांत येत आहे व कलम १२४-जे प्रमाणे या विकास आकाराची रक्कम विकास निधीमध्ये जमा करुन या जमा केलेल्या रक्कमेचा वापर केवळ त्याच प्रयोजनासाठी करावयाचा आहे. यापुढे विकासकाला इमारत बांधण्यासाठी परवानगी देण्या अगोदर डि.पी. रोड, गटारे व दिवाबत्ती सोय तसेच अंतर्गत रस्ते मनपाच्या प्लॅननुसार करण्याचे बंधनकारक करावे. व या सुविधा मिभामनपा देखरेखी खाली करुन घ्याव्यात. असा मी ठराव मांडीत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- सौ. सुनिता पाटील

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. मिलन म्हात्रे व अनुमोदन श्री. एस. ए. खान यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

शहरातील वाढत जाणाऱ्या व नव्याने निर्माण होणाऱ्या गृह संकुलात प्रामुख्याने विकासकाकडून डी.पी. रोड लगतची गटारे, फुटपाथ सार्वजनिक दीवाबत्ती, पिण्याच्या पाण्याच्या बीडाच्या / एम एस च्या पाईपलाईन, इमारती शेजारील नव्याने लावायची झाडे अग्नीशमन अंतर्गत व्यवस्था इत्यादी विकासकाने स्वखर्चाने करावी. तसेच त्यावर महापालिकेच्या मा. आयुक्त तसेच संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण असावे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा.महासभा दि. १९ /०६/२००८

प्रकरण - १५

## //ठराव//

ठराव क्रमांक १५ :-

विषय :- <u>परवाना शुल्कात सुधारणा करणे, विलंब शुल्क लागू करणे, व विना परवाना आस्थापनांवर करावयाच्या कारवाई बाबत निर्णय घेणे.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध व्यवसाय/उद्योग आस्थापनांकरिता परवान्याचे शुल्क या अगोदर ठराव क्रमांक :- १६३ दिनांक ४/७/२००२ अन्वये निश्चित करून मंजूर केलेले आहे. सदरचे दर जास्त असल्याने त्यात सुधारणा करणे करिता मा.श्री.ओमप्रकाश अग्रवाल,नगरसेवक यांनी दिनांक २०/१२/२००७ च्या मा.महासभेत प्रस्ताव सादर केला होता. सदर ठरावाबाबत मा.महापौर महोदय यांनी "सदर विषय रितसर मा.महासभेच्या विषय पत्रिकेवर आणून निर्णय घेण्यात येईल" असे रूलींग दिले होते.

ठराव क्रमांकः-१६३, दिनांक :-४/७/२००२ अन्वये मंजूर केलेले शुल्क हे सन २००२ पासून लागू असल्यामुळे ते खालील बदलासह कायम करण्यात यावेत.

| अ.क्र. | आस्थापनेचा प्रकार | ठराव क्रमांक १६३ दि.४/७/२००२ अन्वये मनपाने निश्चित केलेले दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नवीन (रुपयात) | नुतनीकरण (१ वर्ष) (रुपयात) | नवीन (रुपयात) | नुतनीकरण (१ वर्ष) (रुपयात) |
| १ | विद्युत पुरवठा दाखला (कारखान्याकरिता) | ७०००/- | - | ७०००/- | ३०००/- |
| २ | व्यवसाय चालू करणेस दाखला (कारखाना हॉटेल मिठाई दुकान व बेकरी) | ५०००/- | ३०००/- | ५५००/- | २५००/- |
| २ अ | २००० चौरस फुट पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या आस्थापना | - | - | ११०००/- | ५०००/- |
| ३ | टेलिफोन बुथ करिता ना हरकत दाखला | १००/- | १००/- | १००/- | १००/- |
| ४ | कत्तलखाना चालवणेस दाखला | १०००/- | ५००/- | २०००/- | ७५०/- |
| ५ | केरोसीन/केमीकल साठा/ गोडावून दाखला | ५०००/- | १०००/- | ५५००/- | २५००/- |
| ६ | चर्मकार ना हरकत दाखला | १००/- | १००/- | १००/- | १००/ |
| ७ | बार अँड रेस्टॉरंट दाखला | १००००/- | ५०००/- | १५०००/- | ७५००/- |
| ७ अ | ५००० चौरस फुटा पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या बार अॅन्ड रेस्टॉरन्ट | - | - | ३००००/- | १५०००/- |
| ८ | रुग्णालय सुरू करणेस दाखला (५ कॉट) | ५०००/- | १०००/- | ५५००/- | २५००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | उपहारगृहे/चायनीज सेंटर | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| १० | खानावळ | १०००/- | ५००/- | १५००/- | ५००/- |
| ११ | ऑईल मिल | ५०००/- | २५००/- | ५५००/- | २५००/- |
| १२ | लॉजिंग /बोर्डीग | १५०००/- | ७५००/- | ३००००/- | १५०००/- |
| १३ | सौदर्य प्रसाधने बनवणे/ | १०००/- | ५००/- | २०००/- | १०००/- |
| १३ अ | ब्युटीपार्लर/सलून घरगुती पार्लर | - | - | १०००/- | ५००/- |
| १४ | शीतपेय गृहे | ५००/- | २५०/- | १०००/- | २५०/- |
| १५ | कॅटरींग कॅटरर्स | २०००/- | १०००/- | ३०००/- | १५००/- |
| १६ | रेडीमेड स्टोअर्स /बुट चप्पल व्यवसाय | १०००/- | १०००/- | २०००/- | १०००/- |
| १७ | मेडीकल स्टोअर्स | ५०००/- | २५००/- | ५५००/- | २५००/- |
| १८ | इलेक्ट्रीक हार्ड वेअर/ स्पेअर पार्ट | १०००/- | ५००/- | २०००/- | १०००/- |
| १९ | गॅरेज | ५०००/- | २५००/- | ६०००/- | ३०००/- |
| २० | फोटो स्टुडीओ/ व्हिडीओ शुटिंग | १५००/- | ७५०/- | २०००/- | ७५०/- |
| २१ | बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| २२ | खाजगी रुग्णालय/नर्सीग होम (१० कॉट) | १००००/- | ५०००/- | १५०००/- | ५०००/- |
| २३ | दवाखाने | १०००/- | १०००/- | १०००/- | १०००/- |
| २४ | मटण/चिकन/बीफशॉप | २५००/- | १२५०/- | २५००/- | १२५०/- |
| २५ | १० किंवा अधिक इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | २०००/- | १०००/- | ३०००/- 2000 | १२५०/- |
| २६ | २१ ते ३५ इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | ३०००/- | १५००/- | ५०००/- | २०००/- |
| २७ | ३६ ते ५० इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | ५०००/- | ५०००/- | ७५००/- | ३०००/- |
| २८ | ५१ ते १०० इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | ७५००/- | ३०००/- | ७५००/- | ३५००/- |
| २९ | १०० पेक्षा अधिक गुरे ठेवण्याचा तबेला | १००००/- | ५०००/- | १००००/- | ५०००/- |
| ३० | भांडी कारखाने (१० पेक्षा जास्त कर्मचारी) | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/ |
| ३० अ | भांडी पॉलिश (बफींग) करण्याचे कारखाने | - | - | २५००/- | १२५०/- |
| ३१ | इतर लहान कारखाने (१० पेक्षा कमी कर्मचारी) | ३०००/- | १५००/- | ३०००/- | १५००/- |
| ३२ | इलेक्ट्रॉनिकवस्तु शोरूम | १००००/- | ५०००/- | १००००/- | ५०००/- |
| ३२ अ | २००० चौ. फु पेक्षा जास्त क्षेत्रफाळाच्या शॉरुम | - | - | २००००/- | १००००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३<br>३३ अ | वाहनांचे शोरुम<br>२००० चौ. फु पेक्षा जास्त क्षेत्रफाळाच्या शॉरुम | १००००/-<br>- | ५०००/-<br>- | १००००/-<br>२००००/- | ५०००/-<br>१००००/- |
| ३४<br>३४ अ | सोने/चांदिच्या शोरूम<br>२००० चौ. फु पेक्षा जास्त क्षेत्रफाळाच्या शॉरुम | १००००/-<br>- | ५०००/-<br>- | १००००/-<br>२००००/- | ५०००/-<br>१००००/- |
| ३५ | फोटो स्टुडिओ/ व्हिडीओ शुटींग | १५००/- | ७५०/- | १५००/- | ७५०/- |
| ३६ | पान बिडी शाफप | २५०/- | १२५/- | ५००/- | २५०/- |
| ३७ | पिठाची चक्की /मसाला चक्की | ३०००/- | १०००/- | ३०००/- | १०००/- |
| ३८ | इतर सर्व साधारण दाखले | १०००/- | ५००/- | १०००/- | ५००/- |
| ३९ | विधवा/अपंग चालवत असलेल्या व शासनाची सबसीडी मिळत असलेल्या अस्थापना | - | - | ५००/- | २५०/- |

ठराव क्रमांक :- १६३, दि.४/७/२००२ मध्ये उल्लेख नसलेल्या नवीन आस्थापनांना खालीलप्रमाणे दर कायम करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | आस्थापनेचा प्रकार | ठराव क्रमांक १६३ दि.४/७/२००२ अन्वये मनपाने निश्चित केलेले दर | | मनपा ने प्रस्तावित केलेले दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवीन (रुपयात) | नुतनीकरण (१ वर्ष) (रुपयात) | नवीन (रुपयात) | नुतनी करण (१वर्ष) (रुपयात) | नवीन (रुपयात) | नुतनी करण (१वर्ष) (रुपयात) |
| १ | व्यवसायचालु करणेस दाखला<br>१) दुध डेअरी | - | - | १५००/- | १०००/- | २०००/- | १०००/- |
| २ | बुथ करिता परवानगी<br>१)दुध व दुग्ध जन्यपदार्थ विक्री | - | - | ५००/- | ३००/- | ५००/- | ३००/- |
| | २)कम्युनिकेशन सेंटर(स्टॉल वगळून) | - | - | २०००/- | १०००/- | २०००/- | ७५०/- |
| | ३)इतर वस्तुंचे स्टॉल | - | - | १०००/- | ५००/- | १०००/- | ५००/- |
| ३ | हॉटेल<br>१)५०० चौ.फूट चटई क्षेत्रापर्यत | - | - | २५००/- | १२५०/- | ३०००/- | १५००/- |
| | २)५०१ व पुढील चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| ४ | सलून/ब्युटी पार्लर<br>१)नॉन ए.सी. | - | - | १०००/- | ५००/- | १५००/- | ५००/- |
| | २)ए.सी. | - | - | २०००/- | १०००/- | २५००/- | १०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | रेडीमेड कपडयाची दुकाने<br>१) ५०० चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | १०००/- | १०००/- | २०००/- | १०००/- |
| | २)५०१ व पुढील चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | ३०००/- | १५००/- | २५००/- | १५००/- |
| ६ | औषध होलसेल विक्री | - | - | ३०००/- | १५००/- | २०००/- | १०००/- |
| ७ | गॅरेज<br>१) २०० चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | ५०००/- | २५००/- | ३०००/- | १५००/- |
| | २)२०१ चौ.फूट पासून पुढील चटई क्षेत्राकरिता | - | - | ६०००/- | ३०००/- | ४०००/- | २०००/- |
| ८ | विविध प्रकारच्या लाद्या साठवणे | - | - | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| ९ | सोने/चांदि दागिने तयार करण्याचा कारागिरी वर्क शॉप | - | - | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| १० | किराणा सामान विक्री<br>१)किरकोळ विक्री | - | - | २५००/- | १२५०/- | २०००/- | १०००/- |
| | २)घाउक विक्री | - | - | ५०००/- | २५००/- | ३०००/- | १५००/- |
| ११ | कापड विक्री<br>१) २५० चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | ३०००/- | १५००/- | ३०००/- | १५००/- |
| | २)२५१ व पुढील चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | ५०००/- | २५००/- | ४०००/- | २०००/- |
| | ३)मिल्सची शोरुम | - | - | ७०००/- | ३५००/- | ७०००/- | २५००/- |
| १२ | टेलरिंग काम | - | - | २०००/- | १०००/- | २०००/- | १०००/- |
| १३ | क्लब हाउस | - | - | १५०००/- | ७५००/- | ३००००/- | १५०००/- |
| १४ | लिकर शॉप<br>१)वाईन शॉप | - | - | ५०००/- | २५००/- | १००००/- | ५०००/- |
| | २)बिअर विक्री | - | - | ३०००/- | १५००/- | ४०००/- | २०००/- |
| १५ | व्हिडीओ गेम | - | - | ३०००/- | १५००/- | ५०००/- | २४००/- |
| १६ | पेट्रोल पंप | - | - | १००००/- | ५०००/- | २००००/- | ५०००/- |
| १७ | बेकरी<br>१)बेकरी उत्पादन तयार करणे | - | - | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| | २)बेकरी उत्पादन फक्त विक्री | - | - | २५००/- | १२५०/- | २५००/- | १०००/- |
| १८ | टयुशन क्लास<br>१)२५० चौ फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | २५००/- | १२५०/- | १५००/- | १०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | २)२५१ व पुढील चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | ५०००/- | २५००/- | ३०००/- | १५००/- |
| १९ | ऑफीस<br>१)इस्टेट एजंट | - | - | २०००/- | १०००/- | २०००/- | १०००/- |
| | २)वास्तू विशारद | - | - | २५००/- | १२५०/- | ५०००/- | २५००/- |
| | ४)पत संस्था | - | - | ४०००/- | २०००/- | ४०००/- | २०००/- |
| | ५)विकासक | - | - | ५०००/- | २५००/- | ७५००/- | ३०००/- |
| २० | स्टेशनरी | - | - | २०००/- | १०००/- | २०००/- | १०००/- |
| २१ | केबल ऑपरेटर | - | - | ५०००/- | २५००/- | १००००/- | ५०००/- |
| २२ | ठेकेदार आस्थापना | - | - | २०००/- | १०००/- | ५०००/- | २५००/- |
| २३ | प्रिंटीग प्रेस<br>१)२५०चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | २०००/- | १०००/- | २५००/- | १२५०/- |
| | २)२५१पासुन पढील चटई क्षेत्राकरिता | - | - | ३०००/- | १५००/- | ३०००/- | १५००/- |
| २४ | समारंभ/कार्यक्रम हॉल/लॉन | - | - | ५०००/- | २५००/- | ७५००/- | ५०००/- |
| २४ अ | ५०००चौ.फु पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या आस्थापना | - | - | - | - | १५०००/- | १००००/- |
| २५ | मोबाईल गॅलरी | - | - | ३०००/- | १५००/- | ३०००/- | १५००/- |
| २६ | शेअर व्यवसाय | - | - | ४०००/- | २०००/- | ५०००/- | २०००/- |
| २७ | बॅकींग आस्थापना | - | - | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| २८ | मोटर ड्रायविंग ट्रेनींग स्कुल | - | - | ५०००/- | २५००/- | ३०००/- | १५००/- |
| २९ | सिजनल व्यवसाय | - | - | २०००/- | १०००/- | २०००/- | १०००/- |
| ३० | फर्निचर विक्री<br>१)५००चौ.फूट चटई क्षेत्राकरिता | - | - | ५०००/- | २५००/- | ५०००/- | २५००/- |
| | २)५०१पासुन पुढील चटई क्षेत्राकरिता | - | - | १००००/- | ५०००/- | १००००/- | ५०००/- |
| ३१ | आईस्क्रिम पार्लर | - | - | २०००/- | १०००/- | २५००/- | ७५०/- |
| ३२ | सिनेमा गृह<br>१)सर्वसाधारण सिनेमागृह | - | - | ४०००/- | २०००/- | १००००/- | ५०००/- |
| | २)मल्टीप्लेक्स सिनेमागृह | - | - | १००००/- | ५०००/- | २००००/- | १००००/- |
| ३३ | इन्टरनेट सर्वीस | - | - | - | - | ५०००/- | २५००/- |
| ३४ | सायबर कॅफे | - | - | - | - | ५०००/- | २५००/- |
| ३५ | कॉम्पुटर क्लासेस | - | - | - | - | ५०००/- | २५००/- |
| ३६ | ऑनलाईन लॉटरी सेंटर | - | - | - | - | ५०००/- | २५००/- |
| ३७ | व्हिडिओ थिएटर | - | - | - | - | ५०००/- | २५००/- |
| ३८ | भंगार विक्री दुकाने | - | - | - | - | ३०००/- | १५००/- |

विना परवाना व्यवसाय/उद्योग आस्थापनांवर अधिनियमातील तरतुदीसह खालील प्रमाणे कारवाई करावी जेणेकरून कसुरदार आस्थापनांवर प्रभावीपणे कारवाई करणे शक्य होईल व त्यामुळे परवाना शुल्क रूपाने मिळणा-या उत्पन्नांत निश्चितपणे वाढ होईल.

<u>करावयाची कारवाई :-</u>

१) कसुरदार आस्थापनेचा पाणिपुरवठा खंडीत करणे.
२) कसुरदार आस्थापनेचा विद्युतपुरवठा खंडीत करण्याकरिता मेसर्स रिलायन्स एनर्जी या विद्युत पुरवठा कंपनीस पत्राने कळवणे.
३) कसुरदार आस्थापनेबाबत पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवणे.
४) कसुरदार आस्थापनेस महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कार्यालय/ विभाग यांचा परवाना असल्यास तो रद्द करणेकरिता संबधित कार्यालय/विभाग यांना लेखी कळवणे.

सद्यस्थितीत परवाना धारकाकडून ठरलेले शुल्क वसूल करून १ वर्षाकरिता परवाना दिला जातो. तथापी परवाना धारकाच्या सोयीसाठी जे परवाना धारक एकत्रित ३ वर्षांचे ठरलेले शुल्क भरण्यास तयार असतील त्यांना ३ वर्षांकरिता नविन परवाना देण्याची किंवा त्याचे नुतनीकरण करण्याची कार्यवाही करावी. तसेच राज्य व केंद्र शासनाच्या संबधित विभागाने महानगरपालिकेच्या परवान्या शिवाय संबधिताना लायसन्स/ ना हरकत प्रमाणपत्र देऊ नये असे संबधित विभागात कळवावे व महानगरपालिकेने परवाना देताना दिरंगाई करु नये.

वरील प्रमाणे दर आकारणेस व विना परवाना आस्थापनांवर करावयाच्या कारवाईस हि सभा मंजूरी देत आहे.

असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटिल** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक सौ. प्रभात पाटिल व अनुमोदक सौ. शानु गोहिल यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

कोणत्याही व्यवसायासंबधी परवाना देताना त्या आस्थापनेचे नामकरण हे मराठीतुन मोठ्या(ठळक अक्षरात) अक्षरात फलकावर लिहणे हे सक्तीचे राहिल. अशी मी सुचना मांडत आहे

**सुचक :- सौ. प्रभात पाटिल** **अनुमोदक :- सौ. शानु गोहिल**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. अनिल दिवाकर सावंत व अनुमोदक श्री. राजेश शंकर वेतोसकर यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मा. महासभा दिनांक १९/०६/२००८ मधील प्रकरण क्र. १५ बाबतीत मी अशी उपसुचना मांडत आहे की, महानगरपालिकेने परवाना देते वेळी किंवा त्याचे नुतनीकरण करते वेळी मा. महासभा दि. २०/२/२००७ ठराव क्र. ९२ नुसारच कार्यवाहि करावी. मा. नगरसेविका सौ. प्रभात पाटिल यांनी दिलेल्या **"ज"** च्या प्रस्तावाप्रमाणे प्रत्येक व्यवसायीकाने दुकानाचे नामफलक मराठी मध्येच लिहावेत.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. राजेश शंकर वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम केला.**

**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका.**

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १९/०६/२००८**

**प्रकरण क्र . :- १६.**

**विषय :- महानगरपालिका हद्दीतील बांधकाम परवानगी योग्य असलेल्या जागेवर मा. महासभा दि. १०/०४/२००८, ठराव क्र. ८ मंजुरी दिलेली आहे. त्या व्यतिरीक्त सर्व मोकळ्या जागेवर कर आकारणी करणेस मंजुरी मिळणेबाबत...**

**ठराव क्र. १६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार कलम १२७ अंतर्गत येणारे कर लागू करणे व त्याचे दर ठरविण्याचे संपूर्ण अधिकार महानगरपालिकेस आहेत. महानगरपालिकेस म्हणजेच मा. महासभेस असलेल्या अधिकारानुसार महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेने बांधकाम प्रारंभपत्र दिलेल्या मोकळ्या जागेवर कर लागु करणेस ठराव क्र. ८ दि. १०/०४/२००८ अन्वये मंजूरी दिलेली आहे. मोकळ्या जागेवर कर आकारणी करणे संदर्भात ज्या जागेमध्ये बांधकाम प्रारंभपत्र महानगरपालिकेने दिलेले आहे अशा मोकळ्या जागेची व्याख्या मा. महासभेने केली आहे.

महाराष्ट्रामध्ये काही ठराविक महानगरपालिकेने मोकळ्या जागेवर कराची आकारणी केलेली आहे. बहुतांशी महानगरपालिकेने अशा प्रकारची कर आकारणी केलेली नाही. असे असतानाही मा. महासभा ठराव क्र. ८ दि. १०/०४/२००८ अन्वये बांधकाम प्रारंभपत्र दिलेल्या जागेव्यतीरीक्त सर्व मोकळ्या जागेवर कर आकारणी करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत अशा प्रकारच्या बऱ्याच मोकळ्या जागा असून त्यामध्ये सध्या काही ठिकाणी शेतकरी शेती करीत आहेत. तर काही ठिकाणी बागायती आहेत. शासनाने शेतकऱ्यांचा शेतसारा बंद केलेला आहे, असे असतानाही अशा प्रकारे मोकळ्या जागेवर कर आकारणी करणे अन्यायकारक आहे.

मिरा-भाईदर शहरामध्ये असलेल्या एकूण शेतजमिनीचे क्षेत्र, त्या जागेवर बांधलेल्या इमारती (इमारत व्याप्त जागा), बांधकाम प्रारंभपत्र दिलेल्या जागा व उर्वरीत राहीलेल्या मोकळ्या जागा याची तपशिलवार माहिती गोषवाऱ्यात दिलेली नाही. त्यामुळे प्रस्तावातील गोषवाऱ्याचा अर्थ बोध होत नाही. सबब गोषवारा पूर्णतः सदोष असून सदर प्रस्ताव फेटाळण्यांत येत आहे.

महानगरपालिकेने ज्या जागेत बांधकाम प्रारंभपत्र दिले आहे, अशा मोकळ्या जागेवर कर आकारणी करणेबाबत मा. महासभा ठराव क्र. ८ दि. १०/०४/२००८ ने घेतलेल्या निर्णयाचीच अंमजबजावणी करण्यांत यावी.

सुचक :- प्रफुल्ल पा. पाटील (सही)

अनुमोदक :- श्री. एस. ए. खान (सही)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(सही)

**महापौर**

**मिरा-भाईदर महानगरपालिका**

| एका चौ. फुटास फ्लॅट प्रमाणे होणारा चार्ज | महानगरपालिकेने ठरविल्याप्रमाणे प्रारंभपत्र दिलेल्या मोकळ्या जागेला प्र. चौ. फुटाला होणारा चार्ज. | प्रस्तावित इतर सर्व मोकळ्या जागेवर प्र. चौ. फुटाला होणारा चार्ज. |
|---|---|---|
| १०० चौ.फु. X रु. १.६० प्र. चौ. फुट = रु. १६० मासीक भाडे<br>१६० X १२ = रु. १९२० वार्षिक भाडे<br>१९२० – १९२ ( १० % सुट) = रु. १७२८ करयोग्य मूल्य<br>१७२८ X रु. १० % (सर्व कर) = रु. ६४०<br><br>**प्र. चौ. फुटास रु. ६.४०** | १०० चा. फु. X ५०० चौ. फुट = ५,००, ००० जागेची किंमत<br>५००००० X ५ % वार्षिक भाडे = रु. २५००<br>२५००- २५० (१० % सुट) = रु. २२५० करयोग्य मूल्य<br>२२५० X ३७% (सर्व कर) = रु. ८३२<br><br>**प्र. चौ. फुटास रु. ८.३२** | १०० चा. फु. X ५०० चौ. फुट = ५,००, ००० जागेची किंमत<br>५००००० X ५ % वार्षिक भाडे = रु. २५००<br>२५००- २५० (१० % सुट) = रु. २२५० करयोग्य मूल्य<br>२२५० X ३७% (सर्व कर) = रु. ८३२<br><br>**प्र. चौ. फुटास रु. ८.३२**<br><br>५०० चौ. मी. जागा :- ४४६८०<br>१००० चौ.मी. जागा :- ८९३४६ |

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०६/२००८

**प्रकरण क्र . :- . १७**

**ठराव क्र १७ :-**

**विषय :- विकास योजना – मिरा भाईंदर**

**स.क्र. ३४१ (भाग) मौजे - उत्तन, क्षेत्र ५.०० हेक्टर जमिन आ.क्र.२७६ "महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकेडमी ॲन्ड इंटरनॅशनल सेंटर फॉर अल्टरनेट डिस्पुट रिसोल्युशन" या प्रयोजनासाठी आरक्षीत करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१अे) अन्वये सुचना.**

**संदर्भ :- १) शासन पत्र क्र. नाशिका-२००७/५७४/नवि-१२, दि. ०१/१२/२००७.**
**२) शासन नगर विकास विभागाकडील सुचना क्र. टिपीएस- १२०७/३५६७/ प्र.क्र.५४/०८, नवि-१२, दि. २२/०२/२००८ (शासन राजपत्रामध्ये दि. २६/०२/२००८ रोजी प्रसिध्द.)**
**३) उप-संचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे पत्र क्र. वियो/मिरा-भाईंदर /कलम-३७(१अे) फेरबदल सुचना/नगकोकवि/६३१,दि. ११/०४/२००८ व दि. २७/०५/२००८**

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजे - उत्तन येथील स.क्र. ३४१० हि जागा आ.क्र. ३३ (महानगरपालिका विश्रामगृह), भागशः आ.क्र. ३२ (बोट क्लब व बगीचा), १८.०० मी. विकास योजना रस्ता यासाठी आरक्षीत असून उर्वरीत जागा भागशः डोंगराळ विभागात व भागशः वाणिज्य विभागात अंतर्भुत आहे.

मौजे - उत्तन येथील स.क्र. ३४१ या जागेचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे एकूण क्षेत्र १४८७००.०० चौ.मी असून ( १४.८७ हे) जागेची मालकी शासनाची आहे. विकास योजनेप्रमाणे जागेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**एकूण क्षेत्र १४.८७ हेक्टर आहे.**

| अ.क्र | विकास योजने प्रमाणे प्रयोजन | आरक्षण क्र. | क्षेत्र ( हेक्टर मध्ये) |
|---|---|---|---|
| १. | महानगरपालिका विश्रामगृह | ३३ | ००.४० |
| २. | बोट क्लब व बगीचा | ३२<br>एकूण क्षेत्र – ९.० हेक्टर | २.६५ |
| ३. | १८.०० मी. रुंद रस्ता | - | ०.९५ |
| ४. | डोंगराळ विभाग (Hill Zone) | - | १०.७७ |
| ५. | वाणिज्य वापर | - | ०.१० |
| | **एकूण** | | **१४.८७** |

उक्त जागेपैकी ५००००.०० चौ.मी (५ हेक्टर) जागा शासनाचे महसुल व वन विभागाने दि. २१/११/०७ रोजी विधी व न्याय विभागाकडे न्यायलयीन प्रशिक्षण केंद्रासाठी मंजूर केली आहे. त्या अनुषंगाने सदर जागेत आ.क्र. ३२ (बोट क्लब व बगीचा) अंशतः बाधीत होत असून त्यापैकी बगीच्याचे २.६५ हेक्टर क्षेत्र बाधित होत आहे. संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये शासनाने सदर प्रस्तावित केलेल्या जागेवरील आ.क्र. ३२ (बोट क्लब व बगीचा) ची अंशतः २.६५ हेक्टर बाधित जागा बदलून इतरत्र ठिकाणी (Relocation) दर्शविण्यात येवून याबाबतची कार्यवाही करण्यासाठी निर्देश दिलेले आहेत.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०६/२००८

**दुखवटा ठराव क्र. १८-१९ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. सुनिता कैलाश पाटील यांचे सासरे त्यांचे दि. २४/०५/२००८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झालेले आहे. तसेच नगरसेवक श्री. प्रेमनाथ ग. पाटील यांच्या मातोश्री कै. आनंदीबाई ग. पाटील यांचे ही वयाच्या ६७ व्या वर्षी निधन झालेले आहे. तसेच आपल्या सभागृहातील नगरसेविका सौ. नयना ग. म्हात्रे यांच्या सासुबाई कै. सावित्रीबाई काशिनाथ म्हात्रे यांचेही वयाच्या ९० व्या वर्षी निधन झालेले आहे आणि आपल्या छोट्या पडद्यावरील कलाकार कै. विहंग नायक ह्यांचे ही अपघाती निधन झाले आहे तसेच माजी राज्यमंत्री ताराबाई वर्तक यांचे दुःखद निधन झालेले आहे तसेच आपले विरोधी पक्ष नेते श्री. चंद्रकांत वैती यांचे चुलत भाउ कै. गजानन श. वैती यांचे निधन झालेले आहे. त्यांचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/०६/२००८

**दुखवठा ठराव २१ :-**

खारी गावातील रहिवाशी कै. सतिश सदानंद पाटील वयाच्या ३५ व्या वर्षी हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने दि. १९/०६/२००८ रोजी निधन झालेले आहे. तसेच गेल्या ७५ वर्षातील मराठी रंगभुमी आणि सिनेनेते जिवंत इतिहास असणारे जेष्ठ अभिनेते मा. चंद्रकांत गोखले यांचे शुक्रवार दि. २०/६/२००८ रोजी पाउणे नउच्या सुमारास हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदन :- श्रीम. सुनिता शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.०९/०७/२००८**

(दि. १८/६/०८ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र .१८ :-** **विषय :- अग्निशमन दलाकरिता दोन फायर टेंडर, एक इन्फ्लेटेबल लाईट टॉवर व एक टिवन ब्लेड कटर खरेदी करणेबाबत...**

**ठराव क्र. २२ :-**

वरील विषयानुसार आपणांस कळवितो की, मिरा-भाईदर शहराची सध्याची ८ लाख एवढी वाढती लोकसंख्या व तयार होणाऱ्या अनेक मजली उंच इमारती, मॉल्स, मल्टिप्लेक्स थिएटर इत्यादी मधील नागरिकांच्या संरक्षणाकरिता अग्निशमन दलामध्ये विषयांकित बाबीचा समावेश करणे आवश्यक आहे.

**अ) साहित्य :-**

अग्निशमन दलास खालील प्रकारचे साहित्य आवश्यक आहे. सदर साहित्याचा तपशिल व अंदाजित खर्च पुढीलप्रमाणे.

| अ.क्र | तपशिल | नग | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १. | इन्फ्लेटेबल लाईट टॉवर | ०१ | ५,००,०००/- |
| २. | ट्विन ब्लेड सॉ कटर | ०१ | ५,००,०००/- |

**ब) वॉटर टेंडर**

सध्या मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात १ अग्निशमन स्थानक असून, मिरा रोड येथे अग्निशमन स्थानक उभारणेचे काम सुरु आहे. मिरा-भाईंदर अग्निशमन दलामध्ये एकूण ३ फायर टेंडर, २ वॉटर टँकर, १ रेस्क्यू टेंडर, १ पिक अप व्हॅन व १ जीप कार्यरत आहेत. सदर वाहनांपैकी वाहन क्र. एम.एच. ०४ एच. ८०४९ हे वाहन १९९७ साली खरेदी करण्यात आले असून १९९९ साली झालेल्या दंगलीत सदर वाहनाची मोठ्या प्रमाणात मोडतोड झाली होती. त्यामुळे सदरचे वाहन बरेच वेळा नादुरुस्त होते व त्यामुळे अग्निशमन कामात अडचणी निर्माण होतात तसेच अग्निशमन सेवेच्या नियमाप्रमाणे वाहनाचे आयुष्यमान १० वर्षे एवढे मर्यादित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचे वाहन १० वर्षे जुने झाल्याने बाद करावे लागणार आहे.

तरी वरील स्थिती लक्षात घेवून अग्निशमन दलाकरिता दोन फायर टेंडर खरेदी करणे आवश्यक आहे. याबाबतचा तपशिल व अंदाजित खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र | तपशिल | नग | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १. | फायर टेंडर (हाय/लो प्रेशर पंपासह व चेसिससह) | ०२ | ७०,००,०००/- |

उपरोक्त प्रस्तावित "अ" कामकरिता रु. १० लक्ष अंदाजित खर्च, "ब" कामाकरिता रु. ७० लाख अंदाजित खर्च येणार आहे. सन २००८-०९ च्या अंदाजपत्रकात अग्निशमन विभागाकरिता **"नवीन वाहने खरेदी व साधन सामुग्री व भांडारे खरेदी"** या शिर्षा अंतर्गत अनुक्रमे रु. ५.२५ कोटी व रु. ५० लक्ष अशी तरतूद आहे. तसेच टाटा ४१० मॉडेल २ अग्नीशमन वाहने खरेदी करण्यात यावी. सिलव्हर पार्क मिरारोड येथे अग्निशमन

दलाच्या ऑफिसचे आरक्षण करुन काम सुरु करण्यासंबधीचे ठराव पूर्वीच झालेला आहे. तरी सुध्दा अद्याप काम सुरु झालेले नाहीत ते ताबडतोब सुरु करणे गरजेचे आहे.

तरी अ व ब मधील उल्लेख केलेली साहित्य व आवश्यक क्षमतेच्या टाटा कंपनीच्या चेसिस खरेदी करुन वाहने बांधणेकामी ही महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- सौ. उमा सपार**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. याकुब कुरेशी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

वरील प्रमाणे साहित्य खरेदी केल्यानंतर त्याची हाताळणी योग्यरित्या होण्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी व शासनाचे परिपत्रकाप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर नेमणूक करण्याकरिता उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा अशी सुचना मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी**

ठराव सर्वानुमते मंजुर

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका.**

# मिरा भाईदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे – ४०१ १०१.

## मा. महासभा, दि. ०१.०७.२००८

(दि. ७/१/६/८ ची तहकुब सभा)

## // ठराव //

**प्रकरण क्र. १९ प्रशासकीय / आर्थिक मंजूरी मिळणे बाबत.....**

**विषय :- वाहन विभागाकरीता ठेका पद्धतीने वाहन चालक घेणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.** २३

महानगरपालिकेतीन सन २००७-०८ या आर्थिक विविध वाहनावरती ठेका पद्धतीने वाहन चालक पुरवठा करणे कामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करून प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. विना ट्रेवल्स यांची निविदा मंजूर करून वाहन चालक पुरवठादार म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यांस मा. स्थायी समिती ठराव क्र. ६१ दि. २५.०६.२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर ठेक्याची मुदत दि. १८.०६.२००८ रोजी संपली आहे. त्यामुळे सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या कालावधी ~~करीता~~ जाहिर प्रसिद्धी करून निविदा मागविणे आवश्यक आहे.

महापालिकेकडे सद्या उपलब्ध असलेले स्थायी वाहन चालक ४५, स.का वाहन चालक ८ व अस्थायी २ (न्याय प्रविष्ठ) असे एकूण ५५ वाहन चालक आहेत. तसेच ठेका पद्धतीने एकूण ६८ वाहन चालक मागविणे आवश्यक आहेत. अग्निशमन विभाग तीन पाळी व्यतिरिक्त आरोग्य व वन विभाग या दोन्ही विभागांना पावसाळी ४ महिन्याकरीता २ पाळीत ठेका वाहन चालकांची वाहनावर गरज पहता महापालिकेकडे उपलब्ध असलेले वाहन चालक अत्यंत अपूरे आहेत. अग्निशमन आरोग्य व पाणी पुरवठा या सेवा महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवा असून त्यांचा सबंध थेट नागरीकांच्या जिवनमानाशी निगडीत असतो. त्यामुळे अपुऱ्या वाहनचालकांमुळे सदर विभागातील वाहने बंद करणे शक्य नाही.

सन २००८-०९ अर्थ संकल्पातील एकूण ३०,००,०००/- इतकी तरतूद करण्यांत आलेली आहे. सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या कालावधी करीता महापालिकेच्या आवश्यकतेनुसार ठेका पद्धतीवरील वाहन चालक / ऑपरेटर पुरवठा करणे कामी प्रशासकीय / आर्थिक मंजूरी ही महासभा देत आहे. असा मी ठराव मांडत आहे। तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू ठेकेदारास मुदतवाढ देण्यात येत आहे। [illegible]

सुचक :- श्री राजेश शंकर वेतोसकर    अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२००८

**प्रकरण क्र. २० :-** महानगरपालिका वाहनांची दुरुस्ती / देखभाल करणेकरिता वार्षिक ठेका देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

(सदर विषय मा. महापौर सो. यांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ९/७/२००८

(दि. ३०/६/२००८ ची तहकुब सभा)

# //ठराव//

क्र. २१

**विषयः महापालिकेचे मार्केट गाळे भाड्याने देण्याबाबत**

६ २६

मिरा-भाईदर मंजूर विकास योजनेचे भाईदर (प) येथील आरक्षण क्रंमाक ९७ हे मार्केट साठी आरक्षित असून विकास नियंत्रण नियमवाली तरतूदी मधील समावेश आरक्षणाच्या माध्यमातून सदर आरक्षणमधील ८१९.०१ चौ.मी.(८८१४.६९चौ.फुट) क्षेत्र बांधून महापालिकेस हस्तांतरीत केले आहे. सदर बांधील क्षेत्रात जवळपास ८७ ऐवढे गाळे प्रस्तावित आहेत. सदर प्रकरणामध्ये महापालिका प्रशासनाने मिळवलेल्या गाळ्याचे नकाशेची छायपत्र व एकूण मार्केट साठी दिलेल्या परवानगी नकाशांची सत्यप्रत जोडलेली नाही. तसेच मुंबई महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क,ड) अन्वये आयुक्त महापालिकेच्या मंजूरीने महापालिकेच्या मालिकेचे कोणतेही स्थावर व जंगम मालमत्ता,पट्टयाने देता येईल,विकता येईल,आयूक्त ज्या जंगम मालमत्तेचे मूल्य ५०००/- मूल्याहून अधिक नसेल अशी मालमत्ता स्थायी समीतीच्या मंजूरीने देता येते.त्याच प्रमाणे जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकिची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल,पट्टयाने देता येईल,किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमूल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमती पेक्षा कमी असता कामा नये.

पण मार्केट गाळे भाड्याने देण्याबाबत महापालिकेच्या अधिनियमाचा उल्लेख केलेला नाही,तसेच भाडेदर,अनामत रक्कमेचा डिपोझिट रक्कमेचा कोणताही उल्लेख न झाल्याने सदर गाळे प्रथम कोणत्या व्यक्तीला किंवा व्यापारयांना प्रथम देण्यात येईल व यांची सविस्तर गोषवारा दिला गेला नाही, तरी सदरचा विषय पुर्ण गोषवारासह पुढील महासभेत आणावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- स्नेहा शैलेश पांडे (सही)

अनुमोदक श्री रामनारायण दुबे (सही)

(सही)
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२००८

**प्रकरण क्र. २३ :-** महानगरपालिका मालकीच्या १०१ सदनिका वार्षिक भाडयाने देणे.

**ठराव क्र. २४अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे नवघर येथील आरक्षण क्र. २२२ व २२२(अ) (हासिंग फॉर डिस हाउस) बेघरांसाठी घरे बांधण्यासाठी राखीव करण्यांत आला आहे. विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर भुखंडाचा विकास विकासकाकडून समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून करण्यांत येणार होता. सदर आरक्षणातून एकूण - १४१ सदनिका प्रत्येकी १८० चौ. फुट बांधून मिळणे आवश्यक होते. मात्र आजमितीस फक्त ७१ सदनिका उपलब्ध झाले असून सुमारे ७० सदनिका प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणी झालेल्या नाहीत. उपलब्ध असलेल्या सदनिका महानगरपालिकेने आपले ताब्यात हस्तांतरीत करुन घेतल्या पाहिजे. त्याची नोंद करुन व तसे घोषीत करुन त्याची नोंद महापालिकेची मालमत्ता म्हणून होणे गरजेचे आहे.

तसेच महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ / (क,ड) आयुक्त महापालिकेच्या मंजूरीने महापालिकेच्या मालकीचे कोणतेही स्थावर व जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल. आयुक्त जंगम मालमत्तेचे मुल्य ५००० रु. मुल्याहून अधिक नसेल अशी मालमत्ता स्थायी समितीच्या मंजरीने देता येते. त्याच प्रमाणे जो मोबदला देवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्ट्याने देता येईल किंवा हस्तांतर करता येईल तो मोबदला असे विनामुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमती पेक्षा कमी असता कामा नये.

एकूण शहराच्या विकास आरखड्याचा विचार करता अनेक आरक्षणे प्रस्ताविक होणेचे आधीपासून ते आरक्षणात व डी. पी. रोड मध्ये अनेक व्यापार, उद्योग व घरे आहेत. ही आरक्षणे विकसीत करावयाची झाल्यास वा डी. पी. रोड विकसीत झाल्यास ज्यांना त्या आरक्षणातून बाधित होवून विस्थापित व्हावे लागेल. त्या प्रकल्पग्रस्तांना / विस्थापितांना वेळोवेळी अशा सदनिका राहणेसाठी उपलब्ध करुन देता येतील. प्रकल्पग्रस्तांसाठी ही मालमत्ता उपलब्ध करुन द्यावी. सदरची मालमत्ता महानगरपालिकेच्या मालकीची राहीली पाहिजे. अन्यथा त्याची विक्री अथवा त्याच्या वापरात बदल होण्याची शक्यता राहील. मा. महासभेत शिफारस करण्यात येते की, उर्वरित ७० सदनिका तातडीने उपलब्ध करुन द्यावी व ही घरे ज्या उद्देशासाठी उपलब्ध केली आहेत त्याचा उपयोग त्याच उद्देशासाठीच करण्यात यावा.

**सुचक :- श्रीम. विजया वैती** **अनुमोदक :- श्रीम. दिप्ती भट**

**सुचक सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैती आणि अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

सदर आरक्षण हे बेघरासांसाठी घर (Housing for Dishoused) असल्याने महानगरपालिका रस्ते, गटारे विस्तारीत किंवा विकास करणे किंवा नगरपालिकने इतर आरक्षण विकसित करताना त्यामध्ये बाधीत होत असलेल्या इमारती / बांधकामे काढून टाकताना त्यामुळे होणाऱ्या विस्थापीत / बेघरांसाठी ह्या आरक्षणात जागा देता येतील याकरिता विकास नियंत्रण नियमावलीत त्याप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येते. त्यानुसार प्रशासनाने गोषवारा तयार करुन सदर सदनिका पुढे वाटप करण्यासाठी विषय महासभेपुढे आणावा.

**सुचनेसह ठराव मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

46

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ~~१९/०६/२००८~~ ९/७/२००८**
(दि. १९/६/२००८ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र . :- २४**

**ठराव क्र २५ :-**

**विषय :- मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये हॉस्पीटल इमारत तयार असुन त्यामध्ये कोण-कोणत्या सेवा देणे तसेच कर्मचारी आकृतीबंधाबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणेबाबत...**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्र. १९२, १९३ पेणकरपाडा गाव, मिरारोड येथे रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर रुग्णालयामध्ये साधारणतः ५० खाटा उपलब्ध होणार आहेत. मिरा-भाईदर शहराच्या विकासामध्ये मौलाचा दगड ठरणारे व मिरा-भाईदर मधील रहिवाशीयांना वरदान ठरणारे असे सर्व सुख सोयीनियुक्त असे सरकारी इस्पितळ, रक्तपेढी, पॅथोलॉजी, वाचनालय, शवगृह व प्रभाग कार्यालय मिरारोड मध्ये मा. आमदार मुझफ्फर हुसैन व महानगरपालिका यांच्या प्रयत्नातून होत आहे. मा. आमदार मुझफ्फर हुसैन यांनी हि जागा इस्पितळासाठी आरक्षित करण्यासाठी १५ वर्षे राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. त्यासाठी मिरा-भाईदर मधील जनतेच्या ते अभिनंदनास पात्र आहेत. मिरा-भाईदर मधील जनतेचे हित लक्षात घेवून आपल्या आमदार निधीतून रु. ८०.६८ लाख या इस्पितळासाठी दिल्याबद्दल मिरा-भाईदर मधील जनता सदैव त्यांची ऋणी राहील. त्याचप्रमाणे आ. फौजीया खान १ लाख आ. गणेश नाईक यांनी रु. २९.९८ लाख यांनी ही अशाप्रकारे आमदार निधी दिलेला आहे.

या अनुषंगाने प्रस्तावित रुग्णालयामध्ये विविध वैद्यकीय विभाग सुरु करण्यात येऊ शकणार आहेत. यामध्ये बाह्यरुग्ण विभागामध्ये मेडीसीन विभाग, अपघात विभाग, शस्त्रक्रिया विभाग, बालरोग विभाग, स्त्री रोग व प्रसुती विभाग व आंतररुग्ण विभागामध्ये अपघात रुग्ण वॉर्ड (मलम पट्टी /टाके देणे / प्लास्टर इ.) पुरुष वॉर्ड, स्त्री रोग, प्रसुती व बालरोग रुग्ण वॉर्ड त्याचप्रमाणे क्ष-किरण, प्लास्टर रुम, वातानुकूलित शवगृह, केस पेपर कक्ष, औषधवाटप कक्ष, प्रयोगशाळा, मुख्य औषधसाठा कक्ष, डायलेसिस युनिट, प्रशासकीय कार्यालय प्रसुती कक्ष, शस्त्रक्रिया गृह, सोनोग्राफी कक्ष हे विभाग स्थापन करण्यांत येवू शकणार आहेत, व रुग्णांना विविध वैद्यकीय सेवा व उपचार देण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणे उपरोक्त वैद्यकीय सेवा देण्याकरीता तसेच विभाग स्थापन करण्याकरिता साहित्य व फर्निचर यांची आवश्यकता लागणार आहे. तसेच शस्त्रक्रिया गृहासाठी Boyle's Apparatus , Multipara. Laryngo scope, Operation table, OT Lights. Defibrillator इत्यादी उपकरणे आवश्यक आहेत. तसेच प्रयोगशाळे करीता Microscope. Water bath, Hot air oven. Semi auto analyzer. Cell counter, lab Chemicals इत्यादी, क्ष-किरण व सोनोग्राफी विभागासाठी X-ray Machine 300 MA/500 MA.Portable X-ray

Machine , Sonography Machine and Gynac & Vaginal Probes इत्यादी, प्रसुती कक्षासाठी Sim's speculum and retractor इत्यादी डायलिसिस युनिट करीता डायालिसिस मशीन, रॉ वॉटर प्लॅन्ट, क्रॅश कार्ट/डिफिब्रिलेटर इत्यादी उपकरणे आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे जनरेटर, ऑक्सीजन यंत्रणादेखील आवश्यक आहे. रुग्णांसाठी IV fluids Antibiotics, Injections इत्यादी. औषधे आवश्यक आहेत, त्याकरिता रु. ६० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच साहित्य, फर्निचर उपकरणे याकरिता अंदाजे रु. १३५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

रुग्णालयासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग नेमणे करीता शासन निर्णय क्र. जॉबप्र-२००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४, दि. २३/१२/२००२ नुसार ३५ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. उपरोक्त ५० खाटाच्या रुग्णालयाकरिता आवश्यक असणारा काही अतांत्रिक कर्मचारी वर्ग आवश्यकतेप्रमाणे महानगरपालिकेतील कार्यरत कर्मचाऱ्यांमधून नियुक्तीकरुन भरता येईल. सदर कर्मचारी वर्ग ठोक मासिक वेतनावर नेमल्यास महानगरपालिकेला वर्षाला साधारणतः रु. ३३ लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे डायलिसिस युनिट करीता मानधनावर ०७ कर्मचारी आवश्यक असून त्यासाठी वर्षाला रु. ७ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

रुग्णालयात उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांकडून वैद्यकीय शुल्क आकारण्यात येते. त्याकरिता खालील तक्त्याप्रमाणे शासनाचे दर व मनपाचे प्रस्तावित दर यांची माहिती देण्यात आली आहे.

| अ.क्र. | वैद्यकीय शुल्क | शासन दर (रु.) | मनपाचे प्रस्तावित दर(रु.) |
|---|---|---|---|
| १. | बाह्य रुग्ण नोंदणी (सात दिवसाकरिता) | ५ | १० |
| २. | अंतररुग्ण शुल्क प्रतिदिन | १० | २५ |
| ३. | प्रयोगशाळा चाचण्या | १५ | २५ |
| ४. | लघवी, शौच ओपोडी चाचण्या | २० | २० |
| ५. | इतर विशेष रक्त चाचण्या | २० | २५ |
| ६. | मलेरिया रक्त तपासणी | निशुल्क | निशुल्क |
| ७. | सायटॉलॉजि | ३५ | ५० |
| ८. | हिस्टोपॅथॉलॉजि | ३५ | ५० |
| ९. | एलायजा | ५० | निशुल्क |
| १०. | कलचर सेन्सेटिव्हीटी | ४५ | ४५ |
| ११. | प्रेगनन्सी टेस्ट | ४५ | ४५ |
| १२. | क्ष-किरण चाचणी | ३० | ३० |
| १३. | आ.व्ही.पी | १०० | १०० |
| १४. | बेरियम स्वॅलो | ३० | ५० |
| १५. | बेरियम मिल | ५० | ५० |
| १६. | बेरियम एलिमा | ५० | ५० |
| १७. | अल्ट्रा सोनोग्राफी पूर्ण | ५० | ५० |
| १८. | अल्ट्रा सोनोग्राफी अर्धा | ३० | ५० |
| १९. | अल्ट्रा सोनोग्राफी विशेष | १०० | १०० |
| २०. | इ.सी.जी. | २० | २० |
| २१. | भुल देऊन करण्यात येणारी मोठी शस्त्रक्रिया | १६० | २०० |
| २२. | भुल देऊन करण्यात येणारी छोटी शस्त्रक्रिया | ६० | १०० |
| २३. | बाह्यरुग्ण विभागात करण्यात येणाऱ्या छोट्याशा शस्त्रक्रिया | ३० | ५० |
| २४. | पहिले बाळंतपण | निशुल्क | निशुल्क |
| २५. | दुसरे बाळंतपण | ५० | ५० |
| २६. | तिसरे बाळंतपण | २५० | २५० |
| २७. | हिमोडायलेसिस (प्रत्येकी) | १५० | १५० |
| २८. | पेरिटोनियल डायलेसिस (प्रत्येकी) | ५० | ५० |
| २९. | बायोप्सी | ५० | ५० |

(३ ४८

अशाप्रकारे मिरारोड येथील रुग्णालय, डायलेसिस युनिट, शवागृह याकरिता आवश्यक विभाग, कर्मचारी वर्गाची नेमणुक, त्यांचे ठोक मासिक वेतन, वार्षिक वेतन खर्च व रुग्णांकडून आकारण्यात येणारे विविध वैद्यकीय शुल्काचे दरास तसेच साहित्य, फर्निचर, उपकरणे व औषधे खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीचा प्रस्ताव पदनिर्मितीसाठी शासनाकडे पाठविणेस हि सभा मंजूरी देत आहे. त्याचप्रमाणे मा. महासभा दि. १८/०५/२००६ ठराव क्र. २० मध्ये ठरल्याप्रमाणे प्रभाग कार्यालय बांधण्यासाठी सुध्दा ही महासभा मंजूरी देत आहे असा ठराव मी मांडीत आहे.

सुचक :- अनिल दिवाकर सावंत अनुमोदक :- दिनेश दगडू नलावडे

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका.**

# मिरा भाईदर महानगरपालिका

## विशेष मा.महासभा दि. २१/०६/ २००८

**प्रकरण क्र . २५ :- जकात कर वसुलीचा कालावधी संपल्यानंतर मुद्त वाढ देण्याबाबत.**

**ठराव क्र. २० :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, "ड" वर्ग महानगरपलिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईदर महानगरपालिकेने आवश्यकती पुर्व तयारी सुरु केली आहे. मिरा भाईदर महानगरपालिकेचा सन् २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि.२२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वतः ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासुन उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्याची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही. त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र.४२ दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३४ दि.१९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु.९२ कोटी प्रमाणे प्रति हफ्ता येणारी रक्कम रु.१,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याऐंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरण्याच्या अटीवर जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा.लि. यांना मुदत वाढ देणे योग्य राहील.

सदर मुदतवाढ दि.२३/०६/२००८ ते दि.३१/०७/२००८ पर्यंत ३९ दिवसांसाठी असून या कालावधीसाठी एकूण रक्कम रु.९,८३,०१,३७२/- (रु. नऊ कोटी त्र्याऐंशी लाख एक हजार तिनशे बहात्तर मात्र) एवढी महानगरपालिकेस मिळणार आहे. यास्तव जकात दर वाढीची नोटीस प्रसिध्दी करुन व सदर प्रकरण विशेष महासभेला ठेवून अंतिम मंजुरी घेवुन दि.३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे.कोणार्क.इन्फ्रा.लि. यांना मुद्त वाढ देवुन कार्यादेश देण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र. १८ दि.१७/०६/२००८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर ठेकेदार मे.कोणार्क .इन्फ्रा.लि. यांना दि.२३/०६/२००८ ते दि. ३१/०७/२००८ पर्यंत किंवा उपकर लागू होईपर्यंत जकात वसुली करण्यास मुद्त वाढ देवुन कार्यादेश देण्यास विशेष मा. महासभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन गो. पाटील**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सुचना मांडली ती खालील प्रमाणे.**

जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा. लि. यांना दि. ३१/७/२००८ पर्यंत जकात वसुलीची ठेक्याची मुदतवाढ देताना कोणतीही जकात दरवाढ न देता मागील दराप्रमाणेच ठेकेदाराने जकात वसुली करावी. ठेकेदाराने त्यामध्ये नियमाप्रमाणे १० टक्के जास्त वसुलीची रक्कम महानगरपालिकेस द्यावी.

मुदतवाढीच्या काळात ठेकेदाराने आयातिकांवर कोणतेही जकात दरवाढ / गैरवसुली केल्यास त्याच्यावर कारवाई करण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. त्यामध्ये सर्व पक्षांचे १ सदस्य घेउन त्या समितीचे प्रमुख उपायुक्त यांना नेमण्यात यावे व मुख्य जकात नाक्यावर तक्रारींची नोंद घेण्यासाठी क्लास-२ दर्जाच्या अधिकाऱ्याची २४ तास नेमणूक करावी.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील** **अनुमोदन :- श्री जुबेर इनामदार**

सन्मा. सभागृहाने दिलेल्या मान्यतेनुसार मागील रक्कमेत १० टक्के वाढ करुन कोणतीही जकात दरवाढ न करता तसेच मुळ ठरावाचे सुचक श्री. जयंत पाटील यांनी मांडलेल्या ठरावानुसार सदर ठेकेदार मे.कोणार्क. इन्फ्रा.लि. यांना दि. २३/०६/२००८ ते दि. ३१/०७/२००८ पर्यंत किंवा उपकर लागू होईपर्यंत जकात वसुली करण्यास मुदत वाढ देण्यात यावी.

**ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०७/२००८

**दुःखवटा ठराव २६ :-**

या शहरातील प्रसिध्द स्वातंत्र सेनानी माजी जिल्हा परिषद सभापती कै. मोरेश्वर नारायण पाटील यांच्या धर्मपत्नींचे काल अल्पशा आजाराने निधन झाले. तसेच खारीगावातील रहिवासी कु. मोहिनी उर्फ (मोना) रविंद्र माळी हिचे दि. २१/०६/२००८ रोजी टीबी या आजाराने निधन झाले. त्याचप्रमाणे विरार (पश्चिम) बोळींज, रानपाडा गावातील माजी सरपंच तसेच ठाणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मा. श्री. जनार्दन हरेश्वर घरत वयाच्या ५५ व्या वर्षी किडणीच्या आजाराने दि. २६/०६/२००८ रोजी निधन झाले तसेच रॉड्रीक्स ह्यांचे वडील फ्रान्सीस रॉड्रीक्स यांचे निधन झाले तसेच मिरा गावामध्ये राहणारे, मिरा सदनमध्ये राहणारे जॉन बास्को यांचेही दि. ३०/०६/२००८ रोजी निधन गॅस लिकेजमुळे झालेले आहे. आणि फ्रान्सीस जुमीत रॉड्रीक्स हे काशी गावामध्ये राहणारे यांचे ही दि. २०/०६/२००८ रोजी निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०७/२००८

**अभिनंदन ठराव २७ :-**

आपल्या महानगरपालिका हद्दीतील तात्कालीन भाईंदर पूर्व येथील नवघर ग्रामपंचायत सदस्य श्री. नारायण उर्फ प्रमोद चितारी, भाईंदर (पूर्व) यांनी त्यांच्या मालकीच्या चितारी टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल मार्फत काश्मीर प्रांतातील सियाचीन व भारत, पाकीस्तान बॉर्डरवरील आझाद काश्मीर येथील बॉर्डरवरील दुर्गम भागात दि. २२ जुन २००८ रोजी पर्यटकांना घेउन जाणारा भारतातील तसेच जगातील पहिला पर्यटक म्हणून बहुमान मिळविला. याबद्दल त्यांना दि. २२ जुन २००८ रोजी काश्मीर सरकारतर्फे प्राईड ऑफ काश्मीर पुरस्कार देउन गौरव करण्यात आले होते. तसेच दि. १४ जुन २००८ रोजी नॅशनल कॉन्फरन्स या पक्षातर्फे माजी मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांच्या हस्ते कश्मिररत्न हा पुरस्कार देउन गौरविण्यात आले होते. तसेच दि. २८ मे २००८ रोजी प्रथम पर्यटक म्हणून स्थानिक आमदार व स्थानिक रहिवाशी यांचे म्हणून त्यांचा काश्मिरमध्ये सत्कार करण्यात आला होता. ते आपल्या मिरा भाईंदर हद्दीतील नागरिक तसेच नवघर नवघर ग्रामपंचायतीचे सदस्य असल्यामुळे मी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव येथे मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. अनंत पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२००८.

प्रकरण क्र. २६ :- दि. १९/०३/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २८ :-

दि. १९/०३/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२००८

52

प्रकरण क्र. २७ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करणे आणि ना-फेरीवाला क्षेत्रामधील फेरीवाल्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये काढून टाकणे.

ठराव क्र. २९ :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये विना परवानगी चालू असलेल्या फेरीवाल्यांना व सार्वजनिक ठिकाणी विक्री करणाऱ्या व्यक्तींना नोटीस न देता काढुन टाकण्याची तरतुद आहे. अशाप्रकारे महानगरपालिका हद्दीत कार्यवाही करणेपूर्वी फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र ठरविणे आवश्यक आहे. तसेच शहरातील जनतेच्या अडचणीचा व रहदारीचा विचार करता शहरातील काही भाग हा फेरीवाला मुक्त करणे आवश्यक आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्राचे धोरण ठरविताना यापूर्वी याबाबत वेळोवेळी झालेल्या मा. स्थायी समिती व मा. महासभेच्या निर्णयाचा तसेच या विषयी स्थापन करण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या समितीच्या अहवालाचा विचार करता विभाग निहाय खालीलप्रमाणे फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्र करावे.

### १) भाईंदर (पश्चिम) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोदी पटेल नाका ते भाईंदर सेकंडरी स्कुल ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान) | डॉ. आंबेडकर रोड महावीर अपार्टमेंट ते विनायक पॅलेस रस्त्यापर्यंत. |
| २ | पोलिस स्टेशन भाईंदर रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता. | राम मंदीर मार्ग पोलिस स्टेशन ते जैन मंदीर पर्यंत. फुटपाथवर बैठकी विक्रेते |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुट रोड) बावन जिनालय जैन मंदिर ते बनी पॅलेस पर्यंतचा रस्ता. | शास्त्री नगर रस्त्याची डावी बाजू. रेल्वे फाटक समोर कमला पार्क व वालचंद कॉम्पलेक्स. |
| ४ | बावन जिनालय परिसर. | प्रकाश मार्केट ते जोशी निकेतन रस्त्याची उजवी बाजू. रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रेते गुरुकृपा बिल्डींगपर्यंत. |
| ५ | जे. एच. पोद्दार हायस्कूल रोड. | चर्च ते महानगरपालिका कार्यालय (जूने) (मिना बाजार ते मोती नगर) |
| ६ | महाराजा अग्रसेन मार्ग. | भाईंदर (प.) येथे आठवड्याच्या बाजाराकरीता वरील दिलेल्या रस्त्यांवर फेरीवाले बसवता येण्यांस परवानगी देण्यांत येत आहे. |
| ७ | जयप्रकाश नारायण मार्ग. | सदासत्य अपार्टमेंट ते अमृतवाणी अपार्टमेंट रस्त्याच्या डाव्या बाजूस. |
| ८ | स्टेशन रोड ते बालाजी वसाहत ते रेल्वे पादचारी पुल, विनायक मंदीर मार्ग. | |
| ९ | भाईंदर स्टेशन ते पोलीस चौकी. | |
| १० | जनता नगरकडे जाणारा रस्ता. | |
| ११ | राममंदीर रोड | |
| १२ | मोदी पटेल रोड | |
| १३ | जैन मंदीरच्या बाजूने देवचंद नगरकडे जाणाऱ्या दोन्ही गल्ली. | |
| १४ | टेंभा हॉस्पीटल रोड | |

| | | |
|---|---|---|
| १५ | ९० फुट रोड, रजिस्ट्रेशन ऑफिस समोरचा रस्ता | |

## २) भाईंदर (पूर्व) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका ते गोडदेव उद्यान सभोवताली (बी. पी. रोड) | भाजी मार्केट खारीगाव. |
| २ | गोडदेव नाका ते नवघर नाका, गोडदेव तलाव परिसर, गोडदेव नाका ते अभिनव नाका नवघर फाटक रोड दोन्ही बाजू. | नवघर गावाजवळ इंदीरा नगरकडे (कुणाल कुटीर ते नवघर स्मशान रस्त्याची उजवी बाजू). |
| ३ | बंदरवाडी नाका ते कुणाल कुटीर नवघर रोड. (नवघर नाका) | नवघर गावाकडे जाणारा रस्ता. |
| ४ | बंदरवाडी नाका ते हॉटेल प्रशांत (रेल्वे समांतर रस्ता) | इंद्रवरुण हॉल ते रेल्वे समांतर खाडी पर्यंत |
| ५ | साई बाबा मंदीर ते गोडदेव नाका (गोडदेव फाटक रोड) | आर. एन. पी. पार्क चिंतामणी अपार्टमेंट. |
| ६ | बंदरवाडी नाका ते जेसल पार्क जैन मंदीर पर्यंत. | परब मसाले ते साधुराम हॉटेल. |
| ७ | भाईंदर (पूर्व) फाटक चर्च ते केबीन रोड | नर्मदा कुंज (रावल नगर) ते सुलभ शौचालय उजवी बाजू. |
| ८ | पानटेकडी रोड (शिर्डी नगर रोड ते गोडदेव स्मशान भूमी रोड) | राम गोपाल बिल्डींग ते शितल अपार्ट. रस्त्याची उजवी बाजू. |
| ९ | केबिन रोड नाका ते नर्मदा नगर मधून एम. आय. उद्योग नगर पासून अभिनव स्कूल नाका पर्यंत जाणारा रस्ता. | हनुमान नगर एक बाजू. |
| १० | नवघर क्रॉस रोड. | |
| ११ | भाईंदर (पूर्व) विजय पंजाब ते खारीगाव सत्यनारायण मंदीर ते रामगोपाल सदन केबीन रोड पर्यंत. | |
| १२ | इंद्रवरुण हॉल ते जैन मंदिराची एक बाजू. (जेसल पार्ककडे जाणारा एक रस्ता) | |
| १३ | खारी तलाव रोड | |
| १४ | बंदरवाडी नाका ते जैन मंदीर डीवाईन शेल्टर/ कपूर टॉवर पर्यंत. | |
| १५ | कै. दत्तु म्हात्रे मार्ग (न्यु गोल्डन नेस्ट १०० फुटी रोड) | |
| १६ | दिपक हॉस्पीटल मार्ग. | |
| १७ | हनुमांन मंदिर ते एस.एन. कॉलेज. | |
| १८ | राहूल पार्क ते आर.एन.पी. पार्क. | |
| १९ | जागृती अपार्टमेंट ते रावल नगर ते नर्मदा कुंज. | |
| २० | नवघर क्रॉस रोड (एस.व्ही. रोड) | |
| २१ | नारायण मार्बल ते आयुक्तांच्या बंगल्या रस्ता | |
| २२ | धनेश हॉटेल ते तलाव रोड ते गांवदेवी मंदिर परिसर. | |
| २३ | साईबाब नगर किरण नाला (नवघर क्रॉस रोड) | |

## ३) मिरारोड विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.) फाटक ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या पर्यंत. | नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग समोर फक्त |
| २ | शांतीनगर संकुलनाचे प्रवेशव्दार ते एस.के. स्टोन पर्यंतचा रस्ता. | नरेंद्र पार्क इ-५ बिल्डींग ते मेघदुत बिल्डींग पर्यंत. |
| ३ | मिरारोड स्टेशन पासून नयानगरकडे जाणारा रस्ता. | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. २ व १० मधील एक बाजू. सेक्टर-२ च्या बाजूची. |
| ४ | पोस्ट ऑफीस राजधानी अपार्ट. ते नाल्यापर्यंतचा रस्ता. | नया नगर रोहित बिल्डींग ते सिता पार्क गेट पर्यंत एक बाजू. |
| ५ | मेडतीया नगर / चंद्रेश निकेतन बिल्डींग लोढा कॉम्पलेक्स ते कुरनाल शॉपींग सेंटर आणि उलफत | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. ३ आणि ७ मधील एक बाजू. सेक्टर-३ च्या बाजूची. |

54

| | | |
|---|---|---|
| | मझील पर्यंत. | |
| ६ | शांतीनगर सेक्टर ११ पाण्याची टाकी ते सृष्टीकडे जाणारा रस्ता. | पुजा नगर समोर डॉक्टर गल्ली एक बाजू. |
| ७ | मिरा रोड स्टेशन शांतीनगर गेट ते शितल नगर नाकापर्यंत | शांतीनगर सेक्टर-६ व फेस-३ मधील एक बाजू. सेक्टर-६ च्या एक बाजू. |
| ८ | मिरारोड स्टेशन नयानगर रिक्षास्टँड ते शितल नगर नाकापर्यंत | नीदा पार्क ते लेजेसी बिल्डींग पर्यंत एक बाजू. |
| ९ | पोस्ट ऑफीस मिरा रोड ते शांतीनगर सेक्टर क्र. १ ते ४ मधील दोन्ही बाजू | सेक्टर नं. ५ सी-३८ कार्नर ते बी-२६-२७ एक बाजु. |
| १० | शांती नगर सेक्टर क्र. ३ ते ६ मधून सृष्टीकडे जाणारा रस्ता दोन्ही बाजू. | |
| ११ | शितल नगर नाका ते जांगीड कॉम्प्लेक्स दोन्ही बाजू. ते सिल्वर पार्क सिग्नलपर्यंत दोन्ही बाजू. | |
| १२ | सेक्टर नं. ६, बी-१ ते अे-७ पर्यंत एक बाजू. | |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. १ व २ मधील रस्ता | |
| १४ | शांतीनगर सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| १५ | मिरारोड पूर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स मधील अंतर्गत रस्ता | |
| १६ | गणपती मार्बल ते रामदेव पार्क पर्यंतचा रस्ता. | |
| १७ | शांतीनगर सेक्टर नं. ३ व ४ मधील रस्ता | |
| १८ | सृष्टी सेक्टर नं. ५ व ३ मधील रस्ता | |
| १९ | सृष्टी सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| २० | रॉयल गार्डन हॉटेल ते सिल्वर पार्क सिग्नल पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला. | |
| २१ | मिरारोड पूर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग शेवटच्या दुकानापासून ते अस्मिता व्हिनटेज पर्यंत दोन्ही बाजू. | |
| २२ | नयानगर हैदरी मस्जिद ते संघवी एम्पायर पर्यंत. | |
| २३ | मिरारोड पूर्व नयानगर मिरा नर्सिंग होम गल्ली झुबेदा बिल्डींग ते ऑर्चीड बिल्डींग पर्यंत दोन्ही बाजू. | |

## ४) काशीमिरा, मिरा गावठण व इतर हायवे लगत क्षेत्र

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | मिरा गावाच्या हायवे लगतचा रोड. | मिरागाव टॅक्स ऑफिस पासून ते पटेल प्लाझा इमारती पर्यंत. |
| २ | मिरा गावाकडे जाणारा रस्ता. | |
| ३ | निलकमल ते लिबर्टी तबेल्यापर्यंत जाणारा रस्ता ते गांवदेवी मंदिर मार्ग. | |
| ४ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८. (दहिसर चेकनाका ते वर्सोवा नाका) | |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापसून ते उड्डाण पुलापर्यंत मिरा भाईंदर मुख्य रस्ता व फाटक पर्यंत. | |

**मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ३० फुट व त्यापेक्षा रुंद असणारे सर्व रस्ते ना फेरिवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावा.**

वरील प्रमाणे महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेत आले आहे. ना-फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसण्यांस मनाई असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये ना-फेरीवाला क्षेत्रातील बसणाऱ्या फेरीवाल्यांना त्याठीकाणाहुन काढून टाकण्यांत यावे. अशा फेरीवाल्यांकडुन जप्त केलेले साहित्य, सामान त्यांना परत न करता त्यांच्यावर दंडात्मक कायदेशीर कारवाई करावी.

मिरा रोड ते चेणा विभागातील मिरा रोड येथे भरणारा आठवडी सोमवार बाजार व उड्डाण पुलावजवळ भरणारा आठवडी शनिवार बाजार यामुळे रहदारीस व वाहतुकीस अडचण व होणाऱ्या चोऱ्या, वाढणारे प्रदुषण, यामुळे या बाजारा विषयी नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. तेव्हा ते दोन्ही बाजार ताबडतोब बंद करावेत.

भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड ते चेणा विभागाकरीता लिलाव पद्धतीने बाजार फी वसूलीचा मक्ता देण्यांत आला आहे. मक्ता देताना ज्या अटी-शर्ती ठरविण्यांत आल्या आहेत. त्या अटी-शर्ती नुसार ज्या भागात फेरीवाल्यांना बसण्यांस परवानगी देण्यांत आली आहे. त्या व्यतीरीक्त अन्य सर्व ना-फेरीवाला क्षेत्र, सार्वजनिक रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कराराचा भंग केला म्हणून दंडात्मक कायदेशीर कारवाई करावी.

महानगरपालिका क्षेत्रात ज्या ठीकाणी फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यांत आले आहे. त्या क्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांच्या निर्णयाच्या अधिन राहून फेरीवाला क्षेत्रासाठी प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी.

**सुचक :- श्री. लक्ष्मण गणपत जंगम** **अनुमोदक :- श्री. राजेश शंकर वेतोस्कर**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे**

**भाईंदर (प.) विभाग**

**फेरिवाला क्षेत्र**

(१) बाबासाहेब आंबेडकर मार्ग, महावीर अपार्टमेन्ट ते (सालासर) विनायक पॅलेस बिल्डींग पर्यंतचा रस्ता.
(२) रेल्वे फाटक समोरील रस्त्यावर कमला पार्क व वॅालचंद कॉम्प्लेक्स पर्यंत.
(३) या शिवाय सर्व भाग ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावेत.

**ना फेरिवाला क्षेत्र**

(१) भाईंदर (प.) विनायक पॅलेस जैन मंदिरच्या बाजूने देवचंदनगरकडे जाण्याच्या दोन्ही गल्ल्या.
(२) चर्च ते महानगरपालिका (जुने) हे दोन्ही ना फेरीवाला क्षेत्रामध्ये समाविष्ट करावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. वंदना चक्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

प्रभाग क्र. ७१ विजयपार्क ते शिवपुजा बिल्डींग व पंजाब नॅशनल बँक या रस्त्यावर फेरीवाला क्षेत्र नमुद करावे ही विनंती

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

दहिसर चेक नाक्यावरुन पेणकरपाड्याकडे जाणारा रस्ता (सागर हॉटेल ते बॉम्बे बॉटल कंपनी पर्यंतचा रस्ता फेरीवाला झोन करण्यात यावा.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रामध्ये गावदेवी मंदिर मार्ग (जरीमरी तलाव रोड, काशिमिरा) नमुद करण्यात यावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

नर्मदा कुंज (रावलनगर) ते सुलभ शौचालय येथे बसवू नये.

**सदर ठरात सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रात नमुद नसलेल्या रस्त्याच्या एकतर्फी फेरीवाले बसवावे. राममंदिर भाईंदर (प.) येथे फेरीवाले हटवून नाझरेथ चर्चच्या बाजूने मोतीनगर येथे जाणारा रस्ता फेरीवाले बसवणे. फेरीवाला क्षेत्रात बसणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येवू नये. तसेच शिवार गार्डन पासून पुढे सरदार वल्लभभाय शाळेकडे जाणाऱ्या शिवार गार्डनच्या लागून असलेल्या बाजूस फेरीवाले बसवणे. तसेच १ महिन्या अगोदर बाजार लिलावाचा ठेका दिला आहे. त्यात या जागा, रस्ता यांचा समाविष्ट करावा अशी सुचना मी मांडत आहे. ती मंजुर करुन घ्यावी. संबंधीत प्रकरणे मा. महासभा, स्थायी समिती सभाचे ठराव व्यपगत करावे. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निर्बंधाचे पाळण करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०७/२००८

ठराव क्र. ३९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेत संगणक चालक व लघुलेखक ठेका पद्धतीने सन २००२ पासुन काम करित आहेत. मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार सदर कर्मचाऱ्यांची मानधनावर नेमणूक करण्यात आली. सदर कर्मचाऱ्यांची मुदत ३१/१२/२००७ रोजी संपली असता मा. महासभा दि. ०९/०१/२००८, ठराव क्र. १७ नुसार पुन्हा सदर कर्मचाऱ्यांना ६ महिने मुदत वाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदत दि. ३०/०६/२००८ रोजी संपलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. ०९/०१/२००८ या मा. महासभेमध्ये संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्या बाबत विचार विनिमय करून निर्णय होणे असा विषय चर्चेला आला असता त्यावर मा. महासभेमध्ये ठराव क्र. १७ पारित होउन संगणक चालक व लघुलेखक ह्यांची शैक्षणिक पात्रता, कामाची क्षमता व कामाची जबाबदारी ह्याची माहिती घेण्यासाठी विविध पक्षिय सदस्यांची एक समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने दिलेल्या अहवाल नुसार एकूण कर्मचारी ८७ पैकी ७ गैरहजर असलेले कर्मचारी ह्यांना वगळून ८० संगणक चालक व ४ लघुलेखक ह्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देउन सदर कर्मचाऱ्यांनी महापालिकेत केलेल्या कामाचा अनुभव लक्षात घेता व महापालिकेस ह्या कर्मचाऱ्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने मानधनावर ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

तज्ञ व्यक्तीने दिलेल्या अहवालानुसार जे ४ कर्मचारी संगणक कामाच्या ज्ञानात कमी (Poor) आहेत त्यांनी ३ महिन्यांच्या कालावधीत स्वतःचे संगणकाचे ज्ञान वाढवून तसे सर्टीफिकेट सामान्य प्रशासन विभागास सादर करावे.

तसेच महापालिकेने संगणक चालक व लघुलेखक ह्यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी फेर सादर करावा.

सुचक :- भगवती शर्मा    अनुमोदक :- सौ. वंदना चक्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपलिका

५५

प्रकरण क्र- २९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा शुक्रवार, दि. ०८/०८/२००८

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उपकर लागू करणेबाबत निर्णय घेणे व उपकर आकारणी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत.

ठराव क्र :- 32

दिनांक ०१/०८/२००८ पासून मिरा भाईंदर शहरामध्ये जकात हटवून उपकर लावण्यासंदर्भात व्यापाऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलना संदर्भात आजच्या मा. विशेष महासभेचे आयोजन करण्यात आले असून शहरातील विविध व्यापारी संघटनांच्या तसेच व्यापाऱ्यांच्या मागणीचा विचार करता तसेच शहरातील बंदमुळे निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्थेचा विचार करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९९ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये ही मा. महासभा मिरा भाईंदर माहनगरपालिका हद्दीत जकात कराऐवजी दि. १/०९/२००८ पासून किंवा या ठरावास शासनाची मान्यता मिळविण्याच्या तारखेपासून उपकर लागू करण्यास मान्यता देत आहे.

आमदार मुझ्झफर हुसेन यांनी मा. मुख्यमंत्री साहेब यांच्याकडून सध्या कार्यरत असलेल्या जकात ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याबाबत आदेश प्राप्त केले आहेत. व तशा प्रकारचे फलकही सर्व ठिकाणी लावले आहे. मा. आयुक्त साहेब यांनी या आदेशाची प्रत प्राप्त करून घ्यावी. व जकात ठेका रद्द करण्याची कार्यवाही करावी. ठेका रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व प्रत्यक्ष उपकर लागू होईपर्यंत जकात आकारणी चालू राहील.

उपकर लावण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी योग्य प्रकारे करता यावी म्हणून दरम्यानच्या काळात उपकारासाठी अधिकारी/ कर्मचारी वृंद नेमणे, कार्यालयासाठी जवळपास ५००० चौ.फुट जागा उपलब्ध करणे, कार्यालयासाठी लागणाऱ्या आवश्यक फर्निचर व कपाटे खरेदी करणे, व्यापाऱ्यांच्या नोंदणीसाठी व उपकर वसुलीसाठी आवश्यक फॉर्म छापून घेणे, व्यापाऱ्यांच्या नोंदणीसाठी विशेष मोहिम राबविणे, नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये सध्या वापरात असलेली संगणक प्रणाली विकत घेणे, मा. पदाधिकारी / मा. नगरसेवक/अधिकारी/कर्मचारी या सर्वांचे प्रशिक्षण घेणे, उपकर वसुली कामासाठी आवश्यकतेप्रमाणे संगणक खरेदी करणे, आवश्यकतेप्रमाणे संगणक चालक/कर्मचारी ठेका पध्दतीने घेणे, उपकरांची वसुली राष्ट्रीयकृत/शेड्युल बॅकेमार्फत करण्यासाठी बॅका निश्चित करणे व सर्वांना फायबर ऑप्टीकल केबल ने जोडणे. उपकर वसुलीसाठी नेमण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे नामांकन निश्चित करणे. प्रकरण ११ अ कलम १५२ ई (२) नुसार १) उपायुक्त २) निर्धारक ३) समाहारक ४) उपनिर्धारक ५) उपसमाहारक ६) सहा. निर्धारक ७) सहा. सभाहारक व उपकलम (२) ई नुसार इतर अधिकारी व व्यक्ति यांची नियुक्ती महानगरपालिका व्यवस्थापनात कार्यरत असणाऱ्या व वरील पदांसाठी निर्धारीत पात्रता असणाऱ्या कर्मचाऱ्यांची नेमणूक व राज्यशासनाच्या विक्रीकर/तत्सम विभागातील वर्ग १ दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करणे.

तसेच उपकर लावणे व वसुली करणे यास्तव लागणाऱ्या सर्व अनुषंगीक बाबी करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. जयंत पाटील　　　　अनुमोदन :- श्री. मिलन गो. पाटील

| अ.क्र. | ठरावाच्या बाजुने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ. क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाटील जयंत महादेव | १ | चंद्रकांत वैती | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | शर्मा भगवती तुगनचंद | २ | खान शफीक अहमद सादत | | निरंक |
| ३ | तिवारी दिव्या अशोक | ३ | शानू जो. गोहिल | | |
| ४ | वैती नर्मदा यशवंत | ४ | दिनेश द नलावडे | | |
| ५ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ५ | वेतोसकर राजेश शंकर | | |
| ६ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ६ | पाटील सुनिता कैलास | | |
| ७ | पाटील मिलन गोविंदराव | ७ | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | | |
| ८ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ८ | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | | |
| ९ | शेख आसिफ गुलाब | ९ | कुरेशी याकुब ईस्माईल | | |
| १० | गोविंद हेलन जॉर्जी | १० | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | | |
| ११ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | ११ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | |
| १२ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | १२ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | | |
| १३ | ठाकुर प्रकाश पांडुरंग | १३ | जंगम लक्ष्मण गणपत | | |
| १४ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १४ | सपार उमा विश्वनाथ | | |
| १५ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | १५ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | पुजारी कांचन शेखर | | |
| १७ | चक्रे वंदना रामदास | १७ | मुंज वासुदेव भास्कर | | |
| १८ | माळी हेमा रविंद्र | १८ | सय्यद नुरजहॉं नझर हुसैन | | |
| १९ | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १९ | शेख नुर मोहम्मद अहमद | | |
| २० | अनिता जयवंत पाटील | २० | भाटकर प्रेरणा प्रमोद | | |
| २१ | परेरा टेरी पॉल | २१ | डिसा मर्लिन मर्विन | | |
| २२ | मेहता नरेंद्र लालचंद | २२ | वैती विजया हेमचंद्र | | |
| २३ | वर्षा गिरधर भानुशाली | २३ | ठाकूर कल्पना हरिहर | | |
| २४ | भोईर राजू यशवंत | २४ | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | | |
| २५ | जाधव मोहन महादेव | २५ | मोदी चद्रकांत भिकालाल | | |
| २६ | सिंह मदन उदितनारायण | २६ | भट दिप्ती शेखर | | |
| २७ | म्हात्रे कल्पना महेश | २७ | सावंत अनिल दिवाकर | | |
| २८ | पाटील शरद केशव | २८ | शेख सलिम दाउद | | |
| २९ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २९ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | |
| ३० | बाविघर सिसिलीया विजय | ३० | शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ३१ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | ३१ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | |
| ३२ | पांडे स्नेहा शैलेश | ३२ | व्यास सुधा वासुदेव | | |
| ३३ | दुबे रामनारायण सदानंद | ३३ | म्हात्रे नयना गजानन | | |
| ३४ | यादव मिरादेवी रामलाल | ३४ | पाटील धनेश परशुराम | | |
| ३५ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | | |
| ३६ | पाटील अनंत रामचंद्र | | | | |
| ३७ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | | |
| ३८ | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | | |
| ३९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | | |

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रफुल्ल पाटील अनुमोदक श्राम. नयना गजानन म्हात्रे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सूचना / प्रस्ताव -- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ महानगरपालिका, स्थायी समिती, प्रभाग समिती इचे कामकाज क्र. बीएनसीएमजी/जीएडी/२५, दिनांक १६ फेब्रुवारी २००२ अन्वये.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अ अन्वये दि. ०१/०९/२००८ पासून उपकर लावणेबाबतचा ठराव करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाला मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ४५६ अ अन्वये राजपत्रातील अधिसुचनेद्वारे नवीन नियम / कायदा / कायद्यातील बदल करण्याचे विशेष अधिकार आहेत. उक्त अधिकारांनुसार महाराष्ट्र शासनाने दि. ३१/०८/१९९५ रोजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा अध्यादेश, १९९५ प्रख्यापित केला होता व राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०५/०१/१९९६ व दि. १२/०४/१९९६ रोजी प्रसिद्ध केलेला अधिनियम म्हणजेच सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ अस्तित्त्वात आला त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका आधिनियम १९४९ च्या कलम २ मध्ये खंड ६ नंतर ६ अ उपकर समाविष्ट करण्यात आला तसेच या अधिनियमामध्ये प्रकरण ११ अ जकातीऐवजी उपकर बसविणे, तो गोळा करणे व त्याची वसूली करणे या संबंधीच्या तरतूदी करण्यासाठी कलम १५२ अ ते कलम १५२ समाविष्ट करण्यात आले तसेच मुख्य नियमात जोडलेल्या अनुसूची (ब) मध्ये अनुसूची अ, अनुसूची ब व अनुसूची क विनिर्दिष्ट करण्यात आले. अनुसूची अ नुसार उपकरांच्या प्रदानास पात्र असलेल्या वस्तूंवर शासनाने बसवण्यायोग्य उपकराचे कमाल दर करून दिलेले आहेत. अनुसूची ब प्रमाणे उपकाराच्या प्रदानापासून मुक्त असलेल्या वस्तूंचे तपशील दिलेले आहेत तसेट अनुसूची क मध्ये महानगरपालिकेला उपकर देय नसलेल्या मालाची यादी देण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे सन १९९६ चा अधिनियम क्र. ३ नुसार समाविष्ट केलेल्या कलम व अनुसूची आजही लागू आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम ९९ अ ते सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला आहे. या कलम ९९ अ मध्ये कोणत्याही महानगरपालिकेस आपल्या क्षेत्रात प्रथम बसवायाच्या उपकराच्या तरतूदी लागू केल्या आहेत. अशा तरतूदी लागू करण्याचे अधिकार विशेष सभेला देण्यात आले असून या तरतूदींनुसार व प्रकरण ११ अ मध्ये विहीत केलेल्या मर्यादा व शर्ती यांच्या नियमांच्या अधीन राहून ज्या दराने ज्या मर्यादेपर्यंत आणि ज्या तारखेपासून उपकर बसविण्यात येतील ते दर, मर्यादा व तारिख निश्चित करण्याचे अधिकार विशेष सभेला दिले आहेत.

उक्त कलम ९९ अ नुसार प्रकरण ११ अ मधील कलम १५२ अ ते १५२ ओ नुसार जकातीऐवजी उपकर बसविणे, तो गोळा करणे व त्याची वसुली करणे या संबंधीच्या तरतूदी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आहेत. कलम १५२ अ (१) नुसार राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने व सदर कलमातील अनुसूची अ मध्ये वर्णन केलेल्या वस्तूं उपकरांच्या प्रदानास पात्र आहेत. सदर अनुसूची अ मध्ये क्रमांक १ ते ६१ मधील विविध मालांसाठी राज्य शासनाने महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०५/०१/१९९६ नुसार सदर वस्तूंवर बसवण्यायोग्य उपकराचे कमाल दर ठरवून दिलेले आहेत व अशा कमाल दरापेक्षा अधिक नसतील इतक्या दराने उपकर बसविण्याचे अधिकार कलम १५२ अ (१) नुसार मनपास दिलेले आहेत. अनुसूची अ मधील मालांचे किमान दर खालीलप्रमाणे ठरविण्यात येत आहेत. त्याची यादी सोबत जोडली आहे. कलम ९९ अ व १५२ अ, १२७ अअ च्या तरतूदीनुसार राज्य शासनाची मंजुरी घेऊन व आवश्यकता भासल्यास अधिसुचना पुर्वप्रसिद्ध करून लोकांकडून मागविण्यात आलेले आक्षेप व सुचना (असल्यास) त्या विचारात घेतल्यानंतर

राज्य शासनाच्या मंजुरीने राज्य् शासनाची मंजूरी मिळाल्याच्या दिनांकापासून प्रत्यक्षात उपकराची वसूली करण्यात यावी.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०५/०१/१९९६ नुसार कलम १५२ क (१) अनुसूची ब मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू उपकराच्या प्रदानापासून मुक्त असतील. सोबत अनुसूची ब ची प्रत जोडली आहे. तसेच कलम १५२ १ क (२) अनुसूची क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालांच्या यादीनुसार विनिर्दिष्ट केलेल्या वस्तूंवर महानगरपालिकेला उपकर देय नसेल. अशी सूचना / प्रस्ताव मी मांडत आहे.

**SCHEDULE A** (अनुसूची अ)

*[See section 152A]* (कलम १५२ अ पहा)

*Articles liable to payment of cess*

उपकरांच्या प्रदानास पात्र असलेल्या वस्तू

| *Serial No.* (1) | *Description of Goods* (2) | *Maximum Rates of cess leviable* (3) | *Minumum Rate / Rate fixed by Corporation* (4) |
|---|---|---|---|
| | *Class I.*---Articles of food and drink<br>वर्ग १ --- अन्न पदार्थ व पेय | | |
| 1 | Grain, flour, pulses and cereals of all sorts including parched gavar, soyabean, Parched grain, and paddy.<br>वाळवलेली गवार, सोयाबीन, वाळवलेले धान्य व भात, धान्य, पीठ, डाळी व तृणधान्य | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 0.20 per cent *Ad Valorem*<br>यथामूल्य ०.२० टक्का |
| 2 | (a) Sugar<br>साखर<br>(b) *Gur* of all sorts<br>सर्व प्रकारचा गुळ | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 0.20 per cent *Ad Valorem*<br>यथामूल्य ०.२० टक्का |
| 3 | Wines and spirits and beer<br>मद्य आणि स्पिरीटे आणि बिअर | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 4 per cent *Ad Valorem*<br>यथामूल्य ४ टक्का |
| 4 | Ghee<br>तूप | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 5 | Vanaspati and hydrogenated oils<br>वनस्पती व हायड्रोजनेटेड तेले | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 6 | Tea, coffee and coffee seeds<br>चहा, कॉफी व कॉफीच्या बिया | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 7 | Saffron<br>केशर | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का |
| | Edible-bacon and hams, table butter, butter other than table butter, margarine, dried or preserved fruits and nuts excluding fresh fruits and betal nuts, canned fish, cheese, confectionery, jams and jellies, milk condensed and preserved, ice cream, all sorts of farinaceous foods, pickles, cocoa, cocoabeans and chocolagtes, biscuits and cakes, lard or edible animal fat, *mawa*, milkcream, *chakka*, fruitjuices, syrups and all beverages glucose, destrose or any fruit sugar preserved provisions, baking or cury powder, saccharin, all kinds of food colours and essences, glucose of all other kinds, malt extract, honey, papad, potato wafers, meat fresh or preserved for whatever use and all kinds of food or drink not specifically provided for excepting whole milk or tonned milk or skim milk powder.<br>खाण्याचे बेकन व हॅम्स, टेबलबटर, टेबलबटरखेरीज अन्य | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |

| | | | |
|---|---|---|---|
| | लोणी, मार्गारीन, ताजी फळे व सुपारी खेरीजकरून सुकवलेली किंवा टिकवून ठेवलेली फळे व कठीण कवचाची फळे, डबाबंद मासे, चीज, मिठाई, जॅम व जेली, संघनित व टिकवून ठेवलेले दूध, आईसक्रीम, सर्व प्रकारचे पिष्टमय अन्न, लोणची, कोको, कोकोच्या बिया व चॉकलेट, बिस्कीटे व केक, डुकराची चरबी किंवा खाण्यास योग्य अशी जनावरांची चरबी, खवा, दुधाची मलई, चक्का, फळांचे रस, पाक व सर्व पेये, ग्लुकोज, डेक्स्ट्रोज किंवा कोणतीही फलशर्करा, टिकवून ठेवलेली अन्नसामग्री, बेकिंग पावडर किंवा कढीचा मसाला, सॅकरीन, सर्व प्रकारचे खाण्याचे रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, माल्ट एक्स्ट्रॅक्ट,मध, पापड, बटाटा वेफर्स, ताजे किंवा कोणत्याही उपयोगासाठी टिकवून ठेवलेले मांस आणि सकस दूध किंवा बनीव दूध किंवा मलईरहित दुधाची भुकटी खेरीजकरून विनिर्दिष्टपणे तरतूद करण्यात न आलेले सर्व प्रकारचे अन्न किंवा पेये | | |
| 9 | Dates dry<br>खारका | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 10 | Dates wet<br>खजूर | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | *Class II.*---Animals.<br>वर्ग २ --- जनावरे | | |
| 11 | Sheeps, goats, lambs and kids<br>मेंढ्या, बकरे, कोकरे आणि करडे | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 12 | Oxen, cows, buffaloes, calves and horses<br>बैल, गायी, म्हशी, वासरे व घोडे | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 13 | Pigs<br>डुकरे | 1 per cent. *Ad valorem.* | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| | *Class III.*---Articles used for Fuel, Lighting, Washing and Industrial use.<br>वर्ग ३ --- इंधन, दिवाबत्ती, धुलाई व औद्योगिक वापर यांकरिता वापरण्यात येणाऱ्या वस्तू | | |
| 14 | Charcoal, coal and coke<br>लोणारी कोळसा, कोळसा व दगडी कोळसा | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 15 | Crackers, fireworks and their components, calcium carbide and safety fuses.<br>फटाके, दारुकाम व त्याचे घटक, कॅल्शियम कार्बाईड व धोकादायक नसलेली (सुरुंगाची) वात. | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का |
| 16 | Chandeliers, globes, chimneys, electric bulbs and articles for electric or gas lighting.<br>झुंबरे, ग्लोब्ज, धुरांडी, विजेचे बल्ब व विजेची किंवा गॅसची प्रकाशव्यवस्था यासाठी लागणाऱ्या वस्तू | 6 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ६ टक्का | 3 per cent. *Ad valorem*<br>यथामूल्य ३ टक्का |
| 17 | Soap of all kinds, boot and metal polish<br>सर्व प्रकारचा साबण, बूट व धातूंना झिलई देण्याच्या वस्तू | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 18 | Potash, ritha, soda, alum, saline substances, shikakai, washing soda, caustic soda, refined salt, patre, phenyl and substances used in washing clothes, floor and utensils.<br>पोटॅश, रिठे, सोडा, तुरटी, क्षारयुक्त पदार्थ, शिकेकाई, धुण्याचा सोडा, कॉस्टिक सोडा, रिफाईन्ड सॉल्ट पीटर, फिनाईल आणि कपडे, खोलीच्या फरशा आणि भांडी धुण्यासाठी वापरण्यात येणारे पदार्थ | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | Oil seeds of inedible oils<br>खाण्यास अयोग्य असलेल्या तेलाच्या तेलबिया | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 20 | Inedible vegetable oils<br>खाण्यास अयोग्य असलेली वनस्पती तेले | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem*<br>यथामूल्य २ टक्का |
| 21 | Methylated and denatured spirits and industrial alcohols.<br>मेथिलेटेड व विप्रकृत स्पिरिटे व औद्योगिक कारणांसाठी वापरण्यात येणारे अल्कोहोल. | 6 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ६ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 22 | (a) Mineral oils of all sorts, diesel oil, petrol, aviation spirit, all kinds of lubricating oils, white oil, spindle oil, furnance oil, petroleum products including natural gas and liquefied petroleum gas, mava oil, sevasol, solvent oil, other fuel oils, oils used as insecticides, natural gasoline, paints solutions and compositions, turkey red oil and by products of mineral oils (but nothing hereinbefore contained shall include kerosene and crude oil).<br>सर्व प्रकारची खनिज तेले, डिझेल ऑईल, पेट्रोल, विमानाचे स्पिरिट, सर्व प्रकारची वंगणाची तेले, व्हाईट ऑईल, चातीचे तेल, भट्टीचे तेल, नैसर्गिक वाचू व द्रवरुप पेट्रोलियमजन्य वायू यांसह पेट्रोलियमजन्य वस्तू, मावा ऑईल, सेवसॉल द्रावक तेल, इंधनाची इतर तेले, कीटकनाशके म्हणून वापरली जाणारी तेले, नैसर्गिक गॅसोलीन, रंगलेप द्रावणे व मिश्रणे, मंजिष्ठ तेल आणि खनिज तेलांची उपउत्पादने (परंतु यापूर्वी अंतर्भूत असलेल्या कोणत्याही वस्तूमध्ये घासलेट व क्रूड ऑईल यांचा समावेश नसेल.) | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| | (b) Crude Oil<br>क्रूड ऑईल | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| | (c) Grease and petroleum jelly.<br>ग्रीझ व पेट्रोलियम जेली | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | *Class IV.*---Articles used in construction of Buildings, Roads and Other structures and Articles made of Wood and Cane.<br>वर्ग ४ --- इमारती, रस्ते व इतर संरचना यांच्या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तू आणि लाकडाच्या व वेताच्या वस्तू | | |
| 23 | Cement of all sorts<br>सर्व प्रकारचे सिमेंट | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 24 | Coaltars asphalt, bitumen flooring stone, manganese, emery stone or powder, chalk powder, stone chips, Agra stone, stone for building, clinker and coalash.<br>डांबर, ॲस्फाल्ट, बिटूमेन, फरसबंदी करण्यासाठी दगड, मॅन्गॅनीज, एमरी दगड किंवा भुकटी, खडूची भुकटी, दगडाच्या कपच्या, आग्रा दगड, इमारती दगड, खंगर व कोळशाची राख. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| 25 | Glazed bricks, tiles marble pieces, fire bricks, bricks, all kind of roofing tiles, flooring tiles, china mosaic chips, mosaic marble, mosaic or terrazzo tiles, earthern pipes, china pipes, cement pipes and asbestos cement sheets.<br>झिलईदार विटा, फरशा, संगमरवरी दगड, पासाहीविटा, विटा, सर्व प्रकारची छपरी कौले, जमिनीवर बसवण्यासाठी फरशी, चायना मोझेक चिपा, मोझेक संगमरवरी दगड, | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का |

| | | | |
|---|---|---|---|
| | Iron and Steel<br>लोखंड आणि पोलाद | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | (a) Pig iron<br>अशुद्ध लोखंड<br>(b) Blooms, billets and slabs,<br>ब्लूम, लगडी आणि लाद्या,<br>(c) Structural (घडणीचे) –<br>(i) Joints, (ii) Chanels, (iii) angles, equal or unequal, (iv) bulbs or toe, (v) light rails, (vi) fish plate for light rails, (vii) shell, steel ingots blooms, billets and bars, (viii) black or galvanized sheets, plain or corrugated, (ix) plates, ordinary mild stel including boiler and high tensile ship building or bullet proof, (x) bars and rods, (xi) bolts, nuts, washers rivets and such other articles, (xii) wire barbed, telegraph or other kind of black galvanized, (xiii) wire nails, (xiv) spring steel, vehicular of flat bars, (xv) hoops and strips, and (xvi) pipes.<br>१. सांधे, २. पन्हळी (चॅनेल्स), ३. सारख्या आकाराचे किंवा वेगवेगळ्या आकाराचे अँगल, ४. बल्ब किंवा टो., ५.लहान रुळ, ६. लहान रुळांसाठी रुळ जोडपट्टी, ७. कुलपी गोळा (शेल), पोलाद ढेपी (ब्ल्यूम), लगडी आणि कांबी, ८. काळे किंवा जस्त विलेपित सपाट किंवा पन्हळीदार पत्रे, ९. पट्टिका, बाष्पित्र आणि उच्च ताण सामर्थ्याच्या जहाज बांधणीच्या किंवा बंदुकीच्या गोळ्यांना रोधणाऱ्या पोलादासह सामान्य मृदू पोलाद, १०. कांबी आणि सळ्या, ११. बोल्ट, नट, वायसर, रिव्हेट आणि अशा प्रकारच्या इतर वस्तू, १२. काटेरी, टेलीग्राफची किंवा इतर प्रकारची काळी जस्त विलेपित तार, १३. तार खिळे, १४. स्प्रिंग पोलाद किंवा वाहनासाठी लागणाऱ्या किंवा सपाट कांबी, १५. नळकांड्या (हूप) व पट्ट्या आणि १६. नळ. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 48 | Iron and steel---Scrap.<br>लोखंड व पोलाद - भंगार | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 49 | Iron and steel---any other articles manufactured from iron or steel other than cutlery, hardware and machines or machines parts not specifically provided for.<br>लोखंड व पोलाद कटलरी, लोखंडी वस्तू आणि यंत्रे किंवा विनिर्दिष्टपणे तरतूद न केलेले यंत्रांचे सुटे भाग यांहून अन्य अशा लोखंड किंवा पोलाद यांपासून बनविण्यात आलेल्या इतर वस्तू. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| 50 | Machinery and their components and spares<br>(a) (i) Electric machinery for generation, transmission and distribution and motors and generators and their components and spares,<br>(ii) Electric goods including cells batteries and copper strips, horn electric,<br>(iii)Electric domestic appliances,<br>(iv) Electrical domestic appliances,<br>(v) Electrical machinery of all kinds, control sets. | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |

| | | | |
|---|---|---|---|
| | switch-gear, generators, alternators and dynamos, motors, transformers and turbo generating sets.<br>(b) Agricultural machinery and parts.<br>(c) Oil engines, diesel engines, steam engines, petrol and gas engines and machines worked by hydraulic pressure and their parts.<br>(d) Tools of all kinds.<br>(e) Printing press machines and spares.<br>(f) any other machinery, its components and spares not specifically provided for.<br>यंत्रसामग्री आणि तिचे घटक भाग व सुटे भाग ---<br>अ) १) वीजनिर्मिती, पारेषण आणि वितरण यांसाठी विद्युत यंत्रसामग्री आणि मोटारी व जनित्रे आणि त्यांचे घटक व भाग व सुटे भाग.<br>२) विद्युत घट (सेल), बॅटऱ्या आणि तांब्याच्या पट्ट्या आणि हॉर्न इलेक्ट्रिक यांसह विजेच्या वस्तू.<br>३) विजेच्या खिळण्या आणि साहित्य.<br>४) विजेची घरगुती वापराची उपकरणे.<br>५) सर्व प्रकारची विजेची यंत्रसामग्री, नियंत्रण संच, स्विच गियर जनित्रे, प्रत्यावर्तित्रे (ऑल्टरनेटर) आणि डायनामो, मोटारी परिवर्तित्रे (ट्रान्सफॉर्मर) आणि टर्बो वीजनिर्मिती यंत्रसंच.<br>ब) कृषी यंत्रसामग्री आणि तिचे भाग.<br>क) तेल इंजिने, डिझेल इंजिने, वाफ इंजिने, पेट्रोल आणि गॅस इंजिन आणि द्रविक दाबाच्या सहाय्याने चालणारी यंत्रे आणि त्यांचे भाग.<br>ड) सर्व प्रकारची हत्यारे.<br>इ) मुद्रणालयाची यंत्रे व सुटे भाग.<br>फ) कोणतीही इतर यंत्रसामग्री आणि विनिर्देशपूर्वक तरतूद न केलेले तिचे घटक भाग व सुटे भाग. | | |
| 51 | Vehicles---<br>वाहने --- | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| | (a) Motor cars, motor cycles, chassis and lorries.<br>(b) Bicycles, perambulators, carriages, all kind of vehicles and their components and spares.<br>अ) मोटारी, मोटार सायकली, साटे व मालमोटारी<br>ब) सायकली, बाबागाड्या, वाहन गाड्या, सर्व प्रकारची वाहने आणि त्यांचे घटक व सुटे भाग. | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 52 | Instruments, apparatus, appliances and part thereof---<br>(a) Sewing machines, clocks and watches and typewriters and their spares.<br>(b) Radio, radiograms, television set or apparatus, loudspeakers and gramophones, amplifiers, wireless goods, video cassette recorders, video cassette players, their components and spares.<br>(c) Photographic machinery, photo goods and materials including photographic chemicals, films and mounts and their components and spares.<br>(d) Cine projection machinery, their components spares and material used therein.<br>(e) Surveying apparatus.<br>(f) Scientific appliance.<br>(g) Optical goods, their spares and accessories, surgical instruments and hospital requirement | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem*<br>यथामूल्य ३ टक्का |

| | | | |
|---|---|---|---|
| | including their spares and accessories.<br>(h) Mill and gin stores including crucibles, cotton ropes and spares.<br>(i) All kinds of apparatus, appliances and spares.<br>उपकरण संच, सामग्री उपयंत्रे आणि त्यांचे भाग ---<br>अ) शिवणयंत्रे, मोठी घड्याळे व घड्याळे आणि टंकलेखन यंत्रे व त्यांचे सुटे भाग.<br>ब) रेडिओ, रेडिओग्राम, दूरचित्रवाणी संच किंवा उपकरण संच, ध्वनिक्षेपक व ग्रामोफोन, ध्वनिवर्धक, बिनतारी यंत्रांचे (वायरलेस) साहित्य, व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर्स, व्हिडिओ कॅसेट प्लेअर्स, त्यांचे घटक आणि सुटे भाग.<br>क) छायाचित्रमाची यंत्रसामग्री आणि छायाचित्रणाची रसायने, फिल्म आणि माऊंट यांसह छायाचित्रण साहित्य व सामग्री, माऊंट आणि त्यांचे सुटे भाग.<br>ड) सिनेमा प्रक्षेपण यंत्रसामग्री, त्यांचे घटक भाग, सुटे भाग आणि त्यात उपयोगात आणलेले साहित्य.<br>इ) सर्वेक्षण उपकरण संच<br>फ) शास्त्रीय उपयंत्रे.<br>ग) दृष्टिसहायक वस्तू, त्यांचे सुटे भाग व उपसाधने, शस्त्रक्रिया-विषयक उपकरणे, रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या वस्तू आणि त्यांचे सुटे भाग व उपसाधने.<br>ह) गिरणी आणि सरकी काढण्याचे यंत्र यांविषयीचे सामान तसेच मुसा/कापसाचे दोर आणि सुटे भाग.<br>आय) सर्व प्रकारचे उपकरण संच, उपयंत्रे आणि सुटे भाग. | | |
| 53 | Non-ferrous metals that is to say brass, copper, tin, aluminium, lead, zinc, germansilver, stainless steel their alloys, wire-wares and sheets, ingots and circles etc.<br>अलोह धातू म्हणजे पितळ, तांबे, कथील, ॲल्युमिनियम, शिसे, जस्त, जर्मन सिल्वर, स्टेनलेस स्टील, त्यांचे मिश्र धातू, तारांच्या वस्तू आणि पत्रे, ढेपी आणि वेटोळी इ. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | *Class IX.*---Miscellaneous Class<br>वर्ग ९ --- संकीर्ण वर्ग | | |
| 54 | Dyes tans indigo and all colouring matter including printing paste, inks and industrial paints.<br>रंगद्रव्ये, काळवट रंग (टॅन), नीळ आणि छपाई पेस्ट, शाई यांच्यासहित रंगाचे सर्व पदार्थ आणि औद्योगिक वापराचे रंग. | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 55 | Paper---<br>कागद --- | | |
| | (a) Newsprints<br>वृत्तपत्री कागद | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | (b) Card boards, straw-boards, grey-boards and millboards.<br>कार्डबोर्ड, स्ट्रॉबोर्ड, ग्रेबोर्ड आणि मिलबोर्ड | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | (c) All kinds of paper of whatever composition and thickness.<br>सर्व प्रकारचा कागद मग तो कोणत्याही मिश्रणाचा किंवा जाडीचा असो. | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 56 | Lac and cork and articles made thereof<br>लाख आणि कॉर्क झाडाची साल आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |

| | | | |
|---|---|---|---|
| | Sculptured articles of wood stone clay of metal, other articles and earthenware.<br>लाकूड, दगड, चिकण माती किंवा धातू यांच्या नक्षीकाम केलेल्या वस्तू, इतर वस्तू आणि मातीची भांडी. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 58 | Chinaware, porcelainware and electric insulators not otherwise specified.<br>चिनी मातीची भांडी, पोर्सलिनची भांडी आणि अन्यथा विनिर्दिष्ट न केलेले विद्युतनिरोधक | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 59 | (a) Cinema films, all film raw.<br>सिनेमा फिल्म, सर्व कच्च्या फिल्म | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का |
| | (b) Cinema films processed and reels.<br>प्रक्रिया केलेल्या सिनेमा फिल्म किंवा रिळे | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का |
| 60 | Molasses<br>काकवी | 7 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ७ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 61 | All articles other than those specified in the preceding *entries of this Schedule.*<br>या अनुसूचीच्या मागील नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू वगळून सर्व वस्तू. | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |

## SCHEDULE B (अनुसूची ब)

*[See section 152A] (कलम १५२ क (१) पहा)*

*Articles free from payment of cess*

उपकराच्या प्रदानापासून मुक्त असलेल्या वस्तू

| Serial No. (1) | Articles<br>वस्तू<br>(2) |
|---|---|
| 1 | Books and periodicals including almances, *panchangs* and time-tables for passanger transport services. catalogues, all publications which publicize goods, services and articles for commercial purposes, race cards, account books, diaries, calenders, office files, and documents, answer books (blank or used), tags, wedding cards, greeting cards, invitation cards, post cards, picture-post, cards for special occasions, visiting cards, photo albums, stamp albums made of paper, playing cards and newspapers.<br>एक प्रकारची पंचांगे (ऑल्मनॅक्स), पंचांगे व प्रवासी वाहतूक सेवांची वेळापत्रके तालिका यांसह पुस्तके आणि नियतकालिके, वाणिज्यिक प्रयोजनांसाठी माल, सेवा व वस्तू यांची प्रसिद्धी करणारी व सर्व प्रकाशने, रेकॉर्डस, लेखापुस्तके, रोजनिशा, दिनदर्शिका, कार्यालयीन फायली व दस्तऐवज, उत्तरपत्रिका (कोऱ्या किंवा वापरलेल्या), बंद लग्नपत्रिका, शुभेच्छा पत्रिका, निमंत्रण पत्रिका, पोस्टकार्डे, चित्र पोस्टकार्ड, विशेष प्रसंगाकरिता कार्डे, नामपत्रिका, छायाचित्र संग्राहिका (फोटो अलबम), कागदापासून बनविलेल्या तिकीट संग्राहिका (स्टॅम्प अलबम), पत्ते आणि वृत्तपत्रे. |
| 2 | Poultry, eggs and flesh of poultry.<br>पाळीव खाद्यपक्षी, अंडी व पाळीव खाद्यपक्षांचे मांस |
| 3 | Cattle-feed including fodder and concentrates meant exclusively for cattle, cotton seeds, oil cake and feed supplements.<br>वैरण व केवळ जनावरांसाठी तयार केलेले आंबोण यांसह पशुखाद्य, सरकी, पेंड आणि पूरक चारा. |
| 4 | Chillies, turmeric, *dhania, methi or suva,* whole or powdered, tamarind seeds whole or separated.<br>मिरच्या, हळद, धणे, अख्खी किंवा पूड केलेली मेथी किंवा ओवा, अख्खे किंवा फोडलेले चिंचोके. |
| 5 | Coconut in shell, separated kernel of coconut and copra.<br>असोला नारळ, सुका नारळ व खोबरे. |
| 6 | *Bidi leaves.*<br>विडीची पाने. |
| 7. | Electricity.<br>वीज. |
| 8 | Fertilisers and manures including chemical manures.<br>रासायनिक खते व रसायनयुक्त खतासह खते |

| | |
|---|---|
| | Mica graphite and activated earth.<br>माथका ग्रॅफाईट व ॲक्टिबेटेड अर्थ (सक्रियित माती) |
| 30 | Fowls of all sorts, ducks and birds.<br>सर्व प्रकारचे खाद्यपक्षी, बदके व पक्षी. |
| 31 | Human hair and animal hair.<br>मानवी केस व जनावरांचे केस. |
| 32 | Mercury.<br>पारा. |
| 33 | All animals, wild beasts, domestic pets except those to which entries 11, 12 and 13 of Schedule A apply.<br>सर्व जनावरे, वन्य जनावरे, ज्यांना अनुसूची अ मधील नोंद क्र. ११, १२ व ३ लागू होतात ती वगळता इतर पाळीव प्राणी. |
| 34 | Animal bones, horns and hooves.<br>प्राण्यांची हाडे, शिंगे व खूर. |
| 35 | Currency notes and coins.<br>चलनी नोटा व नाणी. |
| 36 | Bee wax, baby berry wad and wax excluding petroleum wax.<br>मधमाश्यांच्या पोळ्यातील मेण, बेबीबेरीपासून मिळणारे मेण व पेट्रोलियम मेण वगळता इतर मेण. |
| 37 | Brooms.<br>झाडू. |
| 38 | Vitamins.<br>जीवनसत्वे. |
| | Whole milk, tonned milk and skimmed milk powder and curds.<br>सकस दूध, बनीव दूध व मलईरहित दुधाची पावडर आणि दही. |
| 40 | Kerosene<br>केरोसीन. |
| 41 | Red earth.<br>लाल माती. |

**SCHEDULE C** अनुसूची क

*[See section 152C (2)]* (कलम १५२ क (२) पहा)

*List of goods on which cess shall not be payable to the Corporation*

महानगरपालिकेला उपकर देय नसेल अशा मालाची यादी

(1) *Bone fide* personal luggage of passengers arriving by the air, sea, river, rail or road and articles for their private and personal use, which have already been in use at the time of import.

हवाई, सागरी, जल, रेल्वे किंवा रस्ते या मार्गाने आलेल्या प्रवाशांचे खरेखुरे वैयक्तिक सामान आणि आयातीच्या वेळी आधीच वापण्यात आलेले असेल असे त्यांच्या खाजगी आणि वैयक्तिक वापराच्या वस्तू.

(2) Machines worked by manual power for *bona fide* use of educational institutions.

शैक्षणिक संस्थांच्या खऱ्याखुऱ्या वापराकरिता श्रमशक्तीद्वारे चालवली जाणारी यंत्रे.

(3) Camp equipment of Government officers on tour.

दौऱ्यावर असणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची शिबीर सामग्री.

(4) Necessaries (not being articles of food and drink) equipment and clothing procured by the officers in command of troops for the direct and exclusive use of their men and camp followers, if and when accompanied at the time they enter the cess limits by a certificate fo the officer commanding that they are so intended.

चमूचे अधिपत्य असणाऱ्या अधिकाऱ्याने प्रत्यक्ष त्यांच्या लोकांसाठी व शिबिरार्थीसाठीचे केवळ वापरता येईल म्हणून प्राप्त केलेली (खाण्यापिण्याची वस्तू नसलेली) आवश्यक वस्तू, सामग्री व वस्त्रे ते उपकर हद्दीत प्रवेश करतील तेव्हा त्यांच्याबरोबर क्षेत्र अधिकाऱ्याने दिलेले ती तशा उद्देशासाठी असल्याबाबतचे प्रमाणपत्र असेल तर आणि असेल तेव्हा.

(5) Goods entering the cess limits either in exhibition train itself, or for being placed in any exhibition to be held in the cess limits but not for sale; in the latter case on the production of certificate to that effect from the Secretary or the Manager managing the said exhibition.

खुद्द प्रदर्शनाच्या आगगाडीतून किंवा उपकराच्या हद्दीत भरविण्यात यावयाच्या कोणत्याही प्रदर्शनात मांडण्यासाठी परंतु विक्रीसाठी नव्हे उपकराच्या हद्दीत प्रवेश करणारा माल, यापैकी दुसऱ्या बाबतीत उक्त प्रदर्शनाच्या कार्यवाहीने किंवा त्याचे व्यवस्थापन करणाऱ्या व्यवस्थापनाने दिलेले तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर केल्यावर.

(6) *Bona fide* commercial samples meant for free distribution and not meant for transfer or sale so certified by the importer.

मुक्त वाटपाकरिता असलेले आणि हस्तांतरण आणि विक्री या करिता नसलेले व आयातकाने तसे प्रमाणित केलेले खरेखुरे व्यापारविषयक नमुने.

(7) Goods imported by rail, sea or air and rebooked and exported without being removed from the premises of the railway, docks, *bunders,* wharfs and airports.

रेल्वे, सागरी किंवा हवाई मार्गाने आयात केलेला आणि रेल्वे, गोदी, बंदरे, धक्के आणि विमानतळाच्या आवारातून न हलवता पुन्हा नोंदणी केलेला आणि निर्यात केलेला माल.

(8) Goods imported in accordance with the orders of a Court of law in connection with its official use.

न्यायालयाच्या आदेशानुसार त्याच्या कार्यालयीन वापराच्या संबंधात आयात केलेला माल.

(9) Used furniture tents, cholddaries, crockery, utensils, lamps, ballies, hired for parties, marriage monies and public functions outside the cess limits which were so taken outside with the written permission of a Cess Authority and which are accompanied by the said written permission, while re-entering the cell limits.

उपकर हद्दीच्या बाहेर होणारी पार्टी, विवाह समारंभ व सार्वजनिक समारंभ यांसाठी भाड्याने नेलेले, वापरलेले फर्निचर, तंबू, खोळदऱ्या, चिनी मातीची भांडी, भांडी, दिवे, बॅलीज् ते उपकर प्राधिकरणाच्या लेखी परवानगीने बाहेर नेले असतील आणि उपकराच्या हद्दीमध्ये ते पुन्हा आणताना उक्त लेखी परवानगीसह आणले जात असतील तेव्हा.

(10) Machinery, instruments and other articles and their components parts which were taken outside the cess limits for the purpose of repairs or processing, if imported with the written permissionof a Cess Authority and are accompanied by the said written permission, while re-entering the cess limits.

यंत्र, उपकरणे व इतर साधने आणि त्यांचे घटक भाग यांच्या दुरुस्तीसाठी किंवा त्यावर प्रक्रिया करण्यासाठी उपकर प्राधिकरणाच्या लेखी परवानगीने उपकर हद्दीच्या बाहेर नेले असतील अशा बाबतीत उपकराच्या हद्दीमध्ये पुन्हा आणताना उक्त लेखी परवानगीसह आणले जात असतील तेव्हा.

(11) Free gifts of any goods received as aid or relief supplied form any foreign Government or its recognized agency operating in India.

कोणत्याही विदेशी सरकारकडून किंवा भारतात कार्यरत असलेल्या त्यांच्या मान्यताप्राप्त संस्थांकडून मदत किंवा सहाय्य म्हणून निःशुल्क देण्यात आलेला कोणताही माल.

*Explanation I.*---For the purpose of this entry "recognized agency" means an agency specified as such by the State Government by an order published in the *Official Gazette*.

स्पष्टीकरण १ --- या नोंदीच्या प्रयोजनार्थ "मान्यताप्राप्त संस्था" म्हणजे, राज्य शासनाने राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून अशी संस्था म्हणून विनिर्दिष्ट केलेली संस्था.

*Explanation II.*---If any doubt arises as to whether any particular gift is eligible for exemption under this rule or not, the matter shall be referred to the State Government, whose decision shall be final.

स्पष्टीकरण २ --- कोणतेही विशिष्ट बक्षीस या नियमाखाली सवलतीकरिता पात्र आहे किंवा नाही याबद्दल कोणतीही शंका उद्‌भवली तर, ते प्रकरण, राज्य शासनाकडे विचारार्थ पाठवले जाईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

(12) All contraceptives, drugs or appliances used for Family Planning purposes.

कुटुंब नियोजन प्रयोजनकरिता वापरण्यात येणारी सर्व संतती प्रतिबंधक साधने, औषधे किंवा उपयंत्रे.

(13) (i) Cotton, hand spun yarn and Khadi cloth.

कापसाचे हातकताईचे सूत आणि खादीचे कापड.

(ii) Woollen hand spun yarn and hand woven cloth, including *Ghongadis,*

हातकताईचे लोकरीचे सूत आणि खादीचे कापड.

(iii) Hand spun and reeled silk yarn and hand woven silk cloth, including tassar yarn and cloth,

हातकताईची व रेशीम सुताचे रीळ व हाताने विणलेले रेशमी कपडे, टसर सूत व कापडांसह

(iv) Village industries products.

ग्रामोद्योग उत्पादने.

*Explanation.*---The exemption from payment of cess duty under this entry shall be given subject to the condition that the goods are certified by the Maharashtra State *Khadi* and Village Industries Board, or the *Khadi* and Village Industries Commission.

स्पष्टीकरण --- या नोंदी अन्वयेचे उपकर शुल्क भरण्यातून द्यावयाची सूट ही महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने किंवा खादी व ग्रामोद्योग आयोगाने माल प्रमाणित केलेला असावा या शर्तीच्या अधीन राहून देण्यात येईल.

(14) Empty Treasure Boxes supplied by the Reserve Bank of India to its Agency Banks for packing the Government Treasure for dispatch to Agency Banks or to the Head Office of the Bank.

भारतीय रिझर्व्ह बँकेने तिच्या अभिकरण बँकांकडे किंवा त्या बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे रवाना करावयाचा शासकीय निधी भरण्यासाठी अभिकरण बँकांकडे पाठविलेल्या रिकाम्या निधी पेट्या.

(15) Concessional quality white printing paper supplied by the Government of India.

भारत सरकारने पुरविलेल्या सवलतीच्या दराचा चांगल्या प्रतीचा पांढरा छपाईचा कागद.

(16) Locally manufactured article consigned from within the limit of the City but returned to the consignor within six months form the date of their export on account of the refusal of the consignee to accept the same either wholly or partly subject to the furnishing of adequate documentary evidence.

शहराच्या हद्दींमधून पाठविण्यात आलेल्या परंतु माल घेणाऱ्याने पूर्णपणे किंवा अंशतः घेण्याचे नाकारल्यामुळे माल पाठविणाऱ्याकडे निर्यातीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत परत पाठविण्यात आलेल्या स्थानिकरीत्या तयार केलेल्या वस्तू पुरेसा लेखी पुरावा जोडण्याच्या शर्तीच्या अधीनतेने.

(17) (i) Flat plate solar collector.

फ्लॅट प्लेट सोलर कलेक्टर्स.

(ii) Concentrating and pipe type solar collector.

कॉन्सेन्ट्रेटींग आणि पाईप प्रकारचे सोलर कलेक्टर्स.

(iii) Solar cookers.

सोलर कुकर्स

(iv) Solar waterheaters and systems.

सोलर वॉटर हीटर्स आणि पद्धती.

(v) Air/gas/fluid heating systems.

हवा/गॅस/द्रायु (फ्लुइड) उष्मन पद्धती.

(vi) Solar crop driers and systems.

सोलर क्रॉप ड्रायर्स आणि पद्धती.

(vii) Solar stills and desalination systems.

सोलर स्टील आणि डीसॅलीनेशन पद्धती.

(viii) Solar pumps based on solar thermal and solar photovoltaic conversion.

सोलर थर्मलवर आधारीत सोलर पम्प आणि सोलर फोटोव्होटाईक रूपांतर करणे.

(ix) Solar power generating systems.

सौरशक्ती वीजनिर्मिती पद्धती.

(x) Solar photovoltaic modules and panels for water pumping and other applications.

सोलर फोटो व्होल्टाइक मोडूलेज आणि वॉटर पम्पींग व इतर उपयोगांकरिता पॅनेल.

(xi) Wind mills and any specially designed devices which run on wind mills.

पवनचक्की आणि अन्य विशेष बनविलेल्या साधनांवर चालणाऱ्या पवनचक्क्या.

(xii) any special devices including electric generators and pumps running onwind energy.

पवन ऊर्जेवर चालणारी विद्युत जनित्र आणि पंप यासह अन्य कोणतीही साधने

(xiii) Biogas plants and biogas engines.

बायोगॅस संयंत्रे आणि बायोगॅस इंजिन.

| | | | |
|---|---|---|---|
| | diapers, cotton beds and pillows and surgical cotton.<br>लोकर, रेशीम, लिनन, सण आणि कृत्रिम व सिन्थेटिक सामग्री यांपासून तयार केलेले कापडाचे तागे आणि अन्यथा विनिर्दिष्ट करण्यात आल्या नसतील अशा, वरीलपैकी कोणतीही सामग्री पूर्णपणे किंवा अंशतः वापरून बनवलेल्या वस्तू, १०० टक्के सुती कापड, १०० सुती कापडापासून बनवलेले तयार कपडे, १०० टक्के सुती कापडापासून बनवलेला विणमाल, सॅनिटरी टॉवेल, नॅपकीन, एकदा वापरून फेकून द्यायचे लहान मुलांचे लंगोट, कापसाच्या गाद्या व उशा आणि शस्त्रक्रियेसाठी लागणारा कापूस. | | |
| 38 | Cotton ginned or unginned.<br>सरकी काढलेला किंवा न काढलेला कापूस | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| 39 | Cotton waste, yarn waste and hard waste.<br>टाकाऊ कापूस, टाकाऊ सूत आणि हार्ड वेस्ट. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| 40 | Raw or unspun wool hemp, jute, coconut and other fibres and rope and articles made thereof.<br>कच्ची किंवा न कातलेली लोकर, सण, ताग, नारळीचे आणि इतर तंतू आणि दोरखंड आणि त्यापासून बनविलेल्या इतर वस्तू. | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 41 | Yarn and threads of all sorts.<br>सर्व प्रकारचे सूत आणि धागे. | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का | 1 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १ टक्का |
| 42 | Starches of all sorts, sargo, rice and flour, arrowroot tapioca and its flour, tamarind powder, farina starches and sizing materials, tallow, sizing oils and such substitutes.<br>सर्व प्रकारच्या खळी, साबुदाणा, तांदूळ आणि पीठ, तवकील टॅपिओका आणि त्यांचे पीठ, चिंचेची भुकटी, पिष्ट (फॅरिना) खळ आणि पांजणी सामग्री, चरबी, पांजणी तेले आणि अशा प्रकारची प्रतिद्रव्ये. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 43 | Hides and skins.<br>चामडी आणि कातडी. | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 44 | Leather including harness, saddles, bags, boxes shoes, *chappels*, slippers, sandles, straps and all articles made of leather.<br>कमावलेली कातडी तसेच ओढण, खोगीर पिशव्या, पेट्या, जोडे, चपला, स्लिपर, सँडल्स, चामड्यांचे पट्टे आणि कमावलेल्या कातड्यांपासून तयार केलेल्या सर्व वस्तू. | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 45 | Rubber tyres and tubes.<br>रबरी टायर आणि ट्यूब नळ्या. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| 46 | (a) Rubber, rubber goods, gatta purcha and articles made thereof (wholly or partly) rubber solution and latex.<br>रबर, रबराच्या वस्तू, गट्टा, परचा आणि (संपूर्णतः किंवा अंशतः) त्यापासून बनविलेल्या वस्तू, रबर, द्रावण आणि रबराचा चीक. | 1.5 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १.५ टक्का | 1.5 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १.५ टक्का |
| | (b) Raw Rubber<br>कच्चे रबर | 1.5 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १.५ टक्का | 1.5 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य १.५ टक्का |
| | *Class VIII.*---Metals and articles made of metals.<br>वर्ग ८ --- धातू आणि धातूंपासून तयार केलेल्या वस्तू | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (b) Scissors, razors, safety razors, blades, knives, pen knives, spoons, forks, cutlery of all kinds, needles of all sorts, locks and keys, stoves and petromax and their parts and accessories and hardware articles.<br>कात्र्या, वस्तरे, सेफ्टी रेझर, पाती (ब्लेड्स), सुऱ्या, चाकू, चमचे, काटे, सर्व प्रकारची कटलरी, सर्व प्रकारच्या सुया, कुलुपे व किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem*<br>यथामूल्य ३ टक्का |
| | (c) Laces, tapes, rings of wood and metal, embroidery articles, celluloid and celluloid articles, beads of all sorts, imitation pearls, articles of imitation jewellery, plastic and plastic goods, plastic powder, backelite and backelite goods.<br>लेस, फिती, लाकडी व धातूच्या रिंगा, भरतकामाच्या वस्तू, सेल्यूलाइड व सेल्युलाइडच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, नकली मोती, नकली जडजवाहिराच्या वस्तू, प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू, प्लास्टिकची भुकटी, बेकेलाईट व बेकेलाईटच्या वस्तू. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | (a) Imitation ornaments.<br>नकली दागिने. | 6 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ६ टक्का | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का |
| | (b) Toys of all kinds.<br>सर्व प्रकारची खेळणी | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 34 | Crockery of all sorts<br>सर्व प्रकारची चिनी मातीची भांडी | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 35 | Glass and glassware including bangles, bottles, articles of china and porcelain wares and earthern wares (excluding articles used for construction or decoration of buildings).<br>बांगड्यांसह काच आणि काचेच्या वस्तू, बाटल्या, चिनी मातीच्या वस्तू, पोसलीनच्या व मातीच्या वस्तू (इमारतींचे बाधकाम किंवा सुशोभीकरण यासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तू वगळून) | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| | *Class VI.*---Tobacco Requisites.<br>वर्ग ६ --- तंबाखू ओढण्यासाठी आवश्यक वस्तू | | |
| 36 | Cigar and Cigarette holders, smoking pipes, cigarette paper, tobacco cases, pouches, cigarette and cigar cases, *hukka* and smoking requisites and cigarette lighters.<br>सिगार व सिगारेट होल्डर, स्मोकिंग पाईप, सिगारेटचा कागद, तंबाखूच्या डब्या, पिशव्या, सिगारेटच्या व सिगारच्या डब्या, हुक्का व धुम्रपानासाठी लागणाऱ्या वस्तू व सिगारेट लायटर. | 6 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ६ टक्का | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का |
| | *Class VII.*---Piece goods cotton, yarn and threads of all sorts and starching and sizing materials, leather and articles of leather and rubber goods.<br>वर्ग ७ --- कापडाचे तागे, सर्व प्रकारचे सूत आणि धागे आणि खळीची व पांजणीची सामग्री, कातडे, कातड्याच्या वस्तू, रबरी वस्तू | | |
| 37 | Piece goods of wool, silk linen, hamp, artificial and synthetic materials and articles made up purely or partly of any of the above material not otherwise specified, 100 per cent. cotton fabrics, readymade garments made out of 100 per cent. Cotton fabrics, hosiery goods made out of 100 per cent. Cotton fabrics, sanitary towels, napkins, disposable baby- | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |

| | | | |
|---|---|---|---|
| | मोझेक किंवा टॅरॅझो फरशा, मातीचे नळ, चिनीमातीचे नळ, सिमेंटचे नळ आणि ॲस्बेस्टॉस सिमेंट पत्रे. | | |
| 26 | Paints distemper and colour washes used for painting buildings, varnish, boiled lines oil, turpentine, zinc oxide and red oxide.<br>इमारतींना रंग देण्यासाठी वापरावयाचे रंगलेप, डिस्टेंपर व रंग, वॉर्निश, अळशीचे उकळविलेले तेल, टर्पेंटाईन, झिंक ऑक्साईड व रेड ऑक्साईड. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 27 | Yellow earth and earth of any other kind except red earth.<br>पिवळी माती व लालमाती व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची माती. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 28 | Glass, glassware, chinaware, enamelware, all kinds of crockery used for construction or decoration of buildings and sanitary fittings, metal valves, brass cocks and their fittings.<br>काच, काचेच्या वस्तू, चिनीमातीच्या वस्तू, एनॅमलच्या वस्तू, इमारतींचे बांधकाम किंवा सुशोभिकरण करण्यासाठी व सॅनिटरी खिळण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या चिनीमातीच्या वस्तू, धातूचे व्हॉल्व, पितळेच्या तोट्या व त्यांच्या खिळण्या. | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 2.5 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २.५ टक्का |
| 29 | Roofing felt.<br>रूफिंग फेल्ट | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का | 2 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य २ टक्का |
| 30 | Timber, ballies, cane and articles made of any of them, doors, windows, frames, furnitures, pets staircases, sandal wood and articles made of such wood.<br>इमारती लाकूड, बल्ल्या, वेत व त्यापैकी कशाही पासून तयार केलेल्या वस्तू, दरवाजे, खिडक्या, चौकटी, फर्निचर, खुंट्या, जिने, चंदनाचे लाकूड व अशा लाकडापासून तयार केलेल्या वस्तू. | 6 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ६ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| | Plywood, soft boards, hard boards masonite or any other kind of wood of whatever composition prepared by artificial process and article made thereof.<br>प्लायवूडे, सॉफ्ट बोर्ड, हार्ड बोर्ड, मॅनोसाईट किंवा कोणतेही घटक असलेले, कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू. | 6 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ६ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |
| | *Class V.*---Perfumes, Toilet Requisites, Colours and Household Goods.<br>*वर्ग ५ --- सुगंधी द्रव्ये, प्रसाधनाच्या वस्तू, रंग व गृहोपयोगी वस्तू* | | |
| 32 | (a) Hair oil, perfumed oils, perfumery of all kinds, scents, *attars*, scented material aromatic chemicals, toilet incense sticks, toilet requisites of all kinds, shaving cream, shaving sticks, tooth powder, tooth paste, pomade, comb, brushes, looking glasses, hairpins, breeches, garters and suspenders.<br>केसांचे तेल, सुगंधी तेले, सर्व प्रकारची सुगंधी द्रव्ये, सेंट, अत्तरे, सुवासिक वस्तू, सुवासिक रसायने, प्रसाधन गृहातील धूपकाड्या, सर्व प्रकारच्या प्रसाधनाच्या वस्तू, दाढीचे क्रीम, दाढीचा साबण, दंतमंजन, टूथ पेस्ट, पोमेड, फण्या-कंगवे, ब्रश, आरसे, हेअरपिना, ब्रीचेस, गार्टर्स, सस्पेंडर्स | 4 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ४ टक्का | 3 per cent. *Ad valorem.*<br>यथामूल्य ३ टक्का |

(xiv) Agricultural and municipal waste conversion devices producing energy

शेतीशी संबंधित कचर आणि महानगरपालिकेने गोळा केलेला कचरा यांची ऊर्जेत निर्माण करण्याची साधने.

(xv) Equipment for utilizing ocean waves and thermal energy.

सागरी लाटा आणि औष्णिक ऊर्जा यांच्या वापराकरिता साधनसामग्री.

(18) Cotton yarn used for handlooms and handloom cotton cloth.

हातमाग व हातमागाचे सुती कापड यांसाठी वापरण्यात येणारे सूत.

(19) Films imported by educational institutions recognized by the Government for the purpose of free education to students.

शासनाने मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यासाठी आयात केलेले चित्रपट.

(20) *Bona fide* luggage and kit belonging to a travelling circus, or to a travelling company, performing Dramas, *Lok Natyas* or *Tamashas* and which is to be used for the performance of the Dramas, *Lok Natyas* or *Tamashas*, as the case may be.

फिरती सर्कस किंवा नाटके, लोकनाट्ये किंवा तमाशा सादर करणाऱ्या फिरत्या कंपन्या यांच्या मालकीचे आणि नाटके, लोकनाट्ये किंवा यथास्थिति, तमाशा सादर करण्यासाठीच वापरावयाचे सामान व सरंजाम.

(21) (a) Bread (Handmade);

पाव (हाताने बनविलेला)

(b) *Ganesh* idols made of either clay or plaster of paris, brought at the time of *Ganesh Chaturthi*.

गणेश चतुर्थीच्या वेळी आणण्यात येणाऱ्या शाडूच्या किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती.

**सुचक श्री. प्रफुल्ल पाटील अनुमोदक श्रीम. नयना गजानन म्हात्रे**

ठराव बहुमताने मंजुर
ठराव वाचून कायम करण्यांत आला.

सुचक श्री जयंत पाटील व अनुमोदक श्री मिलन पाटील यांनी मांडलेल्या ठरावामध्ये सुचक श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक श्रीम. नयना गजानन म्हात्रे समाविष्ठ करुन ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०८/२००८

**प्रकरण क्र. ३० :-** दि. १०/०४/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**(सदर सभा कोरम अभावी रद्द करण्यात आली.)**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०८/२००८

**प्रकरण क्र. ३१ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २००८ मंजूरीबाबत.

**(सदर सभा कोरम अभावी रद्द करण्यात आली.)**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०८/२००८

**प्रकरण क्र. ३२ :-** महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी सन २००८-०९ या वर्षाकरिता आवश्यक औषधे, उपकरणे व साहित्य यांचा पुरवठा करणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**(सदर सभा कोरम अभावी रद्द करण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०८/२००८

**प्रकरण क्र. ३३ :-** भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल बांधणेबाबत.

**(सदर सभा कोरम अभावी रद्द करण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०८/२००८

**प्रकरण क्र. ३५ :-** मिरारोड व भाईंदर स्थानक परिसरात स्कायवॉक (SKY WALK) बांधणेबाबत.

**(सदर सभा कोरम अभावी रद्द करण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०८/२००८

—ज प्रस्ताव

**प्रकरण क्र. ३७ :-** सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०१/०८/२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्मशान भुमित प्रेत दहना करिता जळाउ लाकडे महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करून देणेबाबत.

**(सदर सभा कोरम अभावी रद्द करण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०८/२००८

उ प्रस्ताव

**प्रकरण क्र. ३८ :-** सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १४/०८/२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- सोने चांदीचे व्यापाऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेणेबाबत.

**(सदर सभा कोरम अभावी रद्द करण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०९/२००८

**अभिनंदन ठराव ३३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे स्थायी कर्मचारी श्री. आनंद गबाळे हे परिवहन उपक्रमामध्ये लिपीक म्हणून कार्यरत आहेत. पालिकेतील नोकरी सांभाळून त्यांनी तीन वर्षाचा कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण करुन पदवी प्राप्त केली. त्या बद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. तसेच दि. २१/०८/२००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सहाय्यक नगररचनाकार पदावरील अधिकाऱ्यांना अत्युकृष्ट कामाबद्दल दि. ०१/१०/२००६ पासून अगाउ वेतन वाढ मंजूर करण्यात येत आहे. या संदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सहाय्यक नगररचनाकार श्री. दिलीप प्र. घेवारे यांचाही समावेश आहे. या बद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत पालांडे** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२००८

**प्रकरण क्र. २८ :- रेशनिंग कार्यालयाकरिता भाड्यानं जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विचार विनिमय करणे.**

ठराव क्र. :- 30

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत एक रेशनिंग कार्यालय असून ते भाईंदर पूर्व गंर्धवराज या इमारतीमध्ये आहे. सदर इमारत ही गैरसोईची असल्यामुळे नागरिकांना येथे ये जा करणे अडचणीचे ठरत आहे.

मिरा भाईंदर शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता रेशनिंग कार्यालयासाठी मोठी व नागरिकांना सोईची ठरेल अशी जागा उपलब्ध करणे गरजेचे आहे. उपनियंत्रक, शिधावाटप, ठाणे ह्यांनी यापूर्वीच महानगरपालिकेने भाड्याने जागा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली आहे.

शिधावाटप कार्यालयाची अडचण लक्षात घेता तसेच उपनियंत्रक, शिधावाटप, ठाणे ह्यांच्या विनंतीचा विचार करता रेशनिंग कार्यालयासाठी महापालिका क्षेत्रातील उड्डाणपुला खाली भाईंदर पुर्व बाजुस जागा उपलब्ध करून देणे सोयीचे ठरेल. उड्डाण पुलाखालील जागेत रेशनिंग कार्यालय सुरू झाल्यास महापालिका हद्दीतील सर्व विभागातील नागरिकांना जाणे येणे करिता सोयीचे होईल.

तरी उड्डाण पुला खालील भाईंदर पुर्वेकडील जागा रेशनिंग कार्यालयासाठी भाड्याने देण्यास ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा.    अनुमोदक :- श्री. राजेश ह. म्हात्रे.**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. अनिल सावंत अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत एक रेशनिंग कार्यालय कार्यरत असुन ते भाईंदर पुर्व येथे आहे. त्या कार्यालयाला कार्यालय म्हणणे हे सुद्धा आपणांसाठी शरमेची गोष्ट आहे. धुळीचे साम्राज्य, उंदीर घुशींचा मुक्त संचार, ईमारतीच्या बाजुला असलेला चिखल आणि दलालांचा विळखा असे आज या कार्यालयाचे स्वरूप आहे आणि नाविलाजाने का होईना प्रत्येकाला आज गरज म्हणून त्याठिकाणी जाव लागत आहे. या कार्यालयामध्ये काम करणे ही सुद्धा एक शिक्षा आहे म्हणून ईथे आलेला कर्मचारी सुद्धा बहूतेक वेळा रजेवरच असतो. शहराची वाढती लोकसंख्या (१० लाख) लक्षात घेउन मा. आमदार मुझफ्फर हुसैन यांनी अधिवेशन २००७ मध्ये या विषयावर लक्षवेधी मांडून मिरा

भाईंदर मधिल जनतेवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली. शासनाने याची दखल घेउन मिरा रोड व भाईंदर साठी २ रेशनिंग कार्यालये असणे गरजेचे आहे हे मान्य केले. त्याला अनुसरुन जागा शोधण्याचे प्रयत्न चालू केले. मा. आमदार मुझफ्फर हुसेन यांनी मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना जागा उपलब्ध करून देणेविषयी विनंती केली. परंतु खेदाची गोष्ट म्हणजे महानगरपालिकेला त्या बाबतीत अपयश आले. शहराच्या वाढत असलेल्या लोकसंख्येचा विचार करता मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत दोन शिधावाटप कार्यालये असणे फार गरजेचे आहे. तेव्हा मिरा रोड येथे मिरा रोड, काशीमिरा, मिरा गांव, घोडबंदर येथील नागरिकांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग कार्यालय क्र. ४ येथे पहिल्या मजल्यावर शिधा वाटप कार्यालय निर्मिती करून जागा उपलब्ध करून द्यावी.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदन :- श्री. दिनेश दगडू नलावडे**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

तरी महानगरपालिका भाईंदर (प.) येथे उड्डाण पुलाच्या खाली परिवहन विभागास दिलेल्या जागेच्या पुढे ६० X २३ फुटाची किंवा त्याठिकाणी शक्य नसल्यास भाईंदर (पु.) उड्डाण पुलाच्या खाली ६० X २३ तसेच या ठरावामध्ये पाणी मिटर तपासणी कार्यालयासाठी २० X २० जागा बांधकाम करतेवेळी यांच्यात समाविष्ट करून घ्यावे. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे व सदरची जागा शहराच्या मध्यभागी असल्याने त्याठिकाणी रिक्षा, खाजगी वाहने यांची सोय असल्याने नागरिकांना फायदा होईल. अशी मी सुचना मांडत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

रेशनिंग कार्यालयाकरिता भाईंदर पूर्वेच्या बाजूला उड्डाणपुलाखाली जागा देण्यास मंजुरी देत आहे. तसेच रेशनिंग कार्यालयाकरिता भविष्यात दुसरे कार्यालय उघडण्याची आवश्यकता भासल्यास मिरारोड येथील प्रभाग समिती क्र. ४ येथील कार्यालयात जागा उपलब्ध करुन द्यावी. त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १८/०९/२००८.**

**प्रकरण क्र. ३९ :- दि. १०/०४/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ३४ :-**

दि. १०/०४/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे. तसेच महिला बालकल्याण विभाग स्थापन करुन आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०९/२००८

**प्रकरण क्र. ४० :-** महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी सन २००८-०९ या वर्षाकरिता आवश्यक औषधे, उपकरणे व साहित्य यांचा पुरवठा करणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र.** :- ३५

मिरा भाईंदर शहरातील लोकसंख्या सुमारे ८ ते ९ लाख आहे. मिरा भाईंदर शहरवासियांना आरोग्य सोयीसुविधा उपलब्ध होणे करिता महानगरपालिकातर्फे ७ आरोग्य केंद्र, १ आरोग्य उपकेंद्र, १ फिरता दवाखाना सुरु आहे. सदर आरोग्य केंद्रातून दररोज सुमारे ७००-८०० बाह्यरुग्ण लाभ घेत असतात. महानगरपालिकातर्फे आरोग्य केंद्रासाठी लागणाऱ्या औषधाचा साठा थोड्या कालावधीतच संपणार आहे. त्यामुळे आरोग्य केंद्रासाठी सन २००८-०९ साठी आवश्यक औषधे व उपकरणे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे. महानगरपालिकातर्फे यापूर्वी आरोग्य केंद्रामध्ये वापरण्यात येणारी औषधे ब्रांडेड कंपनीची न वापरता जनरीक ब्रँडची औषधे वापरली जात होती. जनरीक ब्रॉड औषधे त्याची गुणवत्ता ब्रांडेड कंपनीच्या औषधाच्या गुणवत्तेमध्ये जास्त फरक नसला तरी ब्रांडेड (TRADE MARK CO) च्या औषधांची पॅकींग चांगल्या दर्जाची केली जाते. मुदत संपल्यानंतर विशिष्ट कालावधीच्या आत रिप्लेसमेंट कंपनीकडून केली जाते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत नाही. तरी आरोग्याच्या दृष्टीने ट्रेड मार्क कंपनीची औषधे महाग असली तरीही आरोग्याच्या दृष्टीने जास्त फायद्याची असतात. तरी महानगरपालिकेने २००८-२००९ या वर्षासाठी लागणारी औषधे ट्रेड मार्क कंपनी Cadila (कॅडीला लिमिटेड) wk (वोकार्ड लिमिटेड) RB (रेप्यकोश लिमिटेड) Ranbaxy (रेनवाक्सी लिमिटेड) BE (बायोलॉजीकल इवास) USV (यूसवी विटामिन लिमिटेड) Cipla (सिपला लिमिटेड) Glaxo (ग्लॅक्सो लिमिटेड) या कंपनीची औषधे, उपकरणे व साहित्य इत्यादी खरेदी करण्यासाठी ९०,००,००० (अक्षरी रु. नव्वद लाख मात्र) ची प्रशासकीय मंजूरी देण्यात यावे.

**सुचक :- सौ. कल्पना म्हात्रे** **अनुमोदन :- ओमप्रकाश अग्रवाल**

**सदर ठरावामध्ये सुचक श्रीम. प्रभात पाटील व अनुमोदन सौ. उमा वि. सपार यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

औषधे खरेदी करताना औषधांच्या एक्सपायरी डेटनुसार (Expiry Date) ९० दिवसांच्या गरजेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करावीत व प्रत्येक ३ महिन्यांच्या औषधांच्या बिल व स्टॉकच्या तपशिलाचा अहवाल महासभेपुढे सादर करावा.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. राजेंद्र जैन व अनुमोदन सौ. दिव्या तिवारी यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

औषधे खरेदी करताना मा. आयुक्त यांनी ब्रॅन्डेड व जनरीक औषधांच्या दरामधील तफावत पाहून औषध खरेदी करणेचा निर्णय घ्यावा.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

२५/११/०८

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०९/२००८

**प्रकरण क्र. ४१ :-** भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल इमारत बांधणे बाबत.

**ठराव क्र** ३९:-

मिरा भाईंदर जनतेसाठी टेंभा हॉस्पीटल होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे गोरगरीबांना स्वस्तात उपचार मिळणार आहेत. आजच्या महासभेत प्रकरण क्र. ४१ मध्ये दिलेला गोषवारा हा विषयांतर करणार असून त्यामुळे प्रशासनाची भुमिका निश्चित होत नाही. तरी इमारत बांधकामा संबंधी संपूर्ण माहितीसह विषय आणावा. तसेच झोपडपट्टी संबंधी वेगळा विषय पुढील सभेत आणावा. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | पाटील उमाताई शाम | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४ | सुनिता कैलास पाटील | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सावळे निर्मला बाबुराव | |
| ८ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ८ | भोईर शशिकांत जगन्नाथ | |
| ९ | ठाकुर प्रकाश पांडुरंग | ९ | सुनिता शशिकांत भोईर | |
| १० | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १० | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | |
| ११ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | ११ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | |
| १२ | शर्मा भगवती तुगनचंद | १२ | जंगम लक्ष्मण गणपत | |
| १३ | पाटील वंदना मंगेश | १३ | सपार उमा विश्वनाथ | |
| १४ | चक्रे वंदना रामदास | १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १५ | माळी हेमा रविंद्र | १५ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | |
| १६ | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १६ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | |
| १७ | अनिता जयवंत पाटील | १७ | श्रीमती.सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| १८ | परेरा टेरी पॉल | १८ | शेख नुर मोहम्मद अेहमद | निरंक |
| १९ | मेहता नरेंद्र लालचंद | १९ | शफीक अहमद सादत खान | |
| २० | वर्षा गिरधर भानुशाली | २० | भाटकर प्रेरणा प्रमोद | |
| २१ | भोईर राजू यशवंत | २१ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २२ | जाधव मोहन महादेव | २२ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | |
| २३ | सिंह मदन उदितनारायण | २३ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २४ | म्हात्रे कल्पना महेश | २४ | श्री.मोदी चद्रकांत भिकालाल | |
| २५ | पाटील शरद केशव | २५ | भट दिप्ती शेखर | |
| २६ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २६ | अनिल दिवाकर सावंत | |
| २७ | बाविघर सिसिलीया विजय | २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २८ | शेट्टी गणेश गोपाळ | |
| २९ | पांडे स्नेहा शैलेश | २९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| ३० | दुबे रामनारायण सदानंद | ३० | व्यास सुधा वासुदेव | |
| ३१ | यादव मिरादेवी रामलाल | ३१ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ३२ | पाटील प्रविण मोरेश्वर | ३२ | मिलन वसंत म्हात्रे | |
| ३३ | पाटील अनंत रामचंद्र | ३३ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३४ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | ३४ | धनेश परशुराम पाटील | |
| ३५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३६ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०९/२००८

**प्रकरण क्र. ४२ :-** मिरारोड व भाईंदर स्थानक परिसरात स्कायवॉक (SKY WALK) बांधणेबाबत.

**ठराव क्र. :-** ३७

विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत (Extended MUIP Programme) मुंबई महानगर प्रदेशातील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) मिरारोड (पूर्व) रेल्वे स्थानक, भाईंदर (प.) रेल्वे स्थानक व भाईंदर (पूर्व) रेल्वे स्थानक येथे पदाचाऱ्यांच्या सोयीसाठी स्काय वॉक (Sky Walk) बांधण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. सदर प्राधिकरणाने संयुक्त पाहणी करुन आखणी नकाशा (Sky Walk Alignment Plan) तयार करुन महानगरपालिकेकडे सादर केला आहे. सदर सर्व स्काय वॉकचे काम मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) हाती घेण्यात येणार असून मार्च २००९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावर होणार सर्व खर्च व कामाबाबातची सर्व प्रक्रिया प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे.

मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) प्रस्तावित सदर कामांना महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद केशव पाटील** **अनुमोदक :- श्री. अनिल दि. सावंत**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी खालील सुचना मांडली.**

भाईंदर पूर्व - पश्चिम जोडणारा रेल्वे मार्गावरुन पादचारी मार्ग (FOB)बांधणेचा प्रस्ताव MMRDA ने मंजुर केला असून तो अंतर्भुत करावा तसेच रेल्वे लाईन समांतर भाईंदर (प.) येथे नाला आहे. त्यात संपूर्ण परिसराचे सांडपाणी जाते त्याला बाधा होता कामा नये याची दक्षता घ्यावी. तसेच इमारतींच्या रहिवाश्यांनाही याचा त्रास होणार नाही याची काळजी ध्यावी.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. भगवती शर्मा व अनुमोदन श्री. मिलन पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर पश्चिम येथे बांधण्यात येणारा स्कायवॉक भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन ते सुदामा नगर फुट ओवर ब्रीज पर्यंत बनविणे ऐवजी, तो रेल्वे स्टेशन ते रेल्वे फाटक पर्यंत (एम.टी.एन.एल. इमारत) बनविण्यात यावा.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. जुबेर इनामदार व अनुमोदक श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत (Extended MUIP Programme) मुंबई महानगर प्रदेशातील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) मिरारोड (पूर्व) रेल्वे स्थानक, भाईंदर (प.) रेल्वे स्थानक व भाईंदर (पूर्व) रेल्वे स्थानक येथे

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देश करून स्थायी समिती सदस्य म्हणू नांवे घोषीत करावीत, हि विनंती.

सही/-

अनंत पाटील

( अनंत रामचंद्र पाटील )
गटनेता

135

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नांव-३२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : २० ऑक्टोबर, २००८.

प्रति,
नगर सचिव,
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
मिरा-भाईंदर, जि.ठाणे.

नगरसचिव विभाग
दिनांक : २९/१०/०८
४८/०८-०९

**विषय :-** महानगरपालिकेतील स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या जागा व इतर समित्यांच्या वेळोवेळी विविध कारणांनी रिक्त होणाऱ्या जागा भरण्याच्या पध्दतीबाबत.

**संदर्भ:-** आपले क्र.मनपा/सचिव/१०६/२००८-०९, दि.२०.१०.२००८ चे पत्र.

**महोदय,**

आपल्या उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणाऱ्या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतची तरतुद अधिनियमात सुधारणेद्वारे करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक ऑक्टोबर, २००७ मध्ये झाली असुन तदनंतर स्थायी समितीच्या सदस्यांची नेमणूक बलाबलानुसार करण्यात आली आहे. सदरहु बलाबल कायम असल्यास जे निम्मे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे असतील त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे, जेणेकरुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरतुदीची पुर्तता होवु शकेल.

तसेच कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटांचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षीत आहे. मात्र अशा वेळेस पूर्वीच्या तुलनेने पक्षांच्या / गटांच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.

**आपला,**

**( फ. ब. खान )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :
सभागृह नेता, मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १०/१०/२००८

**प्रकरण क्रमांक ( ५८ )** भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल इमारतीच्या जागेवर असलेल्या कुटुंबाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक ( ४९)**

भाईंदर (प) येथील टेंभा हॉस्पीटलची जागा जिल्हापरिषदेच्या आरोग्य केंद्रासाठी वापरात होती. सदर जागेचा ताबा दि. १६/०८/२००७ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने जिल्हापरिषदेकडे रूपये २,८२,१४,७३७/- एवढी रक्कम भरून घेतलेला आहे. सदर जागेचे एकूण क्षेत्र ८३४१.९५ चौ.मीटर एवढे आहे. सदर जागेचा ताबा घेतेवेळी या जागेत २३ कुटुंबे राहत होती. त्यामुळे सदर जागेवर हॉस्पीटलचे काम सुरू करण्यापूर्वी या २३ कुटुंबाना स्थलांतरीत करावे लागणार आहे. सदर कुटुंबानी महानगरपालिकेकडे **४ ऑगस्ट २००८ रोजी पत्र देउन ते राहत असलेल्या जागेवर हॉस्पीटल इमारत बांधावयाची असल्याने त्यांच्याबाबत नियमानुसार पुढील निर्णय होईपर्यंत महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या Housing For Dishoused या आरक्षणात बांधलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या सदनिकेमध्ये महानगरपालिकेच्या धोरणानुसार ठरलेल्या भाडयाने, भाडे भरून स्थलांतर करण्यास हरकत नाही असे कळविले आहे.** सदर कुटुंबाचे पुर्नवसन करण्याबाबत मा. नगरसेवक, पदाधिकारी यांनी देखिल महानगरपालिकेकडे मागणी केलेली आहे.

टेंभा हॉस्पीटलच्या जागेवरील कुटुंबाचे नियमानुसार पुर्नवसन करावे. सदर कुटुंबाना तात्पुरत्या स्वरूपात Housing For Dishoused या आरक्षणात बांधलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या सदनिका भाडयाने दिल्यास टेंभा हॉस्पीटलची संपूर्ण जागा रिकामी करता येईल. प्रशासनाच्या वरील गोषवाऱ्यानुसार सदर कुटुंबाना तात्पुरत्या स्वरूपात Housing For Dishoused या आरक्षणात बांधलेल्या जागेतील सदनिका नाममात्र भाडयाने देण्यास ही सभा मंजुरी देत आहे. सदर सदनिकांचे भाडे ठरविणे व योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे. भाडयाने दिलेल्या सदनिकांचे मेंटनन्स, विज पुरवठा, पाणी बिल हया कुटुंबांनी भरावयाचे आहे. सदर प्रस्ताव कुटुंबानी अमान्य केल्यास मा. आयुक्त यांनी सदर कुटुंबाना तातडीने जागेतून काढून टाकण्याची कार्यवाही करावी.

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी सुचना मांडली.**

भाईंदर (प.) टेभा हॉस्पीटल इमारतीच्या जागेवर जे अतिक्रमण झालेले आहे. त्यातील काही जिल्हा परिषद ठाणे येथील कर्मचारी आहेत. त्यांना जिल्हा परिषद ठाणे निवास भत्ता देत आहेत म्हणून त्यांना सदरच्या जागेच्या बदल्यात रुम देउ नयेत.

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात यावा**

**पिठासन अधिकारी**

# टेंभा हॉस्पीटल जागेतील रहिवाश्यांची यादी

| अ. क्र. | कुटुंब प्रमुखाचे नांव |
|---|---|
| १ | अनुसया किरण कोरगांवकर |
| २ | सुनिता शंकर चव्हाण |
| ३ | नारायण केशव घरत |
| ४ | प्रकाश जानू सुलंबे |
| ५ | पारुबाई केशव घरत |
| ६ | प्रभावती सुरेश बारे |
| ७ | कृष्णा लक्ष्मण बरफ |
| ८ | कस्तूर लक्ष्मण बरफ |
| ९ | निर्मला बालकृष्ण डोके |
| १० | मैक्सन पोल्डर रिबेलो |
| ११ | मारूती सुकूर राठोड |
| १२ | रमेश सुकूर राठोड |
| १३ | बाबू सुकूर राठोड |
| १४ | ईश्वर यशवंत दुबला |
| १५ | लक्ष्मी रामचंद्र टोपले |
| १६ | यशोदा नारायण आतकरी |
| १७ | अरुण सोनपाल डिसोजा |
| १८ | संजय तुकाराम मोहिते |
| १९ | प्रभाकर चिमण राउुत |
| २० | बासु रव्या राठोड |
| २१ | रव्या मान्या दुबला |
| २२ | पप्पी विठ्ठल दुबला |
| २३ | संगीता गणेश राजपूत |

123

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१०/१०/२००८

प्रकरण क्र. - ५९

विषय – मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मोबाईल टॉवरवर शुल्क आकारणे बाबत.

ठराव क्र. ५० -

महानगरपालिका क्षेत्रात विविध मोबाईल कंपन्यामार्फत इमारतीच्या टेरेसवर मोबाईल यंत्रणा (तात्पूरती शेल्टर कॅबिन व ॲंटिना) बसविणेस शासनाच्या दि.०४/०७/२००५ च्या परिपत्राकानुसार व इतर महानगरपालिकेच्या धर्तीवर इमारतीची अनधिकृतता विचारात न घेता अनामत व आकारणीसह आयुक्त यांचे दि.२४/०१/२००६ रोजीच्या मंजूरीनुसार परवानगी देण्यात येत होती.

वरिल प्रमाणे आकारण्यात येणा-या शुल्कास (मागणी नोटीस) मे. भारती एअरटेल कंपनी व इतर यांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ७८२४/२००५ दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते. दि.०८/०३/२००७ रोजीच्या आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाने मा. शासनाचे दि.०४/०७/२००५ रोजीचे परिपत्रक रद्द केलेले आहे. तसेच मा. शासनाकडून दि.०७/०८/२००७ अन्वये याबाबत पत्र प्राप्त झालेले असून शासनाने खालील प्रमाणे सुचना केल्या आहेत.

"मोबईल कंपन्यांनी शुल्क आणि प्रिमियम आकारणीसंबंधी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने प्रिमियमची आकारणी अवैध ठरविली आहे. तथापी विनापरवानगी टॉवर्सवर नियमानुसार नव्याने नोटीस बजावून कारवाई महापालिका करु शकते असा निर्णय दिला असल्याने मोबाईल टॉवर्स संबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६, महानगरपालिका / नगरपालिका अधिनियमांमधील तरतूदीनुसार नव्याने नोटीस जारी करुन कारवाई करण्यात यावी".

सबब मोबाईल टॉवर्सना परवानगी देणेबाबत धोरण नसल्याने या कार्यालयाच्या दि.३०/११/२००७ च्या पत्राने शासनाकडून याबाबत मार्गदर्शन मागविलेले आहे. तथापी अद्यापपर्यंत मार्गदर्शन प्राप्त नाही.

दरम्यान नवी मुंबई महानगरपालिकेने धोरण निश्चित केल्याचे दिसून येत आहे.

[illegible] नियमितकरणासाठी आकारण्यात [illegible]

[illegible] (Refundable)

[illegible]

[illegible] शुल्क [illegible]

[illegible] शुल्क [illegible] नाही

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] महानगरपालिकेच्या [illegible] यांतर्फे [illegible]

[illegible] प्रमाणे शुल्क [illegible] कल्याण [illegible] महानगरपालिकेच्या [illegible]

[illegible] वसूल [illegible]

सूचक [illegible] अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

[illegible]

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १०/१०/२००८

**प्रकरण क्र** :- ( ६० ) :- विकास आराखडयातील मैदाने, बगीचे विकसित करणे आदी कामांना आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देणे बाबत.

ठराव क्र. :- ( ५१ )

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या विकास आराखडयात दर्शविलेल्या विविध आरक्षणाच्या जागा टी.डी.आर. तरतूदी अन्वये महानगरपालिकेच्या ताब्यात आल्या आहेत. सदर जागेचा टी.डी.आर देताना नगररचना विभागाने कुंपण भिंत व माती भरावाची रक्कम जमा करून घेतलेली आहे. टी.डी.आर. तरतूदीद्वारे भागशः ताब्यात आलेल्या आरक्षणाचा तसेच विकसित करावयाच्या इतर आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे नांव | आरक्षणाचे एकूण क्षेत्र | ताब्यात आलेले क्षेत्र | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२२ | गोल्डन नेस्ट, खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण | ४६,७००.०० चौ.मी | २०,३४४.०४ चौ.मी | रू.६४,२५,३००/- |
| २ | १७० | मिरारोड, खेळाचे मैदान | १९,५००.०० चौ.मीटर | ५५०२.०० चौ.मी | रू.२८,५१,३००/- |
| ३ | १७८ | मिरारोड, खेळाचे मैदान | ९०००.०० चौ.मी. | ४३३०.१२ चौ.मी. | रू.२७,१६,८००/- |
| ४ | ११९ | भाईदर (पूर्व) गोल्डन नेस्ट, खेळाचे मैदान | १६८००.०० चौ.मी. | ११०८०.२५ चौ.मी. | रू.३४,७७,५००/- |
| ५ | १०९ | भाईदर (पूर्व) नवघर रोड, खेळाचे मैदान | १०,४००.०० चौ.मी. | ४६८८.१६ चौ.मी. | रू.२७,१६,८००/- |
| ६ | १११ | भाईदर (पूर्व) नवघर रोड, बगीचा | ५२००.००चौ.मी | ११६५.७१ चौ.मी. | रू.२१,७३,५००/- |
| ७ | २४६ | भाईदर (पूर्व) खेळाचे मैदान | ३८२००.०० चौ.मी. | ११२६४.२५ चौ.मी | रू.३७,४९,२००/- |
| ८ | २६९ | भाईदर (पूर्व) कनकिया रोड, बगीचा | २२४००.०० चौ.मी. | १५९२३.१९ चौ.मी. | रू.४१,२९,६००/- |
| ९ | २४२ | भाईदर (पूर्व) बगीचा | १४४००.०० चौ.मी. | ७६१५.०० चौ.मी. | रू.२७,४४,०००/- |
| १० | ११७ | भाईदर (पूर्व) बगीचा | १०२००.०० चौ.मी. | ३०९४.०० चौ.मी. | रू.२९,२०,६००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | २२१ | भाईंदर (पूर्व) बगीचा | १६२००.०० चौ.मी. | ११८००.०० चौ.मी. | रू.३६,४०,५००/- |
| १२ | १०० | भाईंदर (प), बगीचा | ५५००.०० चौ.मी. | - | रू.२३,८०,८००/- |
| १३ | २८० | घोडबंदर, बगीचा | १८००.०० चौ.मी. | - | रू १२,९३,८००/- |

वरील आरक्षणांच्या संपूर्ण जागा महानगरपालिकेने लवकरात लवकर ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. वरील जागांच्या ७/१२ सदरी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे नाव कब्जेदार सदरी नोंदविण्यात आलेले आहे.

परंतू मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या केस क्र. सी/डेस्क/१/टी-१/ जमिन/ इस्टेट/ इन्वेस्टमेंट/ १२/०७/ मधील दि. ०५/०९/२००८ च्या अन्वये दि इस्टेट इन्वेस्टमेंट कं. प्रा.लि. चे नाव ७/१२ मध्ये कब्जेदार सदरी लॅण्ड होल्डर / सुपिरीअर होल्डर म्हणून रेषेच्या वर नोंदविण्याचे जमिन मालकांची नावे रेषेच्याखाली ठेवण्यांचे आदेश दिले आहेत.

ज्या जमिनीच्या बाबतीत वरीलप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश पारीत झालेले आहे. त्या जमिनीच्या ७/१२ मध्ये मा तहसिलदार ठाणे यांनी तलाठी व सर्कल यांचे मार्फत फेरफार क्र. १७८२/ घोडबंदर, १०८९/नवघर, ४९१/खारी, ९७७/गोडदेव, भाईंदर दि. १७/०९/२००८ रोजी दि इस्टेट इक्वेस्टमेंट कं. प्रा. लि. यांचे नाव सुपिरिअर होल्डर म्हणून दाखल केलेले आहे.

वरील फेरफारामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे नाव ज्या जागेचा टीडीआर दिलेला आहे त्या जागेच्या ७/१२ उंताऱ्यात सुपिरिअर होल्डर ऐवजी इन्फीरीअर हॉल्डर असे नोंदविण्यात आल्याचे कळते. तसेच यापुढील आरक्षणाच्या जागा प्रत्यक्षात कब्जा व मालकी असलेल्या शेत मालकांना टीडीआर देवून ताब्यात घ्यावयाच्या झाल्यास वरील आदेशामुळे कायदेशीर अडचणी संभवतात.

मा. जिल्हाधिकारी यांच्या वरील आदेशामुळे प्रत्यक्षात वरील फेरफारामुळे झालेल्या नोंदी तपासून व भविष्यात जागची मालकी हस्तांतरीत करण्यासाठी व वरीलप्रमाणे टीडीआर देवून संबंधित जागांवरील आरक्षण प्रत्यक्षात विकसित करावयाची झाल्यास येणाऱ्या अडचणी लक्षात घेता महानगरपालिकेने सदर आदेशाविरुध्द सक्षम न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे.

मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाच्या विरोधात संबंधित विकासक व शेतकरी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन दाखल केलेल्या आहेत. महानगरपालिकेने या रिट पिटीशनमध्ये मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने बाधित होत असल्याच्या कारणावरून पक्षकार म्हणून अर्ज दाखल करावा. किंवा स्वतंत्र रिट पिटीशन दाखल करावे त्यासाठी पॅनलवरील अभियोक्ता व विशेष वरीष्ठ अभियोक्ता यांची नेमणूक करावी. यासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

वरील प्रकरणानुसार आरक्षण विकसित करताना माती भराव करावयाचा झाल्यास भराव करणाऱ्या ठेकेदारांकडून थेट दर पत्रक मागवून कमी दराच्या दरपत्रकास मा. आयुक्त यांची मंजुरी घ्यावी. आरक्षणातील जागेभोवती जमिनीवर कमीत कमी २ फुट उंचीची भित किंवा त्यापेक्षा जास्त

बांधण्यात यावी. वरील प्रमाणे सर्व आरक्षणे विकसित करताना प्रत्येक आरक्षणासाठी लागणारी माती भराव, कुंपणभिंत व इतर सुशोभिकरण कामाचा तपशिल महासभेपुढे स्वतंत्रपणे सादर करावा.

वरील प्रमाणे आरक्षण विकसित करण्याच्या कामाच्या अंदाजित खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील** **अनुमोदन :- ॲड एस. ए. खान**

**सुचना :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेने आजपर्यत विकासकांच्या ले- आउटला विविध ठिकाणी मंजूरी दिली आहे. ले आउट मधील बगीचा व इतर आरक्षणे जी महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेली आहेत किंवा ताब्यात घ्यावयाची आहे ती विकसित करण्यासाठी त्यास येणाऱ्या खर्चाच्या मंजूरीचा प्रस्ताव तसेच आरक्षण क्र. १२२ (क) मध्ये टी.डी.आर दिलेल्या जागेचे आरक्षण (मैदाने) विकसित करण्याचा प्रस्ताव पुढील महासभेपुढे सादर करावा.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे**

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा, दि. १०/१०/२००८**

## // ठराव //

**प्रकरण क्र. ६१ :-** बिहार पुरग्रस्तांसाठी महानगरपालिका फंडातून महाराष्ट्र राज्याच्या मा. मुख्यमंत्री निधीमध्ये आर्थिक मदत देणेबाबत.

**ठराव क्र. :-** ५२

माहे सप्टेंबर २००८ मध्ये बिहार राज्यात कोशी नदीला आलेल्या महापुरामुळे लाखो एकर जमिनी पुराच्या पाण्यांत बुडाल्या होत्या व हजारो कुटूंबे निराधार झाली होती. बिहार राज्यावर व तेथील जनतेवर आलेल्या या मोठ्या संकटाच्या वेळी सर्व देशभरातून मदतीचा ओघ सुरू झाला होता. बिहार राज्यातील जनतेवर आलेल्या या संकटास सामना देण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या फंडामधून रू. 1100000.00 (अकरा लाख) इतकी आर्थिक मदत मा. मुख्यमंत्री निधीमार्फत देण्यासाठीच्या ठरावास ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक - श्री. एम. ए. खान

अनुमोदक

ठराव बहुमताने मंजूर

ठराव वाचुन कायम करण्यास येत आहे.

**महापौर**

मिरा भाईंदर महानगरपालिका

128

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १०/१०/२००८

(उपप्रस्ताव)

**प्रकरण क्र. ६२ :-** सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०३/१०/२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- उपकर अनुसूची अ मधील बाब क्र. १ - वाळवलेली गवार, सोयाबीन, वाळवलेले धान्य व भात, धान्य धरुन पीठ, डाळी व तृण धान्ये इ. मालावरील दर कमी करणेबाबत.

**(सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशाने पुढील सभेत घेण्याचे ठरले.)**

सही/-
महापौर
*मिरा भाईंदर महानगरपालिका*

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १०/१०/२००८

**दुखवठा ठराव ५३ :-**

जेष्ठ गायक महेंद्र कपुर यांचे दि. २७/०९/२००८ रोजी निधन झाले. कै. गंगाधर गाडगीळ यांचेही दि. २७/०९/२००८ रोजी निधन झाले. तसेच जेष्ठ दिग्दर्शक, अभिनेते, रंगकर्मी कै. दामु केंकरे यांचे दि. २८/०९/२००८ रोजी निधन झाले आहे. तर त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदन :- श्रीम. उमा पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि. २१/१०/२००८

**प्रकरण क्र. ६४ :-** मिरा भाईंदर महानगरपालिकांच्या स्मशानभुमीत प्रेत दहनाकरिता जळाउ लाकडे पुरवठा करणे व जळाउ लाकडांचे समान दर निश्चित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/९/२००८ रोजीचे शिफारस केलेले ठराव क्र. ६१)

**ठराव क्र.५५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत प्रेत दहनाकरिता रु. १०००/- दराने लाकडे पुरवठा करणेस मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०९/२००८ ठराव क्र. ६१ अन्वये पारित केलेल्या ठरावानुसार कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदक :- श्री. राजेश म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख अनुमोदक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर ठरावात शहरातील व ग्रामीण, आदिवासी, झोपडपट्टीतील गोर-गरीब व आर्थिकदृष्ट्या कमकुवत व सर्व जातीच्या व गरजु नागरीकांना मोफतपणे लाकडे पुरवठा करणे व दफनकरिता देखील मोफत व्यवस्था करण्यात यावी अशी सुचना मांडत आहे. तसेच मोफत लाकडे देण्याकरिता नगरसेवक अथवा लोकप्रतिनिधी यांची शिफारस पत्र धेवुन दहन दाखला देणाऱ्या महानगरपालिकेच्या कर्मचारी / अधिकारी यांनी नोंद करुन कार्यवाही करावी.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | पाटील उमाताई शाम | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | नलावडे दिनेश दगडू | |
| ४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | सुनिता कैलास पाटील | |
| ६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ६ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ७ | शेख आसिफ गुलाब | ७ | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | |
| ८ | गोविंद हेलन जॉर्जी | ८ | सावळे निर्मला बाबुराव | |
| ९ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | ९ | कुरेश याकुब ईस्माईल | |
| १० | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | १० | भोईर शशिकांत जगन्नाथ | |
| ११ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | ११ | सुनिता शशिकांत भोईर | |
| १२ | शर्मा भगवती तुगनचंद | १२ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | |
| १३ | पाटील वंदना मंगेश | १३ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| १४ | चक्रे वंदना रामदास | १४ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | |
| १५ | माळी हेमा रविंद्र | १५ | जंगम लक्ष्मण गणपत | |
| १६ | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १६ | सपार उमा विश्वनाथ | |
| १७ | अनिता जयवंत पाटील | १७ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १८ | मेहता नरेंद्र लालचंद | १८ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | |
| १९ | वर्षा गिरधर भानुशाली | १९ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | |
| २० | भोईर राजू यशवंत | २० | श्रीमती.सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| २१ | जाधव मोहन महादेव | २१ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| २२ | सिंह मदन उदितनारायण | २२ | शफीक अहमद सादत खान | |
| २३ | म्हात्रे कल्पना महेश | २३ | भाटकर प्रेरणा प्रमोद | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | पाटील शरद केशव | २४ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २५ | वैती विजया हेमचंद्र | |
| २६ | बाविघर सिसिलीया विजय | २६ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | |
| २७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २७ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २८ | पांडे स्नेहा शैलेश | २८ | श्री.मोदी चद्रकांत भिकालाल | |
| २९ | दुबे रामनारायण सदानंद | २९ | भट दिप्ती शेखर | |
| ३० | यादव मिरादेवी रामलाल | ३० | वैती चंद्रकांत सिताराम | |
| ३१ | पाटील प्रविण मोरेश्वर | ३१ | अनिल दिवाकर सावंत | |
| ३२ | पाटील अनंत रामचंद्र | ३२ | शेख सलिम दाउद | |
| ३३ | पालांडे प्रशांत भगवंतराव | ३३ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| ३४ | गावंड मंदाकिनी आत्माराम | ३४ | व्यास सुधा वासुदेव | |
| ३५ | म्हात्रे मोहन गोपाळ | ३५ | धनेश परशुराम पाटील | |
| ३६ | निर्णायक मत :- श्री. नरेंद्र मेहता (महापौर) | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/१०/२००८

**प्रकरण क्र. ६५ :-** मिरा भाईदर महानगरपालिका शहरासाठीच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन अधिसुचना क्र. टी.पी.एस.-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि. १४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना क्र. टी.पी.एस.-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि. २५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि. १५/०७/९७ व दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

या मंजूर विकास नियंत्रण नियमावली मधील Appendix-I व विनियम ३२(५) प्रमाणे अल्प उत्तन्नधारक गटासाठी (LIG) व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी (EWS) तसेच मध्यम उत्पन्न गटधाराकांसाठीच्या (MIG) गृहसंकुलाच्या मंजूरीसाठी नियमावली मंजूर करण्यात आलेली आहे. या नियमा व्यतिरिक्त अशा प्रकारच्या गटासाठी मा. शासनाने दि.२३/०७/२००७ अन्वये धोरण निश्चित केल्याचे व त्याप्रमाणे विनियम मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ठ करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करणेबाबत मा. शासनाने पत्र क्र. टिपीबी-४३०७/२२२६/सीआर-३३४/२००७/युडी-११, दि.१७/०७/२००८ च्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१. २००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त जागेची उपविभागणी करताना खालील प्रमाणे सक्तीची तरतुद करण्यात यावी.
   अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी / अल्प उत्पन्नधारक गटासाठी ३० ते ५० चौ.मी. आकाराचे भुखंड एकूण भुखंडाच्या १० टक्के
   ब. ५० ते १०० चौ.मी. चे भुखंड एकूण भुखंडाच्या १० टक्के.
२. ४००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त जमिनीच्या लेआउटमध्ये खालील प्रमाणे सक्तीची तरतुद करण्यात यावी.
   अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक / अल्प उत्पन्नधारक गटासाठी प्रत्येकी (३० ते ४० चौ.मी.) आकाराच्या सदनिका आणि मध्यम उत्पन्न गटासाठी (४१ ते ६० चौ.मी.) आकाराच्या सदनिका एकूण जमिनीच्या १० टक्के इतक्या प्रस्तावित करण्यात याव्यात.

शासनाच्या दि. १७/०७/२००८ च्या आदेशाचे पालन करताना वरील प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने समाविष्ट करावयाच्या नियमांची सुचना आदेशाच्या तारखेच्या ९० दिवसांच्या आत प्रसिध्द करुन सुचना व हरकती मागविण्यात याव्यात, असे आदेशात नमुद केलेले आहे. तथापी सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी विषय प्रशासनाने आजच्या महासभेपुढे ठेवल्याने महासभेच्या मंजूरीच्या दिनांका पासून ९० दिवसांच्या आत अशा सुचना प्रसिध्द कराव्यात.

मंजूर विकास नियमावलीमध्ये व मिरा भाईंदर विकास नियंत्रण नियमावली २००६ (प्रारुप फेरबदल) मध्ये वरील प्रमाणे नियम समाविष्ट करण्यात यावेत. व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार कारवाई पूर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्री. जयंत पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/१०/२००८

**प्रकरण क्र. ६६ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका शहरासाठीच्या मंजुर विकास योजनेमधील खुल्या जागेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

**(मा. महापौरांच्या आदेशाने सदर विषय तहकुब करण्यात आला.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २१/१०/२००८

**प्रकरण क्र. ६७ :--** **मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठीच्या मंजूर विकास योजनेमधील बेघरांसाठी घरे साठीच्या नियमावलीबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.**

**ठराव क्र.** :- ५८

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ९ मधील तक्ता क्र. ३ प्रमाणे बेघरांसाठी घरे या आरक्षित जागा विकसीत करण्यासाठीची नियमावली मंजूर झालेली असून या मंजूर नियमामध्ये शासनाने आदेश क्र. टीपीबी/४३०७/२२२६/सिआर-३३४/२००७/युडी-११, दि.१७/०७/२००८ अन्वये मा. शासनाच्या धोरणाप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत आदेशित केलेले आहे.

**मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे –**

| Sr.No. | Use (Allocation / designation or reservation.) | Person / Authority who may develop | Condition subject to which development is permissible |
|---|---|---|---|
| b) | Housing for Dishoused(HD) | Municiple Council or public Semipublic Authority or owner | The Municiple Council or the Public / semi public Authority may develop the land after acquiring it in accordance withlaw.<br>OR<br>The owner may develop the land for housing with normal permissible F.S.I. on such terms as are agreed to between him and the Municipal council provided that in the development a min. density of 325 units per hectare with not less than 50% of tenements having a carpet area of 16.75 sq.mt. (180 sq.ft.) shall be achieved and 10 percent of the total built up area from the tenement of the carpet area of 16.75 sq.mt. (180 sq.ft.) each in building so constructed by him shall be handed over to the Municipal Corporation free of cost for allotment of persons affected by implementation of development plan, who are occupying recognised structures |

प्रस्तावित केल्याप्रमाणेचे फेरबदल -

| Reservation | Person / Authority who may develop | Condition subject to development is permissble |
|---|---|---|
| Public Housing / Housing the Dishoused | Corporation / Public Authority or Owner | The owner may develop the land as such term as are agreed between him and the Commissioner and further subject to following conditions :<br>(1) The minimum tenement density shall be 275 units per ha. With not less than 50% tenements having carpet area of 25 sq.mt. (269 sq.ft.) each.<br>(2) The owner shall hand over 40% of the total permissible built up area in terms of tenements each havin carpet area 25 sq.mts. (269 sq.ft.) to Municipal Corporation / Municipal Council free of charge for allotment of persons affected by project undertaking by Municipal Corporation / Municipal Council. Thereafter the owner will be entitled to have the full permissible F.S.I. of the plot for the residential development without taking into account the area of tenement handed over to Municipal Corporation / Municipal Council. For the additional built up area over the permissible F.S.I., the above norms of density will not apply. |

त्याप्रमाणे सदर बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस तसेच सुचना व हरकती मागविणेस ही सभा प्राथमिक मंजूरी देत आहे.

**सुचक - डॉ. राजेंद्र जैन** **अनुमोदक - श्री.. श्रीप्रकाश सिंह**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

बेघरांसाठी घरे देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या फेरबदलाच्या मसुद्यास मंजुरी देण्यात येत असून सदरचे फेरबदल मिरा भाईंदर विकाय नियंत्रण नियमावली २००६ (प्रारुप फेरबदल) मधील विनियम क्र. ९ मधील तक्ता क्र. ३ मधील अनु. क्र. I (6) मध्ये समाविष्ठ करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/१०/२००८

**प्रकरण क्रमांक** ( ६८ ) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नःनिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखडयाचे (CDP) व शहर विकास आराखडयात नमुद भुयारी गटार योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे (DPR) सादरीकरण करणे.

**ठराव क्र.** ( ५८ )

मिरा-भाईदर महानगरपालिकेने JNNURM अंतर्गत तयार केलेल्या शहर विकास आराखडयास मा. महासभा दि. १७/११/२००६ ठराव क्र. ६५ व भुयारी गटार योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मा. महासभा दि. १८/१२/२००४ ठराव क्र. ५९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. शहर विकास आराखडयात एकूण १९२५.१७ कोटीची कामे प्रस्तावित आहेत. त्यापैकी भुयारी गटार योजनेच्या कामी आवश्यक त्या सर्व मान्यता प्राप्त होउुन निविदा मागविण्यात आलेली आहे. भुयारी गटार योजनेत दर्शविलेल्या एकूण ११ STP पैकी ०४ STP अस्तित्वात आहेत. उर्वरीत ०७ STP साठीच्या प्रस्तावित जागा (सोबतच्या यादीप्रमाणे) या मंजूर विकास योजनेमधील विविध आरक्षणाने बाधित होत आहेत. यास्तव या आरक्षणामध्ये STP चे बांधकाम करणेसाठी जागा राखीव ठेवणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र प्रदेश नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. शहरातील इतर खाजगी STP सुध्दा आयुक्त यांनी हस्तातंर करुन घेउुन त्याचा समावेश भुयारी गटार योजनेत करावा. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता सद्यस्थितीत शहर विकास आराखडयातील समाविष्ट खालील कामाच्या सविस्तर अहवालास व अहवाल शासनाकडे पाठविण्यास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

१) स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्प (एकात्मिक नाला प्रकल्प) - रू. २८९.६६ कोटी

२) घनकचरा प्रकल्प अंतर्गत कामे करणे - रू. ७१.३६ कोटी

शहर विकास आराखडयात नमूद उर्वरीत कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल आर्थिक परिस्थिती नुसार वेळोवेळी पुढील मा. महासभेपुढे मान्यतेकरीता सादर करण्यात यावेत.

सुचक :- भगवती शर्मा

अनुमोदन 21/10/08 श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## भुयारी गटार योजनेच्या STP च्या जागेबाबतचा तपशिल

| अ.क्र. | झोन क्रमांक | ठिकाण | आरक्षणाचे एकुण क्षेत्रफळ (चौ.मी.) | STP साठी आवश्यक असलेले क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | झोन क्र. १ | आरक्षण क्र.७२ Housing for Dishoused<br>नाझरेथ चर्च जवळ<br>मौजे - भाईंदर | ७२६०० | ४३८७ |
| २ | झोन क्र. २ | आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम<br>आरक्षण क्र. ९० बगीचा<br>आरक्षण क्र. ९३ बगीचा | १८००००<br>५०००<br>४८०० | ५०००<br>५०००<br>४८०० |
| ३ | झोन क्र. ३ | आरक्षण क्र. १२२ सी खेळाचे मैदान | ३८००० | ५७०० |
| ४ | झोन क्र. ४ | आरक्षण क्र. ११९ खेळाचे मैदान<br>आरक्षण क्र. १२० बगीचा | १६८००<br>१३८०० | २५२०<br>२०७० |
| ५ | झोन क्र. ५ | आरक्षण क्र. २६९ बगीचा | २२४०० | ३३६० |
| ६ | झोन क्र. ७ | आरक्षण क्र. १७० खेळाचे मैदान<br>आरक्षण क्र. १७८ खेळाचे मैदान | १०३७०<br>९००० | १५५५<br>१३५० |
| ७ | झोन क्र. ८ | सर्व्हे क्र. २३३ मौजे. घोडबंदर | - | ८२९५ |
| ८ | झोन क्र. ९ | आरक्षण क्र. १४० खेळाचे मैदान<br>आरक्षण क्र. १३९ बगीचा | २००००<br>१४१०० | ३०००<br>२११५ |

# मरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/१०/२००८

**दु:खवटा ठराव क्र. ६० :-**

श्री. असिफ पटेल यांचे भाउ तसेच गणेश देवल नगर येथील मुलगा तसेच उत्कृष्ट क्रिकेटपटू श्री. नरेश मुकुंद पाटील, राहणार गोडदेव, ओम ब्रम्हदेव क्रिकेट क्लबचे माजी कर्णधार यांचे अकस्मित निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. प्रफुल्ल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२००८

**अभिनंदन ठराव ६१ :-**

दि. ०२/१०/२००८ रोजी चंद्रयान हे अवकाशात सोडण्यात आले व दि. १४/११/२००८ रोजी चंद्रावर तिरंगा फडकवणारे इंडीयन स्पेस ऑर्गनायझेशनचे जे प्रमुख डॉ. माधवन नायर व त्यांचे सर्व सहकारी शास्त्रज्ञ ह्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहे. तसेच संगिताचार्य पं. भिमसेन जोशी ज्यांनी आपले शास्त्रीय संगित घराघरात पोहचवले त्यांना भारताचा सर्वोत्कृष्ठ पुरस्कार भारतरत्न मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करणारा ठराव मी मांडत आहे. तसेच या देशाच्या माजी पौलादी महिला मा. इंदिराजी गांधी यांची आज जयंती आहे. या सभागृहाच्या वतीने त्यांच्या स्मृतीस आपण सर्वांनी अभिवादन करावे तसेच त्यांचा अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/११/२००८.

**प्रकरण क्र. ६९ :- दि. १९/०६/२००८ व दि. ०१/०७/२००८ (दि. १९/०६/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ६२ :-**

दि. १९/०६/२००८ व दि. ०१/०७/२००८ (दि. १९/०६/२००८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-**          **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

१५१

## मा. महासभा दि. १९/११/२००८

**प्रकरण क्र. ७० :-** नामकरण प्रस्तावांना मान्यता देणे. (मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेली प्रकरणे.)

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, इमारती व वास्तू यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्याबाबत प्रस्ताव व सुचना मा. महासभेपुढे आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नांव |
|---|---|---|
| १ | घोडबंदर रेतीबंदर ते एम. टी. डी. सी. कडे जाणारा रस्ता | नेहरू नगर पिरपेट्टे शॉ दर्गा मार्ग |
| २ | मिरारोड भागातील रस्ता (शांतीनगर) | श्री. जयगुरू जम्मेश्वर मार्ग |
| ३ | पेणकरपाडा सुकाळ तलाव | साईदत्त तलाव |
| ४ | श्री. महाराज अग्रसेन मार्गावरील चौक | स्वातंत्र्यसेनानी दामोदर भाई बंगेरा चौक |
| ५ | संगीता शॉपिग सेंटर समोरील महाराणा प्रताप मार्गावरील चौक | न्यायाधिश के. सदानंद हेगडे चौक |
| ६ | साई कॉम्प्लेक्स, मिरारोड (पूर्व) रस्ता | पी. जी. व्होरा रोड |
| ७ | जनतानगर मुख्य रस्त्यावरील प्रवेशद्वार | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार |
| ८ | जनतानगर साईकृपा कॉम्पलेक्स उदयान | सावित्रीबाई फुले उदयान |
| ९ | आरक्षण क्र. ९६ क्रिडांगण | शहिद भगतसिंग क्रिडांगण |
| १० | भाईंदर (पू) नवघर शाळा इमारत | स्वातंत्र्य सैनिक कै. रामचंद्र पांडूरंग पाटील इमारत |
| ११ | उत्तन नाका चौक | श्री. बाप्टीष्टा चौक |
| १२ | भाईंदर (पू) इंद्रलोक १८.०० मीटर रस्ता | संत शिरोमणी नामदेव महाराज मार्ग |
| १३ | राधास्वामी सत्संग मार्ग, जनाभाउु रकवी मार्ग मार्ग व सुभाषचंद्र बोस मैदान चौक | राज राजेश्वर भगवान परशुराम चौक |
| १४ | मुर्धा बाल उदयान | ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले |
| १५ | मुर्धा मनपा शाळा क्र. २२,२३ | साने गुरूजी भवन |
| १६ | भाईंदर (प) गांधीनगरकडे जाणारा चौक | मान्यवर काशिरामजी चौक |
| १७ | भाईंदर (प) डॉ. आंबेडकर भवन मधील वाचनालय | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन वाचनालय |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन मधील अभ्यासिका | सर डॉ. विश्वेश्वरय्या अभ्यासिका |
| १९ | राई व्यायाम शाळा | छत्रपती शिवाजी महाराज व्यायामशाळा |
| २० | भाईंदर (प) सालासर प्लाझा (भट्ट सोसायटी) ते तपस्या बिल्डींग रस्ता | डॉ. दिगंबर केशव कुलकर्णी मार्ग |
| २१ | भाईंदर (प) भिमनाथ बिल्डींग (सुदामानगर पाण्याची टाकी) ते देवदर्शन बिल्डींग | सौ. मायरा मेंडोन्सा मार्ग |
| २२ | भाईंदर (प) बद्रीनाथ बिल्डींग ते बाबुलनाथ | फुटरमल पुखराज परमार मार्ग |
| २३ | मिरा एम.आय.डी.सी. ते रॉयल कॉलेज रस्ता | केशव हरि पदाजी भोईर मार्ग |
| २४ | मिरा हनुमान मंदिर रंगमंच | हनुमान मंदिर रंगमंच |
| २५ | एम.आय.डी.सी. जलकुंभ | स्वातंत्र्य सैनिक कै. मोतीराम कमळया जावर जलकुंभ |
| २६ | मिरागांव सातकरी तलाव | तुळशी तलाव |
| २७ | काशिगांव प्रवेशद्वार | स्व.सौ. रमाबाई भीमराव आंबेडकर प्रवेशद्वार |
| २८ | खारीगांव मनपा शाळा क्र. ६ मधील हॉल | श्री गांवदेवी हॉल |
| २९ | अमरप्रेम बिल्डींग पासून स्वामी नारायण बिल्डींग पर्यंत | कै. अनंत विठ्ठल पाटील (राजा) मार्ग |

148

| | | |
|---|---|---|
| ३० | हावलू निवास ते तुलसी निवास पर्यंत | जानकाई मंदिर मार्ग |
| ३१ | गांवदेवी मंदिर मार्ग, नवघर स्मशान मार्ग, नवघर गावात जाणारा मार्ग, लोढा कॉम्पलेक्स मार्ग | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| ३२ | भाईंदर (प) व्यंकटेश्वर पार्क उदयान | श्री. पीरबाबा रामदेव उदयान |
| ३३ | नवघर चाळघर परिसर (साईचरण बंगला) ते नवघर उघाडी पर्यंतचा रस्ता | श्री. चाळघर मार्ग |
| ३४ | मिरारोड निलम पार्क, नयानगर चौक | बज्मे रजा चौक |
| ३५ | मिरारोड वाचनालय | राष्ट्रपिता महात्मा गांधी वाचनालय |
| ३६ | मिरारोड हॉस्पीटल इमारत | स्व. इंदिरा गांधी रूग्णालय |
| ३७ | मिरारोड रक्तपेढी | भारतरत्न स्व. राजीव गांधी रक्तपेढी |
| ३८ | शांतीनगर सेक्टर ४ मैदान | पंडीत जवाहरलाल नेहरू क्रिडांगण |
| ३९ | मिरारोड अयप्पा मंदिर ते हॉस्टेल पर्यंत | बाप्पा सिताराम मार्ग |
| ४० | शांतीविहार इमारती बाजुचा रस्ता | अयप्पा मार्ग |
| ४१ | शांतीनगर पोलिस चौकी समोरील चौक | शामळजी अजमेरा चौक |
| ४२ | शांतीपार्क, सेंट झेविअर्स समोरील चौक | श्री. गोवर्धन चौक |
| ४३ | उड्डाणपूल चौक पासून दहीसरकडे जाणारा १८.०० मीटर रस्ता | श्री. आचार्य श्री. महाप्रज्ञ मार्ग |
| ४४ | भाईंदर (प) नियोजित हॉस्पीटल इमारत | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल |
| ४६ | मिरारोड पूनम नगर नर्सरी | राणी लक्ष्मीबाई नर्सरी |
| ४६ | मुर्धा स्मशानभूमी | मुक्तीधाम |
| ४७ | मुर्धा बाल दफनभूमी | अमरधाम |
| ४८ | भाईदर (प) स्व. तेरेसा जॉन मेन्डोसा चौक समोर भैरव सृष्टी व जानकी हेरीटेज इमारती मधून पुढे जाणारा रस्ता | हाजी गुलाब लाडजी शेख मार्ग |
| ४९ | भाईंदर (प) विनायक नगर समाजमंदिर | श्री. भालचंद्र साधुराम अग्रवाल भवन |
| ५० | शांतीनगर ए - ८ व ९ ते स्मशानरोड | वैकुंठधाम मार्ग |
| ५१ | शांतीनगर सेक्टर ४ व ५ मधील रस्ता ते सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील टॉवर रस्ता | लायन्स क्लब मिरारोड मार्ग |
| ५२ | सृष्टी सेक्टर - ३ समोरील चौक | नवयुवान चौक |
| ५३ | सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील चौक | सृष्टी चौक |
| ५४ | शांतीनगर से. ८ सी २० समोरील मैदान | गणेश मैदान |
| ५५ | शांतीनगर से. ८ सी ३९ समोरील उदयान | चाचा नेहरू बालोदयान |
| ५६ | शांतीनगर से. ८ सी समोरील उदयान | मदर टेरेसा नाना नानी पार्क |
| ५७ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते विनय नगर पर्यंतचा रस्ता | विनय नगर मार्ग |
| ५८ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील संघवी नगर चौक | भगवान गौतम बौध्द चौक |
| ५९ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक |
| ६० | भाईंदर (प) शंभू सदन ते क्लींट टॉवर पर्यंत रस्ता | जिनदत कुसल सुरीजी मार्ग |
| ६१ | नवघर गांव उदयान | स्वातंत्र्य सैनिक कै. शंकर विठ्ठल पाटील उदयान |
| ६२ | पेणकरपाडा सुकाळ तलाव मार्ग | श्री. दत्त मंदिर मार्ग |
| ६३ | पेणकरपाडा मनपा शाळा समोरील सभागृह | स्व.सौ. गुलाब रामजी घरत सभागृह |
| ६४ | भाईंदर (प) उपकर कार्यालय | डॉ.श्री. बळीराम हेडगेवार भवन |
| ६५ | नवघर तलाव येथून संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज संतसंघ भवन मार्ग | संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी मार्ग |
| ६६ | शांती पार्क सेंट जोसेफ शाळे समोरील उदयान | बालगोपाळ उदयान |
| ६७ | शांतीपार्क एचडीएफसी बँक ते आरएनए कोर्ट यार्ड, | साईबाबा मार्ग |

| | | |
|---|---|---|
| | सेक्टर ९,१० रस्ता | |
| ६८ | मिरारोड शितल नगर चौक | सेंट जोसेफ चौक 149 |
| ६९ | मिरारोड बरखा हॉटेल ते सेंट थॉमर्स चर्च रस्ता | सेंट थॉमस मार्ग |
| ७० | मिरारोड सेंटर प्लाझा हॉटेल ते क्लब ९ पर्यत रस्ता | ब्रम्हकुमारी मार्ग |
| ७१ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन समोरील चौक | आचार्य श्री तुलसी चौक |
| ७२ | भाईंदर (प) सेस कार्यालयासमोरील चौक | आचार्य श्री. महाप्रज्ञ चौक |

यापूर्वी ज्या रस्त्यांची / उदयाने, चौक व इतर वास्तूची नामकरणे झाली आहेत अशी नामकरणे वगळून मा. सदस्यांनी सुचविलेल्या वरील नामकरण प्रस्तावांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण अकरा (२) (१) (अ) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**दि. २०/११/२००९ रोजीच्या मा. महासभेत इतिवृत्तांत मंजूरी करिता ठेवले असता खालील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली.**

१) मुळ ठरावामध्ये अ.क्र. ५९ चा उल्लेख नाही. कृपया ती नोंद वगळावी.

२) अ.क्र. ७२ वर महर्षी दधिच चौक अशी नोंद करावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

5/14/1/6

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/११/२००८

150

**प्रकरण क्र. ❁ :-७९** परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरात वाढ करणेबाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. १८/१०/२००८ अन्वये शिफारस केलेले प्रकरण क्र. १७)

**ठराव क्र.** :- ६४

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम दि. १५/०९/२००५ रोजी सुरु झाला असून सदर उपक्रमाच्या बसेसकरीता प्रथम भाडेसारणी मा. महासभा दि. ०२/०८/२००५ रोजी ठराव क्र. २१ ने मंजुरी दिली होती. यानंतर प्रवासी तिकीटे दरामध्ये वाढ झालेली नाही.

परिवहन उपक्रमामध्ये सध्या ५० बसेस १७ धाव मार्गावर धावत असून परिवहन उपक्रमास होणारा तोटा काही प्रमाणात कमी करणेकरीता मा. परिवहन समिती सभा दि. १८/१०/२००८ प्रकरण क्र.१७, ठराव क्र. १० ने प्रस्तावित भाडे वाढीस मंजुरी दिलेली आहे. भविष्यात व प्रत्येक आर्थिक वर्षात महानगरपालिकेकडून परिवहन सेवेमध्ये प्रमाणात अनुदान मिळणे शक्य होणार नाही. सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये महापालिकेकडून अनुदानाद्वारे मिळणारी रक्कम रु. ७५ लाख आहे. या मिळणाऱ्या अनुदानातुन परिवहन विभागातील विविध खर्च मार्च २००९ पर्यंत भागविणे शक्य होणार नाही. ही बाब विचारात घेवून परिवहन उपक्रमाचा खर्च लक्षात घेता परिवहन उपक्रमाने प्रवासी तिकीटाच्या दरामध्ये खालीलप्रमाणे वाढ सुचवलेली आहे. या प्रवासी तिकीट भाव वाढीचा प्रचलीत भाडे तक्ता (अ) व प्रस्तावित भाडे तक्ता (ब) देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंतर कि.मी. | प्रचलीत भाडे (अ) | प्रस्तावित भाडे (ब) |
|---|---|---|---|
| १ | ० - २ | -- | -- |
| २ | ० - ३ | ४.०० | ४.०० |
| ३ | ३.१ - ५.० | ४.५० | ५.०० |
| ४ | ५.१ - ७.० | ५.०० | ६.०० |
| ५ | ७.१ - ९.० | ६.०० | ७.०० |
| ६ | ९.१ - ११.० | ७.०० | ८.०० |
| ७ | ११.१ - १३.० | ८.०० | ९.०० |
| ८ | १३.१ - १५.० | ९.०० | १०.०० |
| ९ | १५.१ - २०.० | ११.०० | १२.०० |
| १० | २०.१ - २५.० | १३.०० | १४.०० |
| ११ | २५.१ - ३०.० | १४.०० | १५.०० |
| १२ | ३०.१ - ३५.० | १५.०० | १६.०० |

प्रवासी भाडे वाढीमध्ये पहिल्या ३ कि.मी. करीता कोणत्याही प्रकारची भाडे वाढ सुचवलेली नाही. ३.१ कि.मी. ते ५ कि.मी. च्या टप्प्यामध्ये ५० पैशाची वाढ सुचवण्यात आलेली आहे व ५ कि.मी. पासून ते ३५ कि.मी. पर्यंतच्या एकूण ९ टप्प्यामध्ये प्रत्येक टप्प्यात रु. १/- याप्रमाणे वाढ सुचवण्यात आलेली आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करुन परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरवाढीस आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत म. पाटील**      **अनुमोदक :- श्री. प्रफुल्ल का. पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद व अनुमोदक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.** 151

मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवक, तसेच नगरसेविका यांना मोफत प्रवास "बेस्ट" (BEST) मध्ये आहे. त्याच धर्तीवर मिरा भाईंदर परिवहन सेवेतील बसेसमध्ये महापालिकेतील सर्व नगरसेवकांना त्यांचा कार्यकाल असेपर्यंत मोफत पास देण्यात यावा.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील व अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर परिवहन सेवेतर्फे चालविल्या जाणाऱ्या बसेसमध्ये जी.पी.आर.एस. मशिन लावावी जेणेकरुन बस किती किलोमीटर चालली हे स्पष्ट होईल. तसेच या परिवहन सेवेला महानगरपालिकेतर्फे कधीही अनुदान देण्यात येउ नये. अशी मी सुचना मांडत आहे.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२००८

**प्रकरण क्र. ७२ :-** अतिक्रमणाबाबत आढावा घेणे.

(सभागृहात अतिक्रमणाबाबत आढावा घेण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा

## दि. १९/११/२००८

**विषय : आरोग्य विभागाचे उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., यांना निलंबीत करण्याबाबत.**

**ठराव :** ६५

महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विषयक तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. कचरा डंपीगचा प्रश्न सातत्याने निर्माण होत आहे. साफसफाई, नालेसफाई बाबत तक्रार तसेच सध्या डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.

आरोग्य विभागातर्फे औषध फवारणी, गटार सफाई नियमीतपणे होत नसल्यामुळे डासांचे प्रमाणे वाढलेले असून ह्याबाबत महासभेत नेहमीच चर्चा होत असते. अनेक नगरसेवकांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्यावर आरोग्य विभागामार्फत समाधानकारक कारवाई होत नसल्याचे दिसून आले आहे.

आरोग्य विभागाचे प्रमुख उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., हे आरोग्य विभागाच्या अकार्यक्षम कामाकाजास जबाबदार आहेत. महासभेमध्ये आरोग्य विषयक प्रश्नांवर रूलींग देताना मा. महापौर सो., ह्यांनी औषध खरेदी विषयावर सविस्तर चौकशी करून मा. आयुक्त सो., ह्यांना पुढील महासभेत अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले होते. तथापी, मा. आयुक्त सो., ह्यांनी देखील त्यावर आपला अहवाल दिलेला नाही. तसेच मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल त्यांच्या विरोधात आहे.

कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यास औषध खरेदी बाबत आरोग्य विभागाचे उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., हे जबाबदार असून आरोग्याच्या चांगल्या परिणामकारक कामकाजास ते अकार्यक्षम ठरलेले आहेत. सबब त्यांना मुंबई प्रांतीक महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार निलंबीत करण्यात यावे ह्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक –** [signature] **अनुमोदक –** [signature]

**ठराव सर्वानुमते मंजूर**

[signature]
19/11/08

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

154

**प्रकरण क्र. : ७२**

**अतिक्रमणाबाबत आढावा घेणे.**

**ठराव क्र. :** ५६

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत होत असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाबाबत आजच्या महासभेत आढावा घेतला असता महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

गेल्या वर्षभरापासून अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार चर्चा महासभेत होत आहे. महापालिका क्षेत्रांमध्ये वाढत चाललेल्या अनधिकृत बांधकामावर नियंत्रण कण्यासाठी शासानाकडून जी.आर काढण्यात आला व त्याचे पालन. सर्व महापालिकांनी करून त्यानुसार अनधिकृत बांधकामाबाबत नियमितपणे अहवाल अतिक्रमण विभागाकडून घेण्यात यावेत असे निर्देश देण्यात आले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागप्रमुख पदावर कार्यरत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे ह्यांनी अतिक्रमण विभागाचा कार्यभार स्विकारल्यापासून अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच अतिक्रमणाचा अहवाल देखील दिलेला नाही.

महापालिका क्षेत्रात सतत वाढत असलेल्या अतिक्रमणावरून असे दिसून येते की, उपायुक्त, श्री. दिवटे हे त्या पदावर काम करण्यास सक्षम नाहीत. दि. ९/०१/२००८ रोजीच्या महासभेत त्यांना कार्यमुक्त करावे असा ठराव पारित करण्यात आला होता. त्यावर प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तसेच दि. १९/०६/२००८ रोजीच्या महासभेत अतिक्रमण बाबत लक्षवेधी सुचना मांडण्यात आली होती. त्यावर महासभेत मोठ्या प्रमाणात चर्चा झाली होती. मागील वर्षभरापासून अतिक्रमण विभागाच्या असमाधानकारक कामकाजाबाबत वारंवार महासभेत चर्चा होत आहे. ह्या असमाधानकारक कामकाजास मा. आयुक्त देखील जबाबदार आहेत.

अतिक्रमण विभागाच्या प्रमुख पदावर काम करीत असलेले उपायुक्त, श्री. दिवटे हे महापालिकेत उपायुक्त पदावर काम करण्यास सक्षम नसल्याने त्यांना तातडीने कार्यमुक्त करण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक –** B. A. Sheikh

**अनुमोदक –** Dr. Rajendra Jain

**ठराव सर्वानुमते मंजुर**

19/11/08

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

158

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२००८

**प्रकरण क्र. ७३ :-** उपकराची वसुलीबाबत आढावा घेणे.

(सभागृहात अतिक्रमणाबाबत आढावा घेण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२००८

**प्रकरण क्र. ७४ :-** भाईंदर (प.) डॉ. आंबेडकर नगर व भोलानगर येथे ४५.०० मीटर रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्या कुटूंबाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**(मा. महापौर सो. यांच्या आदेशाने सदरचा विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा असे ठरले.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

१५७

## मा. महासभा दि.१९/११/ २००८

**प्रकरण क्र. ७५ :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेकरीता महानगरपालिका संबंधीत कामकाजासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणेबाबत.**

**ठराव क्र.** ६८ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी झाली आहे. सन२००१ च्या जनगणनेप्रमाणे शहराची लोकसंख्या ५,२०,३८८ इतकी होती. महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी इतके आहे. सध्या शहराची लोकसंख्या साधारणतः ८.५० लाखापेक्षा जास्त आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका राज्य शासनाच्या वर्गीकरणानुसार हि 'ड' वर्ग दर्जाची महानगरपालिका आहे. मिरा-भाईंदर हे मुंबई लगतचे शहर असल्याने शहरातील लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत आहे. महानगरपालिका अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण विरोधात एम.आर.टी.पी. व महानगरपालिका कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करणे त्या व्यतीरिक्त अनधिकृत नळजोडण्या, अनधिकृत जाहिरात, फेरीवाले यांच्या विरुध्द वेळोवेळी गुन्हे दाखल करावे लागतात. काही प्रकरणात कारवाईच्या वेळी होणाऱ्या विरोधामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळणे फारच जिकरीचे होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊन शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतात. या बाबी विचारात घेता वेळीच तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधीत कामकाजाकरीता स्वतंत्र पोलीस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन होणे गरजेचे आहे.

महानगरपालिकेकरीता निर्माण होणाऱ्या स्वतंत्र पोलीस स्टेशनमध्ये खालील प्रमाणे पोलीस कर्मचारी राहणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचा तपशील | पदाची संख्या |
|---|---|---|
| १. | सहायक पोलीस निरीक्षक | १ |
| २. | पोलीस उपनिरीक्षक | १ |
| ३. | सहायक पोलीस उपनिरीक्षक | १ |
| ४. | सशस्त्र पोलीस हवालदार | ४ |
| ५. | सशस्त्र पोलीस शिपाई | ८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | १ |
| ७. | वाहनचालक | १ |
| | **एकुण** | **१७** |

पोलीस स्टेशन करीता आवश्यक जागा, वाहने, इमारत, यंत्रणा महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन देण्यांत येतील. यावर होणाऱ्या एकुण खर्चापोटी शासनाकडून प्रतिपूर्ती अनुदानाच्या स्वरुपात मदत व्हावी. पोलिस अधिकाऱ्याचे वेतन, भत्ते, कार्यालयीन खर्च व इतर आवर्तीय व अनावर्तीय खर्चाचा भार

शासनाच्या गृहविभागा मार्फत करण्यांत यावा किंवा महानगरपालिकेने खर्च केल्यास त्याची भरपाई प्रत्येक सहा महिन्यानंतर प्रतिपूर्ती अनुदानाच्या रुपात शासनाने करावी. 158

सदर स्वतंत्र पोलीस स्टेशनामधील पोलीस अधिकारी कर्मचारी यांची पदनिर्मीती नेमणुक व वेळोवेळी बदली शासनाकडून होणे अपेक्षीत आहे. पिंपरी चिंचवड व औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या महानगरपालिकेशी संबंधीत खटले हाताळण्यासाठी ठराव करुन स्वतंत्र न्यायालये निर्माण केली आहेत. त्याच धर्तीवर मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, अनधिकृत नळजोडण्या आणि अनधिकृत फेरीवाले इत्यादी महानगरपालिकेच्या कामकाजाच्या संबंधीत खटले हाताळण्यासाठी स्वतंत्र न्यायालय निर्माण करण्यांत यावे. न्यायालयाचे अधिकार क्षेत्र महानगरपालिका क्षेत्रापुरते मर्यादीत असेल. या न्यायालयात महानगरपालिकेच्या संबंधीत खटले चालविले जावेत, न्यायालयात कर्मचारीवृंदांची संख्या साधारणतः कमी असावी. न्यायालयाच्या आवश्यक जागेची, इमारतीची सुविधा महानगरपालिका करील यासाठी येणाऱ्या खर्चाचे भरपाई पोटी शासनांनी महानगरपालिकेला अनुदान द्यावे. स्वतंत्र न्यायालयाचा आस्थापना खर्च, इतर आवर्ती व अनावर्ती खर्चाचा आवश्यक भार महानगरपालिका उचलण्यास तयार आहे. परंतु याबाबत शासनानी प्रत्येक सहा महिन्यानंतर होणाऱ्या खर्चाचे प्रतिपुर्ती अनुदान महानगरपालिकेस मंजुर करावे.

तरी पिंपरी चिंचवड व औरंगाबाद महानगरपालिका धर्तीवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेकरीता महानगरपालिका संबंधीत कामकाजासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन व स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :-** चक्रवर्ती शर्मा

**अनुमोदन :-** मिठन पाटिल

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

१५९

## मा. महासभा दि. १९/११/२००८

**प्रकरण क्र. ७६ :- सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने वेतन सुधारणापुर्व अग्रीम अदा करण्याबाबत...**

**ठराव क्र. ६९ :-**

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत केंद्र शासनाने सुधारणा केली आहे. त्या वेतनश्रेणीचे परिक्षण करुन राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यासाठी शिफारशी करण्याकरीता श्री. पी. एम. ए. हकीम, केंद्र शासनाचे माजी सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची स्थापना शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेपुर-१२०८/प्र.क्र.७२/सेवा-९ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. २३ सप्टेंबर २००८ अन्वये करण्यात आली आहे.

जे कर्मचारी दिनांक १ एप्रिल २००८ रोजी नियमीत वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत व दिनांक ०१ ऑक्टोंबर, २००८ रोजी राज्य शासनाच्या नियमीत सेवेत कार्यरत आहेत, अशा राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या दिनांक १ ऑक्टोंबर २००८ रोजी अनुज्ञेय असलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील मुळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अग्रीम म्हणुन अदा करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या अग्रीमाचे प्रदान माहे ऑक्टोंबर २००८ च्या मासिक वेतनाबरोबर काढण्यात यावे असेही शासनाने नमुद केले आहे.

महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना या शासन निर्णयाप्रमाणे अग्रीम अदा करावयाचा झाल्यास एकुण अंदाजे १४७.०० लाख एवढी रक्कम लागणार असुन सदर खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीतुन लेखाशिर्ष स्थायी आस्थापना (वेतन, भत्ते) अंतर्गत करता येईल. सदर लेखाशिर्षामध्ये २३७०.१९ लाख एवढी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे.

तरी वरील प्रमाणे शासन निर्णयानुसार मुळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम महापालिका अधिकारी / कर्मचारी तसेच महापालिका शिक्षण मंडळ, शिक्षक कर्मचारी यांना अग्रीम म्हणुन माहे नोव्हेंबर २००८ च्या वेतनासोबत अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :-** (स्वाक्षरी) प्रमोद म. पाटील

**अनुमोदन :-** (स्वाक्षरी)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला,**

**महापौर**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २९/११/२००८

**प्रकरण क्र. ७८ :-** मंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करुन ठरावद्वारे सदस्यांची नियुक्ती करणे. (१) मा. क्रिडा व समाजकल्याण समिती (२) मा. पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती (३) मा. आरोग्य परिरक्षण समिती (४) मा. गलीच्छ वस्ती निर्मुलन समिती (५) मा. पाणी पुरवठा समिती (६) मा. विधी समिती

**ठराव क्र.७२:-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करण्याचे अधिकार महासभेला दिले आहेत. तसेच विशेष समित्यांची रचना करणे बाबत ही अधिकार दिले आहेत. प्रकरण क्र. ७८ नुसार (१) मा. क्रिडा व समाजकल्याण समिती (२) मा. पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती (३) मा. आरोग्य परिरक्षण समिती (४) मा. गलीच्छ वस्ती निर्मुलन समिती (५) मा. पाणी पुरवठा समिती (६) मा. विधी समिती ह्या सहा समित्या गठीत करावयाच्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये वरील प्रमाणे विशेष समित्या गठित करण्यास व प्रत्येक समितीवर नगरसेवकांमधून एकूण ९ सदस्यांची नेमणुक करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

विशेष समित्यांवर संयुक्त लोकशाही आघाडी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, शिवसेना ह्या पक्षांच्या तौलानिक संख्याबळानुसार त्यांच्या गटनेत्यांनी दिलेल्या नावासहीत उपरोक्त सहा विशेष समित्यांचे गठन करण्याचा ठराव मी मांडत आहे.

| अ.क्र. | समितीचे नाव | सदस्याचे नांव |
|---|---|---|
| १ | मा. क्रिडा व समाजकल्याण समिती | १) श्री. राजु भोईर, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>२) श्रीम. ग्रिटा फॅरो, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>३) श्री. टेरी पॉल परेरा, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>४) सौ. पांडे स्नेहा शैलेश, भारतीय जनता पार्टी<br>५) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील, शिवसेना |
| २ | मा. पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती | १) श्रीम. दिव्या अशोक तिवारी, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>२) श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>३) श्रीम. वंदना मंगेश पाटील, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>४) श्री. रामनारायण दुबे, भारतीय जनता पार्टी<br>५) श्री. अनंत रामचंद्र पाटील, शिवसेना |
| ३ | मा. आरोग्य परिरक्षण समिती | १) श्री. डॉ. राजेंद्र जैन, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>२) श्री. मिलन पाटील, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>३) श्री. मोहन जाधव, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>४) श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह, भारतीय जनता पार्टी<br>५) श्री. प्रशांत पालांडे, शिवसेना |
| ४ | मा. गलीच्छ वस्ती निर्मुलन समिती | १) श्रीम. दिव्या अशोक तिवारी, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>२) श्रीम. हेमा रविंद्र माळी, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>३) श्रीम. नर्मदा यशवंत पाटील, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी<br>४) श्रीम. मिरादेवी यादव, भारतीय जनता पार्टी<br>५) श्रीम. मंदाकिनी आत्माराम गावंड, शिवसेना |

| | | |
|---|---|---|
| ५ | मा. पाणी पुरवठा समिती | १) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद राष्ट्रवादी काँगेस पाटी<br>२) श्री. मिलन पाटील, राष्ट्रवादी काँगेस पाटी<br>३) श्री. राजेश हरिश्चंद्र म्हात्रे, राष्ट्रवादी काँगेस पाटी<br>४) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे, भारतीय जनता पार्टी<br>५) श्री. मोहन म्हात्रे, शिवसेना |
| ६ | मा. विधी समिती | १) श्रीम. वंदना रामदास चक्रे, राष्ट्रवादी काँगेस पाटी<br>२) श्रीम. कॅटलीन अन्थोनी परेरा, राष्ट्रवादी काँगेस पाटी<br>३) श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो, राष्ट्रवादी काँगेस पाटी<br>४) श्री. ओमप्रकाश अग्रवाल, भारतीय जनता पार्टी<br>५) श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे, शिवसेना |

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | नलावडे दिनेश दगडू | |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | सुनिता कैलास पाटील | |
| ४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४ | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | |
| ५ | पाटील मिलन गोविंदराव | ५ | कुरेशी याकुब ईस्माईल | |
| ६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ६ | भोईर शशिकांत जगन्नाथ | |
| ७ | शेख आसिफ गुलाब | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ८ | गोविंद हेलन जॉर्जी | ८ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | |
| ९ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | ९ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| १० | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | १० | जंगम लक्ष्मण गणपत | |
| ११ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | ११ | सपार उमा विश्वनाथ | निरंक |
| १२ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १३ | शर्मा भगवती तुगनचंद | १३ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | |
| १४ | पाटील वंदना मंगेश | १४ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | |
| १५ | चक्रे वंदना रामदास | १५ | श्रीमती.सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| १६ | माळी हेमा रविंद्र | १६ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| १७ | ज्योत्स्ना हसनाळे | १७ | शफीक अहमद सादत खान | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | भाटकर प्रेरणा प्रमोद | |
| १९ | परेरा टेरी पॉल | १९ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २० | मेहता नरेंद्र लालचंद | २० | वैती विजया हेमचंद्र | |
| २१ | वर्षा गिरधर भानुशाली | २१ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | भोईर राजू यशवंत | २२ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २३ | जाधव मोहन महादेव | २३ | श्री.मोदी चद्रकांत भिकालाल | |
| २४ | सिंह मदन उदितनारायण | २४ | भट दिप्ती शेखर | |
| २५ | म्हात्रे कल्पना महेश | २५ | वैती चंद्रकांत सिताराम | |
| २६ | पाटील शरद केशव | २६ | अनिल दिवाकर सावंत | |
| २७ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २७ | शेख सलिम दाउद | |
| २८ | बाविघर सिसिलीया विजय | २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| ३० | पांडे स्नेहा शैलेश | ३० | व्यास सुधा वासुदेव | |
| ३१ | दुबे रामनारायण सदानंद | ३१ | मिलन वसंत म्हात्रे | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | ३२ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३३ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३४ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३५ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३६ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३७ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

164

दिनांक : 29-11-08

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ **(2)** नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे **25** इतके संख्याबळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीच्या 9** सदस्यांपैकी **3** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| **1** | सौ दिव्या अशोक तिवारी |
| **2** | सौ ज्योत्सना हसनाळे |
| **3** | सौ वंदना मंगेश पाटील |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

दिनांक : 29-11-08

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- पाणी पुरवठा समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या 2007 (सुधारीत) नियमांतील प्रकरण 3 नियम 6 चे 31 अ (2) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेले आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे **25** इतके संख्याबळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **पाणी पुरवठा समितीच्या 9** सदस्यांपैकी **3** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| 1 | सौ हेलन जार्जी गोविंद |
| 2 | श्री मिलन गोविंद पाटील |
| 3 | श्री राजेश हरीश्चंद्र म्हात्रे |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **पाणी पुरवठा समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

दिनांक : 29-11-08

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- कीडा व समाजकल्याण समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ **(2)** नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे **25** इतके संख्याबळाच्या प्रमाणात आमच्या गटास. **कीडा व समाजकल्याण समितीच्या 9** सदस्यांपैकी **3** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| 1 | श्री राजू भोईर |
| 2 | श्रीमति ग्रिटा फॅरो |
| 3 | श्री टेरी पॉल परेरा |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **कीडा व समाजकल्याण समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

167

दिनांक : 29-11-08

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- गलिच्छ बस्ती निर्मुलन समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या 2007 (सुधारीत) नियमांतील प्रकरण 3 नियम 6 चे 31 अ (2) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे 25 इतके संख्यावळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **गलिच्छ बस्ती निर्मुलन समितीच्या** 9 सदस्यांपैकी 3 सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| 1 | सौ दिव्या अशोक तिवारी |
| 2 | सौ हेमा रविंद्र माळी |
| 3 | सौ नर्मदा वैती |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **गलिच्छ बस्ती निर्मुलन समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

168

दिनांक : 29-11-08

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- विधी समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ (**2**) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे **25** इतके संख्यावळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **विधी समितीच्या 9** सदस्यांपैकी **3** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| **1** | सौ वंदना रामदास चके |
| **2** | सौ कॅटलीन ॲन्थोनि परेरा |
| **3** | श्री वर्नट अल्वट डिमेलो |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **विधी समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

दिनांक : **29-11-08**

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- आरोग्य परिरक्षण समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ **(2)** नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे **25** इतके संख्यावळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **आरोग्य परिरक्षण समितीच्या 9** सदस्यांपैकी **3** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| **1** | श्री राजेंद्र जैन |
| **2** | श्री मिलन गोविंद पाटील |
| **3** | ~~[illegible]~~ श्री मोहन जाधव |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **आरोग्य परिरक्षण समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

# अनंत रामचंद्र पाटील

**नगरसेवक**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**गटनेता - शिवसेना**

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

१७८

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,

छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१

मु. राई, पो. भाईंदर, ता. जि. ठाणे - ४०१ १०१ दूरध्वनी : 2819 3600 मोबाईल : 9892219728.


३१

जावक क्र. ________ दिनांक : 29/11/08.

मा० महासभा रविवार दि० २९/११/०८.

— प्रकरण क्र० - ७८ —

विषय- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम 30 ~~(१)~~ अन्वये विशेष समित्या स्थापन करुन सदस्यांची नियुक्ती करणे बाबत —

मिरा- भाईंदर म.न.पा. क्षेत्रा मध्ये शिवसेनेचे पाच नगरसेवक निवडून आले असून 'शिवसेना' पक्षाच्या वतीने निम्न लिखित समित्यांवरील सदस्यांची नावे -

| अ. क्र० | समिती | सदस्य |
|---|---|---|
| १) | मा० क्रिडा व समाजकल्याण समिती | श्री प्रविण पाटील |
| २) | मा० पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती | श्री अनंत पाटील |
| ३) | मा. आरोग्य परिरक्षण समिती | श्री प्रशांत पालांडे |
| ४) | मा० गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती | सौ मंदाकीनी गावंड |
| ५) | मा० पाणीपुरवठा समिती | श्री मोहन म्हात्रे. |
| 6) | मा० विधी समिती. | ~~सौ मंदाकीनी गावंड~~ श्री प्रशांत पालांडे. |

आपला विश्वासू.

अ.रा. पाटील

अनंत पाटील.

शिवसेना गटनेता.

171

दि. २९/११/०८

प्रकरण क्रमांक ७८

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९-चे कलम ३०(१) अन्वये स्थापन करुन ठरावाद्वारे खालील सदस्यांची नावे घेणे.

१) मा. क्रिडा व समाजकल्याण समिती - सौ. स्नेहा पांडे

२) मा. पूर्व प्राथमीक व माध्यमिक शिक्षण समिती - श्री रामनारायण दूबे.

३) मा. आरोग्य परिरक्षण समिती श्री प्रकाश सिंह (मुन्ना सिंह)

४) मा. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती सौ. मिरादेवी यादव

५) मा. पाणीपुरवठा समिती सौ. कल्पना म्हात्रे.

६) मा. विधी समिती श्री ओमप्रकाश अग्रवाल

~~७) महिला व बालकल्याण समिती~~ ~~सौ. [illegible]~~

आपला

Omprakash G Agrawal
(ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल)
(गटनेता भाजपा)

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. २९/११/२००८

**प्रकरण क्र. ७९ :-** महाराष्ट्र शासनाकडील दि. २२/०८/२००८ रोजीच्या पत्रान्वये महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र.८३ :-**

नगरविकास विभागाचे पत्र क्र. मिभामनपा/११०७/१६३७/प्र.क्र.३६३/०७/नवि-२८ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ दि. २२/८/२००८ च्या पत्रान्वये, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१), १ (अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करण्याची तरतुद आहे. महिला व बालकल्याण समिती ही वैधानिक समिती असून ती तातडीने गठीत करणे आवश्यक आहे. महिला व बालकल्याण समितीची संख्या ९ गृहीत धरुन समितीची रचना करणे योग्य आहे. त्यानुसार ही महासभा कलम ३१ अ (२) नुसार राजकिय पक्षांच्या तौलनिक संख्याबळानुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे ४ सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ३, भारतीय जनता पक्षाचे १, शिवसेना १ असे एकूण ९ सदस्यांची समिती गठीत करण्यात येत आहे.

संयुक्त लोकशाही आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्षाचे, शिवसेनेच्या गटनेत्यांनी आपल्या सदस्यांची नांवे त्वरीत द्यावीत. गटनेत्यांनी दिलेल्या नांवासहीत समिती गठीत करण्याचा ठराव मी मांडत आहे.

| अ.क. | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २ | श्रीम. वर्षा भानुशाली, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३ | श्रीम. कॅटलीन ॲन्थोनी परेरा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४ | श्रीम. सिसिलीया बाविघर, भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. मंदाकिनी आत्माराम गावंड, शिवसेना |

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | नलावडे दिनेश दगडू | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | वेलोस्कर राजेश शंकर | |
| ४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४ | सुनिता कैलास पाटील | |
| ५ | पाटील मिलन गोविंदराव | ५ | कुरेशी याकुब ईस्माईल | |
| ६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ६ | भोईर शशिकांत जगन्नाथ | |
| ७ | शेख आसिफ गुलाब | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ८ | गोविंद हेलन जॉर्जी | ८ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | |
| ९ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | ९ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | १० | जंगम लक्ष्मण गणपत | |
| ११ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | ११ | सपार उमा विश्वनाथ | |
| १२ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १३ | शर्मा भगवती तुगनचंद | १३ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | |
| १४ | पाटील वंदना मंगेश | १४ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | |
| १५ | चक्रे वंदना रामदास | १५ | श्रीमती.सय्यद नुरजहॉं नझर हुसैन | |
| १६ | माळी हेमा रविंद्र | १६ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| १७ | ज्योत्स्ना हसनाळे | १७ | शफीक अहमद सादत खान | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | भाटकर प्रेरणा प्रमोद | |
| १९ | परेरा टेरी पॉल | १९ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २० | मेहता नरेंद्र लालचंद | २० | वैती विजया हेमचंद्र | |
| २१ | वर्षा गिरधर भानुशाली | २१ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | |
| २२ | भोईर राजू यशवंत | २२ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २३ | जाधव मोहन महादेव | २३ | श्री.मोदी चद्रकांत भिकालाल | |
| २४ | सिंह मदन उदितनारायण | २४ | भट दिप्ती शेखर | |
| २५ | म्हात्रे कल्पना महेश | २५ | वैती चंद्रकांत सिताराम | |
| २६ | पाटील शरद केशव | २६ | अनिल दिवाकर सावंत | |
| २७ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २७ | शेख सलिम दाउद | |
| २८ | बाविघर सिसिलीया विजय | २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| ३० | पांडे स्नेहा शैलेश | ३० | व्यास सुधा वासुदेव | |
| ३१ | दुबे रामनारायण सदानंद | ३१ | मिलन वसंत म्हात्रे | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | ३२ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३३ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३४ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३५ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३६ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३७ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

174

दिनांक : 29-11-08

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- महिला बाल-कल्याण समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **अनंत पाटील, शिवसेना** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ (**2**) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **शिवसेना** पक्षाचे **5** इतके संख्यावळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **महिला बाल-कल्याण समितीच्या 9** सदस्यांपैकी **1** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| 1 | सौ मंदाकीनी गायकवाड. |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **महिला बाल-कल्याण समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

29/11/08

अनंत पाटील
गटनेता

दिनांक : **29-11-08**

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- महिला बाल-कल्याण समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **ओमप्रकाश गाडोदीया, भाजपा** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ **(2)** नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **भाजपा** पक्षाचे **9** इतके संख्यावळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **महिला बाल-कल्याण समितीच्या 9** सदस्यांपैकी **1** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| 1 | सौ छाबीधर सिसिलिया. |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **महिला बाल-कल्याण समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

( ओमप्रकाश ~~गाडोदीया~~ अग्रवाल जी )
गटनेता भाजपा

दिनांक : **29-11-08**

प्रति
मा. महापौर महोदय
मिरा भाईन्दर महानगरपालिका

**विषय :- महिला बालकल्याण समिती सदस्यांकरिता संख्याबळानुसार सुचविलेली नांवे.**

महोदय,

मी **भगवती शर्मा , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी** या पक्षाचा गटनेता असून महाराष्ट्र शासनाच्या **2007** (सुधारीत) नियमांतील प्रकरण **3** नियम **6** चे **31** अ (**2**) नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षाचे व गटाचे सदस्यांनी एकत्र येवून अघाडीची नोंदणी केलेली आहे. त्यानुसार **राकांपा अघाडी** पक्षाचे **25** इतके संख्याबळाच्या प्रमाणात आमच्या गटास, **महिला बालकल्याण समितीच्या 9** सदस्यांपैकी **3** सदस्य हे नामनिर्देशित होत आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**नामनिर्देशित सदस्यांची नांवे**

| अ क | नांव |
|---|---|
| **1** | सौ अनिता जयवंत पाटील |
| **2** | सौ वर्षा भानुशाली |
| **3** | सौ कॅटलीन ॲन्थोनि परेरा |

मी गटनेता म्हणून वरील सदस्यांची नांवे सुचवित आहे. त्यांचे आपण नामनिर्देशन करून **महिला बालकल्याण समिती** सदस्य म्हणून नांवे घोषित करावीत, ही विनंती.

सही

भगवती शर्मा
गटनेता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २९/११/२००८

**प्रकरण क्र. ८० :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) (१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत चार प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत.

**ठराव क्र.७४:-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) (१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संलग्न असलेल्या प्रभागांच्या प्रभाग समित्या गठित करण्याचे अधिकार महानगरपालिकेस म्हणजेच मा. महासभेस दिलेले आहेत. कलम २९ अ (१) मध्ये दिलेल्या सुचीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्यांची संख्या निश्चित केलेली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ५,२०,३०१ असल्याने २९ अ (१) च्या सुचीनुसार ४ प्रभाग समित्या स्थापन करावयाच्या आहेत. प्रभाग समित्या स्थापन करताना प्रत्येक समितीमध्ये समाविष्ट होणा-या व एकमेकाशी संलग्न असणाऱ्या प्रभागांना एकत्रित करुन भौगोलिकदृष्ट्या सोयीस्कर व जवळपास समान लोकसंख्या असलेल्या एकत्रित प्रभागांच्या समित्या गठीत करावयाच्या आहेत.

खालीलप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणे कायदेशीर व रचनात्मकदृष्ट्या योग्य आहे. सोबत प्रभाग समिती रचनेचा नकाशा जोडला आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | १ | १,२,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०, ३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९ | २२ |
| २ | २ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,४०, ४१,४२,४३,४४,४७,४८,४९, | २५ |
| ३ | ३ | ४५,४६,५१,६१,७०,७१,७२,७३,७४,७५,७६, ७७,७८,७९ | १४ |
| ४ | ४ | ५०,५२,५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६२,६३,६४, ६५,६६,६७,६८,६९ | १८ |

वरीलप्रमाणे प्रभाग समितीच्या रचनेस ही सभा मान्यता देत आहे. असा ठराव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | नलावडे दिनेश दगडू | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४ | सुनिता कैलास पाटील | |
| ५ | पाटील मिलन गोविंदराव | ५ | कुरेशी याकुब ईस्माईल | |
| ६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ६ | भोईर शशिकांत जगन्नाथ | |
| ७ | शेख आसिफ गुलाब | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | गोविंद हेलन जॉर्जी | ८ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | |
| ९ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | ९ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| १० | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | १० | जंगम लक्ष्मण गणपत | |
| ११ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | ११ | सपार उमा विश्वनाथ | |
| १२ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १३ | शर्मा भगवती तुगनचंद | १३ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | |
| १४ | पाटील वंदना मंगेश | १४ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | |
| १५ | चक्रे वंदना रामदास | १५ | श्रीमती.सय्यद नुरजहॉं नझर हुसैन | |
| १६ | माळी हेमा रविंद्र | १६ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| १७ | ज्योत्स्ना हसनाळे | १७ | शफीक अहमद सादत खान | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | भाटकर प्रेरणा प्रमोद | |
| १९ | परेरा टेरी पॉल | १९ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २० | मेहता नरेंद्र लालचंद | २० | वैती विजया हेमचंद्र | |
| २१ | वर्षा गिरधर भानुशाली | २१ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | |
| २२ | भोईर राजू यशवंत | २२ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २३ | जाधव मोहन महादेव | २३ | श्री.मोदी चद्रकांत भिकालाल | |
| २४ | सिंह मदन उदितनारायण | २४ | भट दिप्ती शेखर | |
| २५ | म्हात्रे कल्पना महेश | २५ | वैती चंद्रकांत सिताराम | |
| २६ | पाटील शरद केशव | २६ | अनिल दिवाकर सावंत | |
| २७ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २७ | शेख सलिम दाउद | |
| २८ | बाविघर सिसिलीया विजय | २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| ३० | पांडे स्नेहा शैलेश | ३० | व्यास सुधा वासुदेव | |
| ३१ | दुबे रामनारायण सदानंद | ३१ | मिलन वसंत म्हात्रे | |
| ३२ | यादव मिरादेवी रामलाल | ३२ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३३ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३४ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३५ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३६ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३७ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |


**ठराव बहुमताने मंजुर**

(signature)

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा प्रकरण क्र. ८०
प्रभाग समिती
भौगोलिक रचना




सुचक
अनुमोदक

# मा. महासभा दि. २९/११/२००८

**प्रकरण क्रमांक : ( 81 )** विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक : ( 75 )**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या जलदगतीने वाढत असून नव्याने गृहसंकुले, इमारती उभ्या राहत आहेत. सदर ठिकाणी नागरीक रहावयास आलेले असून सदर भागातील रस्ते, गटारे बांधणे आवश्यक आहे. तसेच शहरातील इतर नाले, गटारे बांधणे आवश्यक असून काही रस्त्यांची उंची वाढवून सदर रस्ते मजबुतीकरण व पुर्न:पृष्ठीकरण करण्याची आवश्यकता आहे. प्रशासनाचा गोषवारा पहाता सदर गोषवाऱ्यातील खालील कामे करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | भाईंदर (पूर्व) नवघर शाळेमागून हिराजी पाटील यांचे घरापर्यंत रस्त्याचे पुर्न:पृष्ठीकरण करणे, संरक्षण भिंत बांधणे | रू. ८१,३८,६००/- |
| २. | भाईंदर (पूर्व) विमल डेरी पासून प्रतिक्षा अपार्ट पर्यंत रस्त्याचे पुर्न:पृष्ठीकरण करणे व गटार बांधणे | रू. ७७,५५,१००/- |
| ३. | भाईंदर (पूर्व) विमल डेअरी ते नवघर नाक्यापर्यंत नाल्याची पुर्न:बांधणी करणे | रू. २,२२,८९,२००/- |
| ४. | भाईंदर (पूर्व) कैराली अपार्टमेंट मागून जोयल अपार्ट पर्यंत आर सी सी नाला बांधून स्लॅब टाकणे | रू. ३७,७१,५५०/- |
| ५. | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. 8 मधील तेजकिरण बिल्डिंग ते विद्यावसिनी व क्रिष्णदिप अपार्ट व त्रिमुर्ती बिल्डिंग बाजूस आर सी सी नाला बांधून स्लॅब टाकणे | रू. ६९,३७,३००/- |
| ६. | भाईंदर (पूर्व) रामनगर ते शिवश्रध्दा कॉम्पलेक्स बी पी रोड पर्यंत रस्ता पुर्न:पृष्ठीकरण करणे (जय अंबे इंडस्ट्रिज रोड) | रू. ३२,४६,६००/- |
| ७. | भाईंदर (पूर्व) शालिभद्र नगर, ओम पुष्पक ते एस एम पब्लिक शाळा व सदविचार इमारत ते मेहता इंड. इस्टेट पर्यंत नाला बांधून स्लॅब टाकणे | रू. २३,५६,९६०/- |
| ८. | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रोडवरील मेडतीया नगर पासून आयडीयल पार्क पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजूस गटार बांधणे | रू. १,४७,७३,९००/- |
| ९. | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल डी पी रस्त्यावरील नवराज अपार्ट पासून आरक्षण क्र. 221 पर्यंत आर सी सी नाला बांधणे | रू. ३,६७,२३,३००/- |
| १०. | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. 51 मधील दिपक हॉस्पीटल डी पी रस्त्यावरून क्विन्स पार्ककडे जाणारा 18.00 मी. रुंदीचा उर्वरीत रस्ता तयार करणे, दोन्ही बाजूस गटार बांधणे | रू. १,०७,६५,३५०/- |

| | | |
|---|---|---|
| ११. | भाईंदर (पूर्व) सिनेमॅक्स सर्कल पासून मेरीगोल्ड सर्कल ते गौरव गॅलक्सी (महापौर बंगल्या समोरील रस्ता) पर्यत रस्ता तयार करणे गटार बांधणे | रू. १,८८,९७,८००/- १८ |
| १२. | भाईंदर (पूर्व) सिनेमॅक्स थेअटर समोरून रामदेव पार्क कडे जाणारा डी पी रस्ता तयार करणे, गटार बांधणे | रू. १,१८,२८,४००/- |
| १३. | भाईंदर (पूर्व) रामदेव पार्क डी पी रस्त्यापासून कनाकिया रोडकडे जाणारा रस्ता 15.00 मी रुंद डी पी रस्ता तयार करणे, गटार बांधणे | रू. १,१५,२४,३००/- |
| १४. | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट डी पी रस्त्यापासून आरक्षण क्र. 246 ते रामदेव पार्क रस्त्यापर्यत डी पी रस्ता तयार करणे गटार बांधणे | रू. २,०५,५४,१००/- |
| १५. | भाईंदर (पूर्व) सुभाषनगर पासून नवराज अपार्ट पर्यत आर सी सी नाला बांधणे | रू. ३,१८,९०,५००/- |
| १६. | भाईंदर (पूर्व) गणपती मार्बल पासून मनी आर्केड पर्यत उर्वरीत रस्त्याची उंची वाढवून तयार करणे, गटार बांधणे तसेच केनवुड पार्क ते आरक्षण क्र. 242 शेजारील डी पी रोड तयार करणे | रू. २,३५,२४,०००/- |
| १७. | भाईंदर (पूर्व) खारीगाव शाळा उर्वरीत इमारतीचे पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे | रू. ७०,००,०००/- |
| १८. | रा.म.क्र. 8 वरील माशाचापाडा रोडवरील अंगणवाडी ते ग्रीन व्हीलेज पर्यतचा 18.00 मी रुंदीचा डी पी रस्ता तयार करणे | रू. १,९२,६१,९००/- |
| १९. | घोडबंदर येथिल चिचबादेवी मंदिरासमोरील मुख्य रस्ता उंच करून डांबरीकरण करणे | रू. २९,६६,६००/- |
| २०. | रा.म.क्र. 8 पासून डाचकुलपाडा येथे जाणारा रस्ता तयार करणे | रू. ४९,१७,६००/- |
| २१. | मिरारोड (पूर्व) येथिल एम.टी.एन.एल रस्ता मजबुतीकरण करून गटार बांधणे | रू. २,६२,६३,४००/- |
| २२. | छत्रपती शिवाजी महाराज मुख्य रस्ता लगतच्या सर्व्हीस रोडचे खडीकरण करून पेव्हर ब्लॉक बसविणे, डीव्हायडर बसविणे, काशिमिरा नाका येथिल उर्वरीत नाले / गटार बांधणे | रू. ३,६०,६०,२००/- |
| २३. | वर्सोवा येथिल रा.म.क्र. 8 पासून पियुष पाणी कडे जाणारा रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे | रू. १८,२१,२००/- |
| २४. | उत्तन पाली रस्ता मजबुतीकरण करणे. | रू. १,७८,९१,०००/- |
| २५. | भाईंदर (प) 90 फुटी रोड मजबुतीकरण करणे. | रू. ५६,९४,२००/- |
| २६. | भाईंदर (प) उड्डाणपुल समांतर तोदी इस्टेट ते रेल्वे समांतर नाल्यापर्यत नाला बांधणे. | रू. १,३९,०१,०००/- |
| २७. | मिरारोड शांतीनगर से. 4 मधील सी. 17 ते डी. 9 पर्यता रस्ता पुर्न:पृष्ठीकरण करणे. | रू. १५,७८,६००/- |
| २८. | मिरारोड मार्बल आर्च ते आर.ओ.बी जंक्शन पर्यतचा रस्ता पुर्न:पृष्ठीकरण करणे. | रू. ४०,११,६००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २९. | मिरारोड पार्श्वनगर मधील रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे व एका बाजूस गटार बांधणे. | रू. ३३,२३,२००/- | 182 |
| ३०. | मिरारोड गितानगर फेस 1,2,3 मधील रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ३१,४३,७००/- | |
| ३१. | मिरारोड शांतीनगर से. 6 मधील अे – 6 ते बी – 9 पर्यतच्या गटाराचे पुर्नबांधणी करणे. | रू. २०,५६,२००/- | |
| ३२. | मिरारोड अस्मिता ॲस्कान 4 ते साईलिला एस.टी.डी. बूथ पर्यत नाला बांधणे. | रू. १४,१०,१००/- | |

वरील विकास कामांसोबत खालील विकास कामे समाविष्ट करण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| ३३. | भाईंदर (पूर्व) केबिन नाक्यापासून केराली अपार्ट पर्यत व नर्मदानगर पासून साईसागर अपार्ट पर्यत रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे |
| ३४. | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. 18 मधील भाजीमार्केट रोड (नवघर रोड ते डी पी रोड) व शिल्पा हॉटेल गल्ली (टेम्पो नाका ते साधुराम हॉटेल पर्यत) रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे |
| ३५. | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. 6 मधील चिंतामणी अपार्ट पासून कोळीनगर जाणारा रस्ता तयार करणे |
| ३६. | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. 6 मधील श्रीनाथ धाम व शिवज्योत अपार्ट मधील आणि ओशियन पॅलेस पासून कोळीनगर पर्यत उर्वरीत आर सी सी नाला बांधून स्लॅब टाकणे |
| ३७. | भाईंदर (पूर्व) रावलनगर ते प्रिन्स प्लाझा पर्यत उर्वरीत रस्ता व गटार बांधून स्लॅब टाकणे |
| ३८. | भाईंदर (पूर्व) हनुमान नगर ते केबिन रोड पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे |
| ३९. | भाईंदर (पूर्व) विकास इंडस्ट्रियल इस्टेट मधील निर्मल हॉटेल ते गुजरात इस्टेट पर्यत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे |
| ४०. | भाईंदर (पूर्व) कनाकीया रोड वर लक्ष्मी पार्क पासून पुढे 30.00 मीटर रुंदीचा उर्वरीत डी पी रोड तयार करणे, नाले बांधणे |
| ४१. | ठाणे - घोडबंदर रस्त्यावरील सर्व्हे नं. 42 पासून वर्सोवा गावाकडे जाणारा 15.00 मी रुंदीचा डी पी रस्ता तयार करणे |
| ४२. | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर थर्मोप्लास्टीक पट्टे मारणे |
| ४३. | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत पार्कीग, नो पार्कीग व इतर आवश्यक नामनिर्देशक फलक बसविणे |
| ४४. | भाईंदर (प) येथिल मुबारक कॉम्पलेक्स जवळील नाला तयार करणे, स्लॅब टाकणे |
| ४५. | भाईंदर (प) येथिल राम मंदिर रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे |
| ४६. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 26 नेहरु नगर व शास्त्रीनगर येथिल रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे |
| ४७. | पेणकरपाडा बॉम्बे मार्केट ते राजीव गांधी शौचालय पर्यतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे |

/83

| | |
|---|---|
| ४८. | पेणकरपाडा वॉर्ड क्र. 78 येथे गटारावर स्लॅब टाकणे |
| ४९. | भाईदर (प.) विनायक मंदिर ते राधासदन, गाडोदिया सदन ते नंदुसदन रस्ता खोदून नव्याने तयार करणे |
| ५०. | भाईंदर (प) बालाजीनगर पाणपोई ते साईबाबा उदयानापर्यंत फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे |
| ५१. | पाली पेट्रोलपंप ते स्मशानभुमी पर्यंत रस्ता पुर्न:पृष्ठीकरण करणे |
| ५२. | भाईंदर (पूर्व) राधाकृष्णन मंदिर मार्ग सिलकोट करणे |
| ५३. | शांतीनगर सेक्टर नं. 10 अे / 15 बिल्डिंग ते सेक्टर नं. 9 जाफरी खाडीपर्यंत गटार बांधणे |
| ५४. | शांतीनगर सेक्टर नं. 10 बी / 7 बिल्डिंग पासून अे / 15 पर्यंत गटार बनविणे |
| ५५. | रा.म.क्र. 8 वर निलकमल हॉटेल ते अंगणवाडी पयत आर सी सी गटार बांधणे, जनतानगर झोपडपट्टीतील गटारे दुरुस्ती करणे, साईधाम चाळ पोलिस चौकी, गौरी चाळ, जाधव चाळ, गणेश चाळ, एकता चाळ, हरिओम चाळ, प्रजापती चाळ इ. ठिकाणी गटार बांधणे |
| ५६. | गोडदेव तलाव सुशोभिकरण करणे |
| ५७. | मिरागाव तुळशी तलाव सुशोभिकरण करणे |
| ५८. | मोर्वा तलाव सुशोभिकरण करणे |
| ५९. | वॉर्ड क्र. 77 गांवदेवी कंम्पाउंड नाला संरक्षक भिंत बांधणे. |
| ६०. | भाईंदर (प) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड पुर्न:पृष्ठीकरण करणे. |
| ६१. | भाईंदर (प) पोलिस स्टेशन ते रेल्वे फाटक पर्यंत नविन गटार बांधून फुटपाथ तयार करणे, रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे. |
| ६२. | गौरव गॅलेक्सी फेज – 1 येथे गटार बांधून रस्ता तयार करणे. |
| ६३. | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. 8 गणेश कृपा ते विध्यंवासिनी (लकी स्टार) पक्का रस्ता तयार करणे. |
| ६४. | मिरा एम.आय.डी.सी. रोड पासून शांतीधाम, शांती गार्डन ते सुर्या शॉपिंग सेंटर पर्यंत नाला तयार करणे, सुरभी जीम गौरव गॅलक्सी रस्ता उंच करणे, नाला बांधणे. |
| ६५. | भाईंदर (पूर्व) इंदिरा नगर झोपडपट्टी ते खाडीपर्यंत नाला बांधणे. |
| ६६. | भाईंदर (पूर्व) त्रिलोक दर्शन ते शिवशंकर इंडस्ट्रीयल इस्टेट पर्यंत रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे. |
| ६७. | भाईंदर (प) साईछाया ते मधु हॉस्पीटल, मधु हॉस्पीटल ते उमा निवास पर्यंत रोड पुर्न:पृष्ठीकरण करणे. |

| ६८. | साईकृपा कॉम्पलेकस उदयान विकसित करणे. 185 |
|---|---|

वरील सर्व कामांचे अंदाजपत्रकांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सन 2008-09 या वर्षात शिल्लक तसेच मा. स्थायी समितीने पुर्नविनियोजनाद्वारे मंजुरी दिलेल्या ठरावास मंजूरी देण्यात येत आहे. JNNURM योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्षाखाली भुयार गटारे व एकात्मिक नाला प्रकल्प करीता महानगरपालिका निधितून 30.72 कोटी रक्कमेची तरतूद केली आहे. 31 मार्च 2009 पर्यत त्यामधून खर्च पडणार नसल्याने सदर लेखाशिर्षातील रक्कम वरील प्रस्तावित कामाकरीता पुर्नविनियोजनाद्वारे करण्यास हि सभा मंजूरी देत आहे. वरील कामापैकी अ.क्र. 33 ते 66 कामांचे तातडीने अंदाजपत्रके तयार करण्यात यावीत. सदर अंदाजपत्रकांना देखिल प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी आयुक्त यांनी त्वरीत निविदा मागविण्यात याव्यात. वरील कामांचा खर्च सन 2009 – 10 या वर्षात देखिल होणार असल्याने त्याकरीता सन 2009-10 या वर्षाच्या अर्थसंकल्पात प्राध्यान्याने तरतूद करण्याची प्रशासनाने दक्षता घ्यावी व मा. स्थायी समिती मार्फत मा. महासभेपुढे अर्थसंकल्पाच्यावेळी प्रस्ताव सादर करावा. निधिची कमतरता भासल्यास सदर कामाकरीता अर्थसंकल्पात तरतूद करून खाजगी / शासकीय, निमशासकीय संस्थेकडून आवश्यक कर्ज उपलब्ध करून घेण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 109 अन्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच JNNURM अंतर्गत प्रस्तावित कामे JNNURM मधून वगळण्यात येउन सदर कामे महानगरपालिका निधीतून करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री.भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्रीमती. ज्योस्त्ना हसनाळे**

ठराव बहुमताने मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

185

## मा. महासभा दि. २९/११/२००८

**प्रकरण क्र. ८२ :-** **<u>नऊ बालवाडी शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे बाबत विचार विनिमय करणे...</u>**

**ठराव क्र. ७६ :-**

तत्कालीन नगरपालिकेत दि.२२/०९/१९९४ पासुन जिल्हापरिषदेकडुन २७ बालवाडया हस्तांतरीत झाल्या असुन त्यात प्रत्येकी एक बालवाडी शिक्षीका कार्यरत आहे. या बालवाडी शिक्षीकांना रु.१०००/- प्रती महिना मानधन सद्यस्थितीत देण्यात येत असुन त्या चार तास मुलांना शिकविण्याचे काम करतात. त्या २७ बालवाडी कार्यरत शिक्षकांपैकी १८ बालवाडी शिक्षीका या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि.१५/०९/२००६ रोजीचे शासन आदेशान्वये मंजुर स्थायी बालवाडी शिक्षीका या पदावर त्यांची शैक्षणिक पात्रता, अर्हता तसेच मागासवर्ग अनुशेषाच्या अनुषंगाने नेमणुक झाली आहे. उर्वरीत नऊ बालवाडी शिक्षीकांची निवड न झाल्याने त्या सद्यस्थितीत रु.१०००/- या मानधनावर कार्यरत असुन त्यांना दि.२०/०१/२००४ पासुन सदर मानधन मिळत आहे. त्या मानधनात वाढ करण्याबाबत शिक्षकांनी केलेल्या मागणीचे अनुषंगाने तसेच महागाईचा विचार करता सद्यस्थितीत बालवाडी शिक्षकांना देण्यात येत असलेले ठोक मानधन हे अल्प असुन त्यांचे कामाचे चार तासा ऐवजी आठ तास करुन वाढीव चार तास त्यांनी महानगरपालिकेचे कार्यालयीन कामकाज पहावे या अटीवर त्यांचे ठोक मानधन दि. ०१/१२/२००८ पासुन रु. ३९००/- एवढे करणेस ही सभा मंजुरी देत असुन येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता आहे.

**सुचक :-** जयंत म्हात्रे पाटील

**अनुमोदन :-** प्रफुल्ल पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला,**

# मा.महासभा दि. २९/११/२००८

186

**प्रकरण क्रमांकः** ( ८३ ) महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या मासळी मार्केट मध्ये व्यवसाय करणाऱ्या मासळी विक्रेत्यांना आकारणी दिनांकापासून फेर बाजार शुल्क आकारणी करणेबाबत.

**ठराव क्रमांक :** (७७)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची गोडदेव, खारीगाव, नवघर, बाईंदर (प), घोडबंदर, काशी, उत्तन, मोर्वा, मुर्धा व राई येथे मार्केट इमारती आहेत. सदर मार्केट इमारतीमध्ये एकूण १६४ मासळी विक्रेते व ०७ मटण विक्रेते बसत आहेत. मा.स्थायी समिती सभा दि. ३०/०६/२००६, ठराव क्र. ४१ अन्वये मासळी विक्रेत्याकडून रु.३००/- महिना व मटण विक्रेत्याकडून रु.६००/- मासिक भाडे आकारण्याबाबत निर्णय झालेला आहे. सदर मार्केट इमारतीमधील मासळी व मटण विक्रेत्यांकडून रु. ५४,६०१/- मासिक व रु. ६,५५,२१२/- वार्षिक भाडे मिळणे अपेक्षित आहे. सदर मार्केटच्या देखभाल दुरुस्ती व दैनंदिन साफसफाई, पाणीबील, विद्युत बील यावर रु. १,५०,०००/- मासिक खर्च होत आहे. त्यामुळे सदर विषयाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यासाठी मा.महासभा दि. १९/०६/२००८, प्रकरण क्र.२२ अन्वये प्रकरण सादर करण्यात आले होते. तथापि सदर प्रकरणांवर निर्णय झालेला नाही.

सदर मासळी विक्रेत्यांच्या संघाकडून महानगरपालिकेने ठरविलेले दर जास्त असल्याने ते कमी करण्याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे. मुंबई महानगरपालिका मासळी विक्रेत्यांना रु.७०/- त्रैमासिक शुल्क / भाडे आकारत असून, मुंबई येथील मार्केट मोठी असून तेथील विक्रेत्यांना दिलेली जागा ऐसपैस आहे. त्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेने पूर्ण बंदिस्त रुपाची मार्केट दिलेली नसून, प्रत्येक मासळी विक्रेत्याला दिलेली जागा फारच कमी आहे.

. सदर मासळी विक्रेत्यांकडून कर आकारणी दिनांकापासून रु. २०/- प्रति माह बाजारशुल्क/ भाडे आकारण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच मासळी विक्रेत्यांकडून बाजारशुल्क / भाड्याची रक्कम आकारणी दिनांकापासुन रु. २०/- प्रतिमाह प्रमाणे देयके काढून उर्वरीत थकबाकीची रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. सदर मासळी मार्केट इमारतीची साफसफाई संबंधित विक्रेत्यांनीच करावी, तसेच लाईटबील, पाणीबीलसुद्धा संबंधित मासळी मार्केटमधील विक्रेत्यांनी भरावी.

सूचक :                अनुमोदन :

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

पिठासीन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २९/११/२००८

**दु:खवटा ठराव क्र. ७८ :-**

भारताचे माजी पंतप्रधान श्री. व्ही. पी. सिंग यांचे दि. २७/११/०८ रोजी देहावसन झाले. तसेच मुंबईवर दि. २६/११/०८ रोजी अतिरेक्यांनी भीषण हल्ला केला. यामध्ये ए.टी.एस. चे प्रमुख श्री. हेमंत करकरे, खंडणी विरोधी पथकाचे प्रमुख श्री. विजय साळसकर, अप्पर पोलिस कमिशनर श्री. अशोक कामटे, एन.एस.जी. कमांडो मेजर संदीप उन्नीकृष्णन यांच्यासह १५० च्यावर नागरिकांचे बलिदान गेले व नवघर गावातील प्रभात पाटील ह्यांच्या नातेवाईक डॉ. विणा पाटील यांचे दि. २७/११/२००८ रोजी मृत्यु झाला या बाबत हि सभा शोक प्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- लक्ष्मण जंगम** **अनुमोदन :- दिनेश नलावडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२००८.

प्रकरण क्र. ८४ :- दि. १९/०७/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ७८ :-

दि. १९/०७/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- जयंत महादेव पाटिल अनुमोदन :- भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/१२/२००८

**प्रकरण क्र. ८५ :-** अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेणे.

(सभागृहामध्ये अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. ११/११/२००८

प्रकरण क्र. :- ८५ सुचना

**विषय :- अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेणे.**

माहे ऑगस्ट २००७ च्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीपासून मनपा क्षेत्रात मोठ्याप्रमाणात फेरीवाल्यांची संख्या वाढली असून जवळजवळ शहरातील प्रत्येक रस्त्यांवर फेरीवाले, गॅरेजवाले व अनधिकृत स्टॉल मुख्य रस्त्यावरील चिकन - मटन विक्रीची दुकांने, तसेच दुकानदारांनी व व्यवसायीकांनी फुथपाटवर केलेले अतिक्रमण या प्रकरणामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते. याबाबत मा. महासभेत व मा. स्थायी समितीत वेळोवेळी निर्णय झालेले असताना त्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाकडून यथोचितरित्या होत नाही.

**अनधिकृत बांधकाम** :-

तसेच शहरातील मोक्याच्या जागांवरती विशेषतः विकसीत इमारतीच्या आर.जी प्लॉटमध्ये, विकास आराखड्याच्या आरक्षणामध्ये, नैसर्गिक नाल्यांवरती व महापालिकेच्या रस्त्यावरती, डी.पी. रोडमध्ये अनेक बांधकामे अनधिकृत झाली असून त्यात गाळ्यापासून ते बहुमजली इमारतीचा समावेश आहे, तसेच मंजूर रेखाकंनापेक्षा जास्तीचं काम करणे, चटई क्षेत्राची चोरी व उल्लंघन करणे, इत्यादी कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या शहरातील अनधिकृत बांधकामाबाबत मा. माजी नगरसेवकांना मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीच्यावेळी प्रशासनाकडून शहरातील अनधिकृत बांधकामाची यादी सादर केली आहे, तसेच महाराष्ट्र शासनाकडून नेमलेल्या अग्रवाल समितीस मा. प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामाची यादी दिलेली आहे, तसेच याबाबत संपूर्ण माहिती महापालिका प्रशासन व विभागीय कार्यालयांकडे आहे. प्रशासनाकडून विधी सल्लागार मा. वकिलांचे पॅनल याविषयी कार्यरत आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल व माहिती मा. महासभेसमोर सदस्यांच्या माहितीकरिता देणे अभिप्रेत होते. अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणे याविषयी कारवाईसाठी मा. सदस्य, पत्रकार, नागरिक यांचेकडून वारंवार तक्रारी महापालिकेस प्राप्त झाल्या आहेत. मा. महासभेसमोर प्रश्नोत्तर व लक्षवेधीच्या माध्यमातून देखील याबाबत चर्चा झाली आहे.

महानगरपालिकेकडून याबाबत ती अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे थांबविण्याची किंवा बंद करण्याची किंवा तोंडण्याची कारवाई होत नाही. ती अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे एका दिवसात किंवा अदृश्य स्वरुपात केलेली नाहीत. सदर अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे ज्या अधिकाऱ्याच्या आख्यत्यारित येतात त्यांस जबाबदार धरुन ती हटविण्यांत यावीत. व त्या कामी लागणारा खर्च त्या संबधित अधिकाऱ्यांकडून वसुल करावा. अशी मी सूचना मांडीत आहे.

सुचक :- श्री. चंद्रकांत म्हा. वैती

अनुमोदक :- श्री. एस. ए. खान

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/१२/२००८

**प्रकरण क्र. ८६ :-** उपकर वसुली बाबत आढावा घेणे.

(सभागृहामध्ये उपकर वसुली बाबत आढावा घेण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ११/१२/२००८**

**प्रकरण क्र. ८६ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेतील उपकर वसुलीबाबत आढावा घेणे.**

~~ठराव~~ सूचना

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. १/९/२००८ पासून जकात ऐवजी उपकर लागु केलेला आहे.

महानगरपालिकेचे सन २००७-०८ मध्ये ७३०९.८६ लक्ष मागणी होती. सन २००८-०९ ह्या आर्थिक वर्षात १० टक्के वाढ विचारात घेतली असती तर देकार ८०.६४ लक्ष इतका राहीला असता म्हणजेच महापालिकेस प्रतिमहा जकातीचे उत्पन्न ६७१ लक्ष उत्पन्न मिळाले असते. म्हणजेच दोन महिन्यांकरिता जकातीचे उत्पन्न १३४२ लक्ष मिळाले असते.

तथापी, महानगरपालिकेने १/११/२००८ पासून महापालिका क्षेत्रात उपकर लागू केला. उपकराची दोन महीन्याची वसुली ७५०.८६ लक्ष इतकी झाली आहे. म्हणजेच महापालिकेस जवळपास ५९२ लक्ष इतकी तुट दोन महिन्यात आली आहे. सदरची तुट पुढील कालावधीत भरून निघणेबाबत प्रशासन देखील साशंक आहे.

दि. १/९/२००८ असून दोन महिन्यात फक्त ९२०५ व्यापाऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यासाठी महापालिकेने जास्तीत जास्त अधिकारी/कर्मचारी उपकर वसुलीसाठी नेमणूक केली आहे. त्यामुळे आस्थापनेचा खर्च वाढलेला आहे. उपकर आकारणीच्या किचकट पध्दतीमुळे व्यापाऱ्यांमध्ये उपकर नोंदणीसाठी व रेकॉर्ड ठेवण्याच्या पध्दतीकरीता नाराजी पसरलेली आहे.

महापालिका क्षेत्रातील विविध व्यापारी संघटनांनी उपकर ऐवजी जकात कर सुरू करावा अशी लेखी निवेदने महानगरपालिकेस दिलेली आहेत. तसेच व्यापाऱ्यांनी दि. १०/१२/२००८ रोजी व्यापार बंद ठेवून महानगरपालिकेवर मोर्चा आणला होता. व्यापाऱ्यांच्या बंदमुळे शहरात पुन्हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवू शकतो.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता आजची महासभा हया निर्णयाप्रत आलेली आहे की, महानगरपालिकेची होणारी वित्तीय तुट भरून काढण्यासाठी व उपकराच्या वसुलीच्या कामासाठी नेमलेल्या कर्मचारी वर्गामुळे वाढणारा आस्थापनेचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने तसेच महानगरपालिकेस होणाऱ्या आर्थिक नुकसानीमुळे महानगरपालिकेच्या विकास कामांवर, नियमित कामकाजावर विपरीत परिणाम होऊ नये याकरिता उपकरा ऐवजी जकात कर लागू करण्यात यावा. जकात कर वसुल करण्याची कारवाई करण्याच्या दृष्टीने **"जकात कर लागू करण्याच्या विषयासाठी विशेष महासभा तातडीने बोलविण्यात यावी."**

जकात कर सुरू करण्यासाठी बोलविण्यात येणारी महासभा होईपर्यंत मा. आयुक्त सो., यांनी या ~~ठरावा~~ सूचनेनुसार जकात कर सुरू करण्यासाठी तयारी करून आवश्यकता भासल्यास शासनाच्या मंजुरीसाठी आजच प्रस्ताव तयार करून शासनाच्या मंजुरीसीठी पाठविण्यांत यावा असा मी ~~ठराव~~ सूचना मांडत आहे. ~~सदरचा ठराव वाचून कायम करण्यात येत आहे~~.

सुचक : [signature] अनुमोदक : [signature]

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मा. महासभा दि. ११/१२/२००८

प्रकरण क्र. :- ८६. // सुचना //

**विषय :- उपकर वसुलीबाबत आढावा घेणे.**

मिरा-भाईदर महापालिकेत मनपामार्फत जकात वसुलीचे काम केले जात असताना, वसुलीचा इष्टांक गाठणेसाठी महापालिकेमार्फत जकात वसुलीसाठी ठेकेदार नेमण्यांत आला. जकात ठेकेदारामार्फत जकात वसुल करताना सुरवातीची काही वर्षे व्यवस्थित चालले असताना ठेकेदाराच्या विरोधात व्यापाऱ्यांकडून कमी प्रमाणात तक्रारी येत होत्या, परंतू त्यानंतर जकात आकारणी करताना लादलेली अन्यायकारक जकात दरवाढ व जकात एन्जटांची दादागीरी व मनमानीमुळे शहरातील नागरिकांनी खरेदी केलेल्या वस्तूंवरती मनमानी जकात आकारणे, शहरात येणाऱ्या बिऱ्हाडाच्या किंवा जुन्या सामानावर झालेली जकात आकारणी, बाहेरुन येणाऱ्या स्त्री, पुरुषाच्या बॅगा व माल सामानाची झडती घेवून आकारलेली जकात, नागरिकांची व व्यापाऱ्यांची जकात आकारणी करण्यांवरुन झालेले वाद मिटविण्यांत महापालिकेने केलेली दिरंगाई, कारखाने व व्यवसाय/ व्यापाराच्या ठिकाणी जकात ठेकेदारांकडून संबधितांची दप्तर तपासणी करणे, दंडात्मक रक्कमेच्या नावाखाली दहापटीने जकात लावण्याची शास्ती, तसेच त्याच्या कर्मचाऱ्यांनी रस्तोरस्ती फिरुन जकातीची बीले मागणे यामुळे शहरभर पसरलेला असंतोष व तीव्र नाराजगी होती. जकात ठेकादाराच्या या वागण्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे व्यापऱ्यांकडून पुकारण्यांत आलेला जकात बंद आंदोलनला नागरिकांनी मोठी साथ दिली होती. साधारणतः १७ हजारापेक्षा जास्त व्यवसायीक घटक मनपा क्षेत्रात आहेत. व्यापाऱ्याच्या बंदमुळे व महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे मिरा-भाईंदर महापालिकेत दि. ०१/०९/२००८ पासून जकातीएवजी उपकर लागू करण्यात आलेला आहे. उपकर अंमलबजावणीस मात्र तीन महिने किंवा १०० दिवसच पुर्ण झालेले आहेत. या शंभर दिवसात उपकरास मिळालेला प्रतिसाद उत्तम असुन मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाने केलेले परिश्रम स्वागतार्ह आहेत.

उपकर अंमलबजावणी करणे संदर्भात अनेक व्यापाऱ्यांच्या संघटनामार्फत मागणी करण्यांत आली होती. उपकर अंमजबजावणी करताना अनेक व्यापाऱ्यांनी / व्यवसायीकांनी मनपा प्रशासनाकडून या संदर्भात असलेल्या त्रृटी समजून घेतल्या वेळोवेळी मार्गदर्शन घेतले. मागील तीन महिन्यातील उपकर वसुली पहाता सप्टेंबर महिन्यातील वसुली रु. ३,२८,४२,३५/- ऑक्टोंबर महिन्यातील वसुली रु. ३,२७,९१,३१/- नोव्हेंबर महिन्यातील वसुली ३,८३,४५५/- असुन आजमितीस साधारणातः १० हजार व्यवसायीकांनी उपकराचे नंबर घेतले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उपकर वसुल करणेच्या धोरणाला मनपा क्षेत्रात चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. आगामी कालावधीमध्ये मनपा प्रशासनाकडून अजून अधीक परिश्रम केल्यास आपण निश्चित उपकराची वसुली मोठ्याप्रमाणात करु शकू. यास्तव आवश्यक वाटल्यास मा. प्रशासनाकडून सरसकट उपकर आकारणीस दिलेले अर्जातील अटीशर्ती मध्ये आवश्यक ते फेरफार करुन छोट्या स्वरुपात किंवा कारागीर म्हणून काम करणारे मंजूर वर्ग व छोट्या व्यवसायीकांना सोईस्कर राहील अशाप्रकारे उपकर आकारणीचे फॉर्म वितरीत करण्यात यावेत. अशी सुचना मांडीत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी.**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका



# मा. महासभा दि. १७/१२/२००८

**प्रकरण क्र. ८७ :-** **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उपकर रद्द करुन जकात कर लागू करणे बाबत.**

**ठराव क्र. ८० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेत दि. ०१/०९/२००८ पासून जकात ऐवजी उपकर लागू करण्यांत आला आहे. उपकर वसूलीबाबतचा अहवाल प्रशासनाने दि. ११/१२/२००८ च्या मा. महासभेपुढे प्रपत्रांसह सादर केला आहे. सदर अहवाल व प्रपत्राचे तसेच आजच्या महासभेतील गोषवाऱ्याचे अवलोकन करता असे निदर्शनास येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात एकुण २५,००० व्यावसायिक आहेत त्यामध्ये स्टील/ पाटे व त्यापासून निर्मित करण्यांत येणाऱ्या वस्तुंचे व्यापारी बहुसंख्य प्रमाणात आहेत.

उपकर लागू केल्यानंतर उपकर नोंदणीसाठी २५,००० व्यावसायिंका पैकी फक्त १७,५०० व्यापाऱ्यांनी अर्ज घेतले आहेत. परंतु प्रत्यक्षात फक्त १०,२६५ व्यापाऱ्यांनी नोंदणी करुन घेतली आहे.

नोंदणी केलेल्या व्यावसिकांपैकी फक्त ५०% व्यावसायिक प्रत्यक्ष उपकर भरीत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील व्यावसिकांपैकी बरेचसे व्यवसाय लघुउद्योग स्वरुपाचे असल्याने आयात केलेल्या मालाची नोंद ठेवणे किंवा किर्द तयार करण्याचे काम त्याचेकडुन केली जात नाही. बहुसंख्य असलेल्या स्टील/पाटे व्यावसायिक सुद्धा एकदा आयात केलेल्या मालाचे आयात करतेवेळेस व शहराअंतर्गत पुनःहस्तांतरण होत असल्याने त्याचे मार्फत कोणतेही लेखे ठेवले जात नाहीत. त्यामुळे उपकराची परिगणना करणे अडचणीचे होत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका तत्कालिन नगरपरिषद स्थापनेच्या दिवसापासून जकात वसूली करुन उत्पन्न मिळवित आहे. जकात उत्पन्नामुळे या शहराचा विकास झपाटयाने होवून अल्पकालावधीत तिला महानगरपालिकेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. सन १९९७ ते सन २००२ या कालावधीमध्ये जकातीऐवजी अनुदान राज्य शासनामार्फत मिळत असल्याने व त्यात दरवर्षी १०% वाढ मिळत असल्याने जकात वसूली केली जात नव्हती. महानगरपालिका स्थापन झाल्यांनतर सन २००३ पासून जकात वसूली केली जात आहे. त्यानुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षात जकातीचे उत्पन्न रु. ७,३०९.८६ लक्ष होते. यात १०% वाढ करुन सन २००८-०९ या वर्षाकरीता रु. ८,०६४.५४ लक्ष इतके जकातीचे उत्पन्न अपेक्षित होते.

मिरा-भाईंदर महानगरपालिका "ड" वर्गात मोडत असून राज्य शासनाने राज्यातील १५ "ड" वर्ग महानगरपालिकांनी जकात ऐवजी उपकर वसूली करण्यांचे धोरण ठरविले व उपकर वसूली अपेक्षित उत्पन्नापेक्षा कमी झाल्यास पहिल्या वर्षात १५% व दुसऱ्या वर्षात १०% व तीसऱ्या वर्षात ५% अनुदान देण्याचे जाहिर केले. मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि. ०१/०९/२००८ पासून उपकर वसूली सुरु केली असून सप्टेंबर २००८ व ऑक्टोंबर २००८ या २ महिन्याची फक्त ७४५.०६ लक्ष वसूली झाली आहे. याउलट जकात वसूली कायम राहिली असती तर वरील दोन महिन्यांचे उत्पन्न १३४२ लक्ष झाले असते. याचा अर्थ केवळ २ महिन्यात रु. ५९७ लक्ष इतकी तुट झाली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका व्यतिरिक्त इतर १४ "ड" वर्ग महानगरपालिकेत दि. ०१/११/२००८ पासून उपकर लावण्याचे ठरले होते. परंतु या सर्व महानगरपालिका क्षेत्रातील व्यापारी संघटना, लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांनी उपकरास विरोध केल्याने शासनाने अधिसुचना/

परिपत्रकाव्दारे त्या त्या महानगरपालिकांनी जकात किंवा उपकर याबाबतचा स्वतंत्र निर्णय घ्यावा असे जाहिर केल्याने १४ पैकी एकही महानगरपालिकेने उपकर लागू केला नसून तेथे जकात वसूली केली जात आहे.

मिरा-भाईंदर महानगपालिका आस्थापनेतील १०० अधिकारी/ कर्मचारी उपकर वसूलीसाठी नेमले असून त्यांच्या वेतनेपोटी देय रकमेची उपकर वसूलीच्या रकमेमध्ये परिगणना केलेली नाही त्याव्यतिरीक्त उपायुक्त, २१ उपकर अधिकारी, स्वतंत्र कार्यालय, गटनिहाय बैठक व्यवस्था, स्वतंत्र संगणक, संगणक आज्ञाप्रणाली इ. आस्थापनेवरील अतिरिक्त खर्च होत आहे. उपकर वसूलीसाठी मोठयाप्रमाणात कर्मचारी वर्ग नेमल्याने घरपट्टी व पाणीपट्टी कराची वसूली या वर्षात अपेक्षित इष्टांकाच्या खूपच दुरवर आहे. घरपट्टी व पाणीपट्टी वसूली कमी होत असल्याने त्याचा प्रभाव महानगरपालिका निधीवर परिणामकारक झालेला आहे. सप्टेंबर ०८ व ऑक्टोंबर ०८ या दोन महीन्यात एकुण ५९७ लक्ष तुट व नोव्हेंबर ०८ महिन्यात (अपेक्षित उत्पन्न रु. ६७१ लक्ष - प्रत्यक्ष वसूली दि. १५/१२/२००८ पर्यत खतवलेल्या नोंदीप्रमाणे रु. १४३ लक्ष) तुट रु. ५२८ लक्ष झालेली आहे. अशी एकुण रु. ११२५ लक्ष इतकी तुट मागील ३ महिन्यात झालेली आहे.

मागील २००७-०८ या आर्थिक वर्षात रु. १४,८०४.८७ लक्ष इतके निव्वळ महसूली उत्पन्न झाले होते. त्यामध्ये जवळपास ५०% म्हणजे रु. ७,०१४.६५ लक्ष उत्पन्न जकातीचे होते. उपकर वसूलीची तूट लक्षात घेता चालू आर्थिक वर्षात रु. ३,६०० लक्ष तूट महसुली उत्पन्नात येईल व त्यामुळे आर्थिक अदांजपत्रक पुर्णपणे कोलमडुन पडेल त्याव्यतिरीक्त तरतुद केलेली सर्व विकासकामे ठप्प होतील.

जवाहरलाल राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेली सर्व विकास कामे ३ वर्षात पुर्ण करावयाची असून या विकास कामांसाठी ५०% रक्कम महानगरपालिकेच्या निधीतुन तर ३५% केंद्र सरकार व १५% रक्कम राज्य सरकारकडुन अनुदान रुपाने मिळणार आहे. उपकर वसूलीतील तुटीमुळे वरील योजनेतील एकही विकास काम/ योजना करणे शक्य होणार नाही. व कालांतराने वरील योजनेतील देय अनुदानही रद्द होईल.

महाराष्ट्रातील इतर १४ “ड” वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांनी आंदोलने करुन उपकरास विरोध केला आहे. त्याच धर्तीवर मिरा-भाईंदर शहरातील व्यापाऱ्यांनी निवेदन, निदर्शने व मोर्चे काढून उपकराऐवजी जकात कर पुन्हा लावावा अशी मागणी केली आहे. त्याचप्रमाणे उपकर वसूली किंवा प्रदानाच्या प्रक्रीयेस कंटाळुन १५% ते २०% व्यापाऱ्यांनी स्थलांतर केले आहे असेही निवेदन केले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांची मागणी व उपकर वसूलीतील तुट विचारात घेता मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात “मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७(२) (अ) (अ)” अन्वये दि. १८/१२/२००८ च्या मध्यरात्री १२:०० वाजतापासून उपकराची वसूली बंद करुन अधिनियमाचे कलम १२७(२) (अ) नुसार पुन्हा जकात वसूली करणेत यावी.

दि. ०१/०९/२००८ ते दि. १८/१२/२००८ च्या मध्यरात्री (१२:००) पर्यंत कोणत्याही उपकर पात्र मालांवर तसेच उपकर नियम १९९६ चे नियम ३ अ किंवा ब नुसार उपकर भरणाऱ्यास पात्र व्यापाऱ्यांनी आयात केलेल्या मालांवरील उपकराची वसूली पूर्ण होईपर्यंत अधिनियमाच्या १५२ व उपकर नियम १९९६ अन्वये महानगरपालिका कारवाई चालू ठेवील.

महानगरपालिका क्षेत्रात उपकर लागू करण्यापूर्वी जकात वसूली करण्यांत येत होती. “मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२)(अ)” अन्वये जकात लागू करण्याचे अधिकार महानगरपालिका/महासभेस असून त्यासाठी शासनाच्या पूर्व मंजूरीची आवश्यकता नाही.

मागील आर्थिक वर्ष सन २००७-०८ मध्ये झालेल्या जकात उत्पन्नामध्ये १०% वाढीव रक्कम गृहीत धरुन चालू आर्थिक वर्षासाठी मागणीची रक्कम ठरविण्यांत यावी.

त्यासाठी सन २००७-०८ या वर्षाकरीता ठरविण्यांत आलेल्या जकातपात्र वस्तुचे तपशिल व त्यावर निश्चित करण्यांत आलेले जकातीचे दर कायम ठेऊन जकात वसूली करण्यांस ठरविण्यांत आलेली तारीख व वेळ या बाबत सोबत जोडलेल्या परिशिष्ट व सोबत जोडलेल्या जोडपत्रानुसार जकात नाक्याची ठिकाणे व संख्या, माल प्रवेश नाक्यापासून निर्गमित नाक्यापर्यंतचे सर्व मार्ग इत्यादी माहिती देणारी जाहिर नोटीस "महाराष्ट्र नगरपालिका (जकात) नियम १९६८ चे कलम ५(२)" अन्वये जकात लागू करण्यांत आल्याच्या ठरावाच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आंत प्रसिद्ध करण्यांत यावी.

तसेच जकात वसूलीसाठी मागील वर्ष २००७-०८ या आर्थिक वर्षातील ठेकेदाराशी वाटाघाटी करण्यांस मा. आयुक्तांना "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) व कलम ६८(१)" अन्वये अधिकार देण्यांत येत आहे. वरीलप्रमाणे मागणीची रक्कम देण्यांस ठेकेदार तयार असल्यास दि. १८/१२/२००८ च्या मध्यरात्री (रात्रौ १२:०० वा.) पासून ते दि. ३१/०३/२००९ पर्यंत ठेकेदारास जकात नाक्यांच्या ताबा देण्यांत यावा. ठेकेदार वरील रक्कम भरण्यांस तयार नसल्यास महानगरपालिकेच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांमार्फत जकात वसूली करण्यांत यावी.

वरील दोन्ही परिस्थितीमध्ये मा. आयुक्तांनी सन २००९-१० या आर्थिक वर्षातील जकात वसूलीसाठी त्वरीत निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु करुन ती दि. ३१/०३/२००९ पर्यंत पुर्ण करावी.

जकात ठेकेदाराकडुन होत असलेली वसूली, आकारण्यांत आलेले दर किंवा दंड याबाबत व्यापाऱ्यांना त्वरीत सहकार्य मिळावे हया हेतुने प्रशासनाने वर्ग-२ चे २ अधिकारी व २ कर्मचारी नियुक्त करावेत.

व्यापाऱ्यांच्या तक्रारीचे निवारण करणे, आयात मालावर ठरविलेल्या दराप्रमाणे वसूली करणे व जकात ठेकेदारावर नियंत्रण ठेवण्यासाठी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली उपमहापौर, सभागृह नेता, सभापती-स्थायी समिती, विरोधी पक्ष नेता व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, भाजपा, शिवसेना व संयुक्त लोकशाही आघाडी यांचे गटनेत्यांची समिती गठीत करण्यांत येत असून या समितीवर मिरा-भाईंदर शहरातील व्यापारी संघटनेचे २ सदस्य स्विकृत करुन घेण्याचे अधिकार या समितीस देण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | शानु गोहिल | १) रॉड्रीक्स मॉरस जोसेफ |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | उमाताई पाटील | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | नलावडे दिनेश दगडू | |
| ४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर पाटील | ५ | सुनिता कैलास पाटील | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सावळे निर्मला बाबुराव | |
| ८ | शेख आसिफ गुलाब | ८ | कुरेशी याकुब ईस्माईल | |
| ९ | गोविंद हेलन जॉर्जी | ९ | भोईर शशिकांत जगन्नाथ | |
| १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | १० | सुनिता शशिकांत भोईर | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | ठाकुर प्रकाश पांडूरंग | १२ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| १३ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १३ | शेख मुसर्रत बानु इब्राहीम | |
| १४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | १४ | जंगम लक्ष्मण गणपत | |
| १५ | शर्मा भगवती तुगनचंद | १५ | सपार उमा विश्वनाथ | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १७ | चक्रे वंदना रामदास | १७ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | |
| १८ | माळी हेमा रविंद्र | १८ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | |
| १९ | ज्योत्स्ना हसनाळे | १९ | श्रीमती.सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| २० | अनिता जयवंत पाटील | २० | शफीक अहमद सादत खान | |
| २१ | परेरा टेरी पॉल | २१ | भाटकर प्रेरणा प्रमोद | |
| २२ | मेहता नरेंद्र लालचंद | २२ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २३ | वर्षा गिरधर भानुशाली | २३ | वैती विजया हेमचंद्र | |
| २४ | भोईर राजू यशवंत | २४ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | |
| २५ | जाधव मोहन महादेव | २५ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २६ | सिंह मदन उदितनारायण | २६ | श्री.मोदी चद्रकांत भिकालाल | |
| २७ | म्हात्रे कल्पना महेश | २७ | भट दिप्ती शेखर | |
| २८ | पाटील शरद केशव | २८ | वैती चंद्रकांत सिताराम | |
| २९ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २९ | अनिल दिवाकर सावंत | |
| ३० | बाविघर सिसिलीया विजय | ३० | शेख सलिम दाउद | |
| ३१ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | ३१ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| ३२ | पांडे स्नेहा शैलेश | ३२ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| ३३ | दुबे रामनारायण सदानंद | ३३ | व्यास सुधा वासुदेव | |
| ३४ | यादव मिरादेवी रामलाल | ३४ | मिलन वसंत म्हात्रे | |
| ३५ | पाटील प्रविण मोरेश्वर | ३५ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३६ | पाटील अनंत रामचंद्र | ३६ | धनेश परशुराम पाटील | |
| ३७ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

(सही)
**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०१/२००९.

**प्रकरण क्र. ८८ :-** **दि. ०८/०८/२००८ व दि. १८/०९/२००८ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र.** ८९ :-

दि. ०८/०८/२००८ व दि. १८/०९/२००८ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** जयंत म्हात्रे पाटिल **अनुमोदन :-** भागवती शर्मा

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १६/०१/२००९**

**प्रकरण क्र. ८९ :- उल्हासनगर महानगरपालिकेच्या लिपीक सौ. मधुरा जितेंद्र केणी यांना महानगरपालिके अंतर्गत एकतर्फी बदलीने नेमणूक करणेबाबत.**

**ठराव** ८२ :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या लिपीक सौ. मधुरा जितेंद्र केणी ह्यांचा मिरा भाईंदर महानगरपालिकेत एकतर्फी बदलीने नेमणूक करण्याचा प्रस्ताव आजच्या महासभेसमोर आला आहे. कोणत्याही महानगरपालिकेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने त्या महापालिका क्षेत्रात निवास करणे आवश्यक असते अथवा त्याने तशी स्वतःच्या निवासाची व्यवस्था करणे आवश्यक असते. प्रत्येक महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कामावर नियुक्त होण्यासाठी संबंधीत स्थानिक क्षेत्रात निवासाची व्यवस्था असण्याची अट असते.

सौ. केणी ह्या मालाड येथे राहत असून उल्हासनगर महापालिकेत काम करीत आहेत. त्यांना ये-जा करण्यासाठी होणारा त्रास टाळण्यासाठी त्यांनी उल्हासनगर येथे जाऊन राहणे ऊचित ठरेल त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत एकतर्फी बदली मागणे योग्य नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेत लिपीक संवर्गाच्या काही जागा जर रिक्त असतील तर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमधून पात्र कर्मचाऱ्यांना लिपीक पदावर बढती देवून त्या भरण्यांत याव्यात. परंतु, सौ. मधुरा जितेंद्र केणी यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकतर्फी बदलीने नियुक्ती करण्यास ही महासभा विरोध करीत आहे. सौ. मधुरा केणी ह्यांना महापालिकेत नियुक्ती करण्याचा प्रस्ताव फेटाळत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :** भगवती शर्मा

**अनुमोदक :** राजेश म्हात्रे

16/1/09

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

२०७

## मा.महासभा दि.१६/०१/२००९

**प्रकरण क्र. ९० :- वेदरशेड करिता भाडे आकारणीबाबत.**

**ठराव क्र.८३ -**

मिरा भाईंदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानांसमोर / हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबंधीत अर्जदारास / मालकांस रु.२,५००/- इतके शुल्क आकारुन तात्पूरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास ६ महिन्याकरिता परवानगी देण्यात येते. सदरच्या परवानगीतील नमूद वेदरशेड खालील जागेवर वाणिज्य वापर करता येणार नाही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली आहे. तथापी असे निदर्शनात आले आहे की, वेदरशेड खालील जागेचा वापर बहुतांःशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जातो.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २२७/१(ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वगैरे तात्पुरते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. ५८-इ मध्ये तात्पूरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतूद आहे. अशी परवानगी देताना वेदरशेड खालील जागेचा मालकीहक्काचे कागदपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्र घेवून परवानगी देण्यात येते.

यापूर्वी महानगरपालिका क्षेत्राचा विचार न करता सरसकट रु.२,५००/- आकारणी करत असली तरी सदर आकारणी ही प्रथम १०.०० चौ.मी. क्षेत्रासाठी ठेवून १०.०० चौ.मी. क्षेत्राच्या वर महानगरपालिकेचा आर्थिक फायदा व्हावा म्हणून ५०.०० मी. क्षेत्रापर्यंत रु.३००/- प्रति चौ.मी. व ५०.०० चौ.मी. क्षेत्राच्या वर रु.४००/- प्रति चौ.मी. प्रति माह असे सुधारीत दर लावणे योग्य राहिल.

तसेच सदर वेदरशेड खालील जागेची ज्यावेळी महापालिकेस सार्वजनिक उपयोगासाठी आवश्यकता भासेल त्यावेळी स्वखर्चाने जागा मोकळी करुन देण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र संबंधितांकडून घेणे आवश्यक वाटते. मालकीहक्काचे कागदपत्र घेवून वरील दोन्ही अटी नमुद करुन असा वापर करणा-या सर्वांना ६ महिन्यांसाठी तात्पूरत्या स्वरुपात वेदरशेडसाठी परवानगी देण्यात यावी. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

तसेच महानगरपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळ मजला किंवा इमारतीवरील मजल्यावर, दुकानासमोर पत्राशेड टाकून किंवा हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर करित असून त्यासाठी परवानगीही घेतली जात नाही. त्यामुळे अशा वापरापासून महानगरापालिकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. अश्या प्रकारे वापर करुन संबंधित व्यवसाय धारकास त्यांच्या हॉटेल समोरील मालकीच्या जागेत रस्त्याची मार्जीन सोडून वेदरशेडसाठी उन्हाळा व पावसाळ्यासाठी परवानगी देणेस मंजूरी देत आहे. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होईल. त्यांना वरीलप्रमाणे परवानगी देणे योग्य राहिल.

वेदरशेड परवानगी ही तात्पूरत्या स्वरुपाची असेल, सदरच्या परवानगीमुळे इमारत किंवा गाळा किंवा घर इत्यादी अधिकृत होणार नाही. तसेच महानगरपालिकेस आवश्यक असेल तेव्हा सदरचे वेदरशेड काढून टाकता येईल, तसेच महानगरपालिकेच्या जागा सोडून सदरची परवानगी तात्पूरत्या स्वरुपात देण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक - श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक - श्री. राजेश म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी खालील सुचना मांडली.**

दुकानाच्या किंवा हॉटेलच्या पुढे गटारावर किंवा पदपथावर शेड वाढवून पदपथ किंवा गटर वेदरशेड खाली घेउन आपला धंदा करतात. त्यांना कोणत्याही प्रकारची वेदरशेडची परवानगी देऊ नये. अशी मी उपसुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. शशिकांत ज. भोईर यांनी खालील सुचना मांडली.**

पावसाचे पाणी टॅरेसवर साचुन स्लॅब गळती व भिंतीमधून पाणी झीरपणे अशा इमारतींवर वेदरशेड बांधण्यास परवानगी देते समयी फक्त परवानगी फी आकारणे योग्य आहे. कारण टेरेसचा वापर वाणिज्य साठी केला जात नसल्याने तसेच टॅरेसवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यात आले नाही अशा इमारतींवरील वेदरशेड घरपट्टी कर आकारणी करण्यात येऊ नये. तसेच ज्या इमारतींना (सोसायट्यांना) टॅरेसवर वेदरशेड बांधण्याची परवानगी मागितल्यास, पावसाळ्या

. अगोदर परवानगी द्यावी जेणे करुन इमारतीच्या स्लॅबमधून, भिंतीमधून पावसाचे पाणी झिरपून रहिवाश्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | पाटील उमाताई शाम | |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | सुनिता कैलास पाटील | |
| ४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | कुरेशी याकुब ईस्माईल | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | भोईर शशिकांत जगन्नाथ | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सुनिता शशिकांत भोईर | |
| ८ | शेख आसिफ गुलाब | ८ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | |
| ९ | गोविंद हेलन जॉर्जी | ९ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | १० | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | जंगम लक्ष्मण गणपत | |
| १२ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | १२ | सपार उमा विश्वनाथ | |
| १३ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १३ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | १४ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | |
| १५ | शर्मा भगवती तुगनचंद | १५ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | |
| १६ | चक्रे वंदना रामदास | १६ | श्रीमती.सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | |
| १७ | माळी हेमा रविंद्र | १७ | शफीक अहमद सादत खान | |
| १८ | हसनाळे ज्योत्स्नाजालींदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | १८ | वैती विजया हेमचंद्र | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ |
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | |
| २० | परेरा टेरी पॉल | २० | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद | २१ | श्री.मोदी चद्रकांत भिकालाल | |
| २२ | वर्षा गिरधर भानुशाली | २२ | भट दिप्ती शेखर | |
| २३ | भोईर राजू यशवंत | २३ | वैती चंद्रकांत सिताराम | |
| २४ | जाधव मोहन महादेव | २४ | अनिल दिवाकर सावंत | |
| २५ | सिंह मदन उदितनारायण | २५ | शेख सलिम दाउद | |
| २६ | म्हात्रे कल्पना महेश | २६ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २७ | पाटील शरद केशव | २७ | श्री. गणेश गोपाळ शेट्टी | |
| २८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २८ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| २९ | बाविघर सिसिलीया विजय | २९ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३१ | पांडे स्नेहा शैलेश | | | |
| ३२ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३३ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३४ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३५ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३६ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३७ | श्रीम. गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३८ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०१/२००९

**प्रकरण क्र. ९१ :- नगरसेवकांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

**ठराव क्र. ८४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका नगरसेवकांना सध्या मानधन रु. ४,०००/- प्रति महिना देण्यात येत आहे जे अत्यंत अपूरे आहे. नगरसेवकांचे मानधन वाढविण्यांत यावे अशी तोंडी मागणी बऱ्याच नगरसेवकांनी महापालिकेकडे केलेली आहे.

नगरसेवकांना महापालिका कामकाजासाठी वारंवार महानगरपालिका मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) तसेच संबंधीत प्रभाग कार्यालय येथे जावे लागत असते. त्याचप्रमाणे काही वेळा तक्रारदारांस स्वखर्चाने मुख्यालयात वारंवार घेउन यावे जागत असते ज्यामुळे त्यांचा स्वतःचा खर्च होत असतो. सबब नगरसेवकांना मिळणारे मानधन हे अपुरे पडत आहे.

नुकतेच मुंबई महानगरपालिकेने देखील त्यांच्या नगरसेवकांच्या मानधनामध्ये रु. ४,०००/- ऐवजी रु. १०,०००/- इतकी वाढ केलेली आहे.

त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगरसेवकांना दरमहा रु. १०,०००/- इतके मानधन व रु. ४००/- प्रती बैठक भत्ता अदा करण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/०१/२००९



**प्रकरण क्र. ९२ :-** सिटी सर्व्हे कामाचा आढावा घेणे.

**ठराव क्र. ८५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १९ गावांचे नगर भूमापन करणे कामी मा. महासभा दि. १८/०९/२००३ रोजी ठराव क्र. २७अ नुसार खाजगी संस्थेमार्फत कार्यवाही सुरु करणेत आली होती. दि. १६/०९/२००६ रोजीच्या जाहिरातीप्रमाणे निविदा प्रसिध्द करुन मे. राणे मॅनेजमेंट प्रा.लि. यांच्यासह मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड कॉन्ट्र. प्रा.लि. व मे. पी.एन. शिदोरे ॲन्ड कं. यांच्या निविदापैकी मे. राणे मॅनेजमेंट प्रा.लि. यांच्या कमी दराच्या निविदा प्रमाणे प्रत्यक्ष भूमापन कामास सुरुवात करुन आवश्यक ती मोजमापे, सविस्तर टिपणे गटबुके इत्यादी तालुका, निरीक्षक भूमि अभिलेख ठाणे यांचेकडे पाठविले आहे.

त्यांचे काम प्रगतीपथावर असून समाधानकारक आहे. त्यांचे कामाची मुदत संपली असून त्यांस त्यांचे काम पूर्ण करणेकामी त्यांस एक वर्षाची मुदतवाढ देणेचा प्रस्ताव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

२०५

## मा. महासभा दि. १६/०१/२००९

प्रकरण क्र. ९३ :- बी.ओ.टी. (**B.O.T.**) बेसीसवर दिलेल्या टाउन पार्क कामाचा आढावा घेणे.

(बी.ओ.टी. (**B.O.T.**) बेसीसवर दिलेल्या टाउन पार्क कामाचा आढावा सभागृहामध्ये घेण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००९

**प्रकरण क्र. ९४ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २, नियम २५(५) अन्वये परिवहन समितीवरुन निवृत्त होणाऱ्या निम्मे ६ (सहा) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २, नियम २५(७) अन्वये नविन ६ (सहा) सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

निवृत्त होणाऱ्या सन्मा. सदस्यांची नावे खालीलप्रमाणे.

१) श्री. उस्मान हुसेन नुरले
२) श्री. शांताराम काशिनाथ ठाकूर
३) श्री. विद्याधर गोपिनाथ रेवणकर
४) श्री. विल्यम मनवेल मुनिस
५) श्री. सुरेश मारोतराव येवले
६) श्री. रथीनकुमार दत्ता

**ठराव क्र. ८६ :-**

महानगरपालिका परिवहन समितीवरुन निम्मे ६ (सहा) सदस्य निवृत्त होत आहेत. निवृत होणाऱ्या सदस्यांची जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणे करीता अवलंबवायच्या पद्धतीबाबत शासनाकडे सचिव विभागाकडून पत्र क्र. मनपा/सचिव/१६२/२००८-०९, दि. २२/०१/२००९ अन्वये मार्गदर्शन मागविले होते. सदर मार्गदर्शन अजूनपर्यंत महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही. तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांचे विरुद्ध श्री. दिलीप म्हात्रे व इतर यांनी मा. उच्च न्यायालयात ५१७५ /२००७ अन्वये दावा दाखल केलेला होता. सदर दाव्यात मा. उच्च न्यायालयाने कलम २५ व कलम ३१ (अ) बाबत निर्णय दिलेला आहे. तो असा, जर नगरसेवकां व्यतिरिक्त अन्य उमेदवारांनी नामनिर्देशन दाखल केलेले असेल तर त्या करीता कलम २५ नुसार नेमणूकीची कार्यवाही करावी. जर नगरसेवकांनी नामनिर्देशन दाखल केलेले असेल तर अशा वेळी कलम ३१ (अ) नुसार तौलानिक पद्धत विचारात घेवून सदस्य नेमणूक करण्यात यावी असा निर्णय दिलेला आहे. अशा परिस्थीतीत घाईगर्दीत निर्णय घेतल्यास चुकीचा होईल. सचिवांनी मागविलेले मार्गदर्शनाबाबत नगरविकास विभागाने शासनाच्या विधी विभागाकडुन अभिप्राय मागविले आहेत. अभिप्राय प्राप्त झालेनंतर नगरविकास विभागाकडून महानगरपालिकेस मार्गदर्शन प्राप्त होणार आहे. तरी शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झालेवर अंतीम निर्णय घेणे योग्य होईल. मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत सदरचे प्रकरण तहकुब ठेवावे असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**.मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

२०६

## मा. महासभा दि. २०/०२/२००९

**प्रकरण क्र. ९५ :-** **चित्रपटगृह, नाटक, तमाशा, सर्कस यावरचे थिएटर कर नियमांस मंजूरी मिळणे बाबत.**

**ठराव क्र. ८७ :-**

महानगरपालिकेत सध्या चित्रपटगृहे, नाटक, सिनेमा, सर्कस इ. वर नगरपालिका काळापासून निश्चित खेळास प्रती खेळास रु. १५/- प्रमाणे शो टॅक्स वसूल करीत आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सध्या असलेल्या दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे **"मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९(१) १२७ पोटकलम २ खंड (३) कलम ४५७ खंड ७ उपखंड (अ)"** मध्ये असलेल्या तरतुदीनुसार तयार केलेल्या "मिरा-भाईंदर महानगरपालिका थिएटर कर नियम २००७" च्या प्रारुप मसुद्यास मा. महासभा ठराव ७ दि. १०/०४/२००८ ने मंजूरी दिली आहे. अधिनियमाच्या तरतुदीनुसार प्रारुप मसुद्यास नागरीकांच्या हरकती व सुचना मागविण्याच्या दृष्टीने दै. लोकमत दि. १५/०८/२००८ व महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १८/०८/२००८ रोजी प्रसिद्धी देण्यांत आली होती. मुदतीमध्ये एकही हरकती/ सुचना प्राप्त झाली नाही.

अशा प्रकारे तयार केलेल्या "मिरा-भाईंदर महानगरपालिका थिएटर नियम २००७" च्या नियमावलीस हि सभा मंजूरी देत आहे. पुढील मंजूरीसाठी प्रस्ताव शासनाकडे लवकरात लवकर पाठविण्यांत यावा.

सुचक :- (भगवती शर्मा)

अनुमोदक :- (मिलन पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

8 Maha 2009

२०७

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.२०/०२/२००९

**प्रकरण क्र. ८८- मा. जिल्हा नियोजन व विकास समिती, जिल्हा ठाणे यांचेकडील ठरावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भविष्यात घोषित होणा-या झोपडपट्यांना धारावी पॅटर्न लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणे बाबत.**

**ठराव क्र. ८८- ८८**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि.१४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

मा.ना.श्री. गणेशजी नाईक, जिल्हा नियोजन समिती अध्यक्ष तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली दि.२९/०८/२००८ रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक झालेली होती. सदर बैठकीत जिल्हा नियोजन समिती, ठाणे यांनी सभेतील अनुक्रमांक ४३ नुसार "मुंबईतील झोपडपट्टीतील लोकांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका एफ.एस.आय. वाढवून देण्याची असेल तर तो धारावी पॅटर्न ठाणे जिल्ह्यासाठी ही लागू करावा" असा ठराव पारित केला असून सर्व महानगरपालिकांनी तशा आशयाचा प्रस्ताव शासनास पाठवावा असे सुचविले आहे."

मुंबईतील धारावी झोपडपट्टीतील लोकांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने शासनाने एफ.एस.आय. वाढवून देवून पुर्नःविकास करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्याच धर्तीवरील "धारावी पॅटर्न" (Dharavi Model) बाबतचे नियम, शर्ती, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रास देखील लागू कराव्यात व तसे बदल मिरा भाईंदर विकास नियंत्रण नियमावलीत करण्याची शासनाने परवानगी द्यावी, असा प्रस्ताव शासनास पाठविण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक -** [signature] गजानन भोईर

**अनुमोदक -** [signature] राजेश म्हात्रे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

[signature]

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सुचना

सन १९९० पूर्वीच्या ज्या झोपडी आहेत त्यांना

ही तरतूद लागू करावी

[signature]

10 Maha 2009

208

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.२०/०२/२००९

**प्रकरण क्र.८७ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेसाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) रेंटल हाऊसिंग योजनेच्या धरतीवर D.C.Rule मध्ये बदल करण्यास्तव प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत.**

**ठराव क्र.८९**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि.१४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

सदर मंजूर विकास योजनेमधील जागांवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) च्या माध्यमातून गरजूंना भाडेतत्वावर घरे उपलब्ध करुन देणेसाठीच्या गृहयोजनेबाबत शासनाने (पत्र क्र. टीपीएस-१२०८/एमएमआर/सीआर-३९३/०८/युडी-१२, दि.२१/०८/२००८) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत. शासनाच्या निर्देशाची व नियमावलीची छायाप्रत सोबत सादर.

महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी सेवेत असतांना सेवा निवासस्थाने बांधण्याचा तसेच सेवानिवृत्तीनंतर २५ वर्षे सेवा झाली असल्यास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत दि.२२/१०/२००८ च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी MMRDA च्या भाडेतत्वावरील घर देणेच्या शासन निर्देश दि.२१/०८/२००८ च्या धरतीवर सफाई कामगारांसाठी मोफत सदनिका देणेसाठी सदर निर्देशातील परिशिष्ठ "अ" मध्ये नमुद नियमावली, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शासनास सादर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मिरा भाईंदर शहराकरिता आवश्यक आहे तेथे बदल अंतर्भूत करणे आवश्यक आहे. त्यासाठी तसे बदल करणेची शासनाने परवानगी द्यावी, असा प्रस्ताव शासनास पाठविण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक** - [signature] मिलन पाटिल

**अनुमोदक** - [signature] भगवती शर्मा

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना या मध्ये [illegible] (PTO)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००९

प्रकरण क्र. ९८ :- रस्ता रुंदीकरणाबाबत विचार विनीमय करणे.

(सदरचा विषय मा. महापौरांच्या आदेशाने पुढच्या सभेत घेण्याचे ठरले.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००९

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सन १९४९ चा मुंबई ५९) प्रकरण २ महानगरपालिका, स्थायी समिती, प्रभाग समिती इत्यादींचे कामकाज क्रमांक बी.एन.सी.एम.जी./जीएडी/२५, दिनांक १६ फेब्रुवारी २००२.
नियम क्र. २ (१) (के) अन्वये

**प्रस्ताव / विषय :- मिरा भाईंदर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स वेलफेअर असोसिएशनच्या निवेदना नुसार बांधकाम प्रारंभपत्र देण्यापुर्वी बीनशेती परवानगी किंवा इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला सादर करण्याचे निर्बंध काढून टाकणेबाबत.**

ठराव क्र.९१ :-

सन १९८५ साली महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये मिरा भाईंदर नगरपरिषदेची स्थापना झाली.

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर नगरपरिषद हे स्थानिक प्राधिकरण असून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ तसेच महाराष्ट्र नगर परिषद, पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या तरतुदी तत्कालिन मिरा भाईंदर नगरपरिषदेस लागू झाल्या. महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदी नुसार प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाने त्यांच्या हद्दीपुरता विकास आराखडा तयार करणे बंधनकारक आहे. अशा विकास आराखड्यामध्ये स्थानिक प्राधिकरण त्यांच्या हद्दीतील जमिनी वेगवेगळ्या उद्देशाकरिता वर्ग करू शकतात. विकास आराखडा बनविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे तिच्या हद्दीतील जमिनिचा विकास सुनियोजित व योग्य पद्धतीने व्हावा.

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६, तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या तरतुदीनुसार तत्कालिन मिरा भाईंदर नगरपरिषदेने महाराष्ट्र शासनाकडून मिरा भाईंदर शहरासाठी उक्त अधिनियम १९६६ नुसार विकास आराखडा मंजुर करून घेतला. त्याचप्रमाणे या शहरापुरती विकास नियंत्रण नियमावली सुद्धा मंजुर करून घेतली. सदर नियमावली व मुंबई महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली यामध्ये साम्य आहे. सदर विकास नियंत्रण नियमावली मिरा भाईंदर नगरपरिषद हद्दीतील सर्व विकास कामे व बांधकामे यांना लागु झालेली आहे.

दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४९३ अन्वये तत्कालीन नगर परिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर करण्यात आले. सदर विकास नियंत्रण नियमावलीत कोणतेही बदल न करता, जशीच्या तशी महानगरपालिकेने ती स्विकारली व तीच्या तरतुदी लागु ठेवल्या. अशा पद्धतीने कोणतीही बांधकाम परवानगी देताना महानगरपालिका, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, आणि विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींचा वापर करते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५३, २५४ (प्रकरण क्रमांक १५) नुसार बांधकाम नियमन तयार केले आहे. महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४,४५,४६ आणि ४८ नुसार बांधकाम परवानगी देण्याची कार्यवाही प्रस्तुत केली आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावलीच्या नियमन क्रमांक ५ आणि ६ नुसार प्रारंभपत्र देण्याची कार्यवाही प्रस्तुत केली आहे.

कोणतीही बांधकाम परवानगी देताना वरील अधिनियम व नियमावलीतील तरतुदींचा वापर करणे मिरा भाईंदर महानगरपालिकेवर बंधनकारक आहे.

वरील अधिनियमातील तरतुदी विचारात घेता. महानगरपालिका हद्दीतील बांधकाम करण्यायोग्य जमिनीवर बांधकाम परवानगी / बांधकाम प्रारंभपत्र देताना बीनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला (आवश्यक असल्यास) घेण्याची कोणतीही अट टाकण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र जमिन महसुल संहितेच्या कलम ४४ व ४४ अ नुसार बिनशेती परवानगी देण्याच्या तरतुदी निव्वळ महाराष्ट्र राज्य शासनाच्या महसुल वसुलीची व्यवस्था आहे. त्यामुळे बांधकाम परवानगी देताना बीनशेती परवानगी असणे हे कायदेशिररित्या उचित नाही. त्यामुळेच कायदेमंडळाने उक्त

नियमामध्ये स्थानिक प्राधिकरणाने बांधकाम परवानगी देताना बीनशेती परवानगी घेणे कोठेही सक्तीचे केले नाही.

इतकेच नव्हे तर बीनशेती परवानगी न घेता केलेले कोणतेही बांधकाम नियामानुकुल करण्याची कायदेशीर तरतुद महाराष्ट्र जमिन महसुल संहितेच्या कलम ४७ अ मध्ये केलेली आहे. सदर तरतुद लक्षात घेता महानगरपालिका हद्दीतील बांधकाम प्रस्तावांना मंजुरी देताना स्थानिम प्राधिकरणाने म्हणजेच महानगरपालिकेने बीनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला घेतल्या शिवाय बांधकाम प्रारंभपत्र देता येणार नाही अशी अट घालणे बेकायदेशिर आहे. त्याशिवाय ते महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व मिरा भाईंदर शहराच्या विकासनियंत्रण नियमावलीच्या तरतुदीच्या विरोधात आहे.

उक्त अधिनियमातील व तरतुदी नुसार बांधकाम परवानगी देताना बीनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला आवश्यक आहे किंवा प्रारंभ पत्र देण्याअगोदर बीनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला (आवश्यक असल्यास) घ्यावा अशी कोणतीही तरतुद केलेली नाही. त्यामुळे बीनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला असल्याशिवाय प्रारंभपत्र देण्यात येणार नाही ही महानगरपालिनकेची भुमिका बेकायदेशिर आहे.

मिरा भाईंदर शहरासाठी मंजुर विकास नियमावलीच्या नियमन क्रमांक ५ व ६ त्यातील पुरवणी प्रपत्र IX (नियमन (५), (५), (८) नुसार बांधकाम परवानगी व प्रारंभ पत्र देण्याच्या तरतुदी व नमुना विनिर्दिष्ट करण्यात आला आहे. त्यामध्ये बिनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला घेण्याची कोणतीही अट नमुद करण्यात आलेली नाही.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १९८८ व मुंबई शहरासाठी तयार करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार मुंबई हद्दीत बांधकाम प्रस्तावावर मंजुरी देताना बांधकाम प्रारंभपत्र देण्यापुर्वी विकासकाने बिनशेती परवानगी घ्यावी अशी कोणतीही अट घातलेली नाही. त्यामुळे तेथिल कार्यपद्धतीनुसार भोगवटा दाखला देण्यापुर्वी विकासक बिनशेती परवानगी मिळवितात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास नियंत्रण मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या सारखीच आहे.

मिरा भाईंदर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स वेलफेअर असो. तर्फे बांधकाम प्रस्ताव मंजुरीबाबत त्यांना येत असलेल्या समस्यांबाबतचे निवेदन मा. महापौर सो. व मा. आयुक्त सो. यांना सादर केले आहे.

निवेदनात नमुद केल्याप्रामाणे बांधकाम प्रारंभपत्र देण्यापुर्वी तसेच त्यांना मिळालेल्या विकास हक्क हस्तांतरण (T.D.R) / विकास हक्क प्रमाणपत्र (D.R.C) खाली मिळालेल्या चटई क्षेत्र निर्देशकांचे भाररोपण (Loading) करण्यापुर्वी विकासकाने बिनशेती परवानगी व इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला (आवश्यक असल्यास) सादर करावा ही अट महानगरपालिकेने काढून टाकावी व इतर काही मुद्दयांचा समावेश आहे.

विकासकाकडून मिळणाऱ्या विकास आकाराची वसूली लक्षात घेता सन २००६-०७ मध्ये रू. १३.७१ कोटी, सन २००७-०८ मध्ये रू. १६.६० कोटी इतकी रक्कम विकास आकारापोटी मिळाली आहे. तर चालू वर्षात ती रू. २०.०० कोटी मिळणे अपेक्षित होते परंतु आतापर्यंत सदर आकार फक्त (१० महिने) रू. ७.७० कोटी एवढीच वसुली झाली आहे.

वरील प्रमाणे विकास आकार वसूलीतील ५०% पेक्षा जास्त तुट लक्षात घेता त्याचे कारण जागतिक मंदी असली तरीही प्रत्यक्षात सदर तुट बिनशेती परवाना / इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपीनी कडील ना-हरकत दाखला सादर केल्यानंतर महानगरपालिका बांधकाम प्रारंभपत्र देईल या अटी मुळे आहे.

विकास आकार हा महानगरपालिकेच्या उत्पन्नांच्या प्रमुख स्त्रोतापैकी असल्याने त्याचा विकास कामांवर परिणामकारक प्रभाव पडत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका कोणत्याही बांधकाम प्रस्तावांना परवानगी देण्यापुर्वी सदर बांधकाम ज्या जमिनीवर करावायचे आहे. त्या जमिनीची बीनशेती परवानगी / इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला (आवश्यक असल्यास) घेण्यासाठी विकासकाला ना-हरकत दाखला देते व बांधकामाचे बांधकाम नकाशे मंजुर करते. तसेच बांधकाम प्रारंभ पत्र देण्यापुर्वी बिनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला घेण्यात यावी अशी अट घालते. वरील अटी घालण्याची तरतुद उक्त अधिनियमामध्ये व विकास नियंत्रण नियमावलीमध्ये कोठेही नमुद करण्यात आलेले नाही. याउलट महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व उपकलम ६ नुसार महानगरपालिकेने प्रारंभ पत्र दिल्याच्या दिनांकापासुन १ महिन्याच्या आत मंजुर नकाशाच्या व प्रारंभ पत्राच्या सत्यप्रति संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्याचे बंधनकारक केले आहे.

यापुढे महानगरपालिकेने कोणत्याही बांधकाम प्रस्तावावर बीनशेती परवानगी व इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला (आवश्यक असल्यास) घेण्याची प्रथा बेकायदेशीर असल्याकारणाने बंद करावी. व बांधकाम प्रस्तवांना मंजुरी देताना बांधकाम नकाशे मंजुर करून त्यासोबत प्रारंभपत्र देण्यात यावे. तसेच वरीलप्रमाणे त्याच्या सत्यप्रती मुंबई प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ व उपकलम ६ नुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवाव्यात.

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ तसेच मिरा भाईंदर शहराची मंजूर विकास नियंत्रण नियमावली नुसार बांधकाम प्रस्तावांना मंजुरी देते वेळेस बेकायदेशीर रित्या बिनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला (आवश्यक असल्यास) मागण्याची अलिखित व अवैधानिक अट काढून टाकण्यात यावी.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २००६ साली प्रारूप विकास नियंत्रण नियमावली तयार केली असून त्यामध्ये सुद्धा बिनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला दिल्यानंतरच प्रारंभ पत्र देण्यात यावे अशी कोणतीही तरतुद केलेली नाही. तथापि सदर नियमावली राज्य शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे.

यापुढे मिरा भाईंदर महानगरपालिकेने बांधकाम प्रस्तावांना मंजुरी देताना बीनशेती परवागनीसाठी ना हरकत दाखला देण्याऐवजी वरील अधिनियम व नियमावलीच्या तरतुदीनुसार थेट बांधकाम प्रारंभ पत्र द्यावे. भोगवटा दाखला देण्यापुर्वी विकासकाने बीनशेती परवानगी / इस्टेट इनव्हेस्टमेंट कंपनीचा ना हरकत दाखला (आवश्यक असल्यास) सादर करावा अशी अट नव्याने प्रारंभ पत्रात नमुद करावी. असा ठराव मांडत आहे.

सचिवांनी ठरावाचे वाचन करून ठराव कायम करण्यात यावा.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी.**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | पाटील उमाताई शाम | १ | सिंह मदन उदितनारायण | निरंक |
| २ | वेतोस्कर राजेश शंकर | २ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ३ | सुनिता कैलास पाटील | ३ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ४ | पाटील प्रभात प्रकाश | ४ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ५ | कुरेशी याकुब ईस्माईल | ५ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ६ | भोईर शशिकांत जगन्नाथ | ६ | दुबे रामनारायण सदानंद | |
| ७ | सुनिता शशिकांत भोईर | ७ | यादव मिरादेवी रामलाल | |
| ८ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | | | |
| ९ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | | |
| १० | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | | | |
| ११ | जंगम लक्ष्मण गणपत | | | |
| १२ | सपार उमा विश्वनाथ | | | |
| १३ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | | | |
| १४ | श्रीमती.पुजारी कांचन शेखर | | | |
| १५ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | | | |
| १६ | शेख नुर मोहम्मद अेहमद | | | |
| १७ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १८ | भाटकर प्रेरणा प्रमोद | | | |
| १९ | मर्लिन मर्विन डिसा | | | |
| २० | वैती विजया हेमचंद्र | | | |
| २१ | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | | | |
| २२ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | | |
| २३ | वैती चंद्रकांत सिताराम | | | |
| २४ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २५ | गणेश गोपाळ शेट्टी | | | |
| २६ | व्यास सुधा वासुदेव | | | |
| २७ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| २८ | मिलन वसंत म्हात्रे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३० | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३१ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३२ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३३ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३४ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३५ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ३६ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | | | |
| ३७ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३८ | ठाकूर प्रकाश पांडूरंग | | | |
| ३९ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ४० | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४१ | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४२ | चक्रे वंदना रामदास | | | |
| ४३ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४४ | अनिता जयवंत पाटील | | | |
| ४५ | परेरा टेरी पॉल | | | |
| ४६ | मेहता नरेंद्र लालचंद | | | |
| ४७ | वर्षा गिरधर भानुशाली | | | |
| ४८ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४९ | जाधव मोहन महादेव | | | |
| ५० | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ५१ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |

ठराव बहूमताने मंजुर.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००९

**दुःखवटा ठराव ९२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संयुक्त लोकशाही आघाडीचे कॉंग्रेसचे नगरसेवक चंद्रकांत म्हात्रे यांच्या आईचे वृद्धापकाळामुळे निधन झाले आहे. त्यांच्याकरिता शोकसंदेश आहे. तसेच, शहर अभियंता शिवाजीराव बारकुंड यांच्या भगिनी यांचे सुद्धा अल्पशा आजाराने निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २४/०२/२००९

215

**ठराव क्र. ८३:-**

दि. २३ फेब्रुवारी २००९ हा भारताच्या दृष्टीने ऐतिहासिक दिवस ठरला असून मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवरील स्लमडॉग मिलिनियर्स ह्या चित्रपटास सर्वोत्कृष्ट चित्रपटासह तब्बल आठ पुरस्कार पटकावले आहेत. त्यापैकी दोन पुरस्कार या चित्रपटाचे संगितकार ए.आर. रहमान यांना मिळाले आहेत. स्लमडॉग मिलिनिअर्सला मिळालेल्या आठ पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन, सर्वोत्कृष्ट गीतरचना, सर्वोत्कृष्ट संगित, सर्वोत्कृष्ट साउंड मिक्सींग, सर्वोत्कृष्ट संकलन, सर्वोत्कृष्ट पटकथा या साठीच्या पुरस्काराचा समावेश आहे. या चित्रपटात छोटा जमालची भूमिका साकारणारा आठ वर्षाचा बालकलाकार कु. आयुष खेडेकर हा मिरा भाईंदरचा रहिवासी असून तो जेसलपार्क मध्ये लक्ष्मीनाराण इमारतीत राहतो. करोडो भारतीयांच्या स्वप्नांची पूर्ती स्लमडॉगने केली आहे. या देशाचे तसेच या शहराचे नाव उज्वल केल्याबद्दल मी मिरा भाईंदरच्या सर्व नागरीकांतर्फे, सभागृहातर्फे तसेच माझ्या बीजेपी पक्षातर्फे गीतकार गुलजार, संगीतकार ए.आर. रहमान, रसुल पुकुट्टी तसेच या चित्रपटातील बाल कलाकार कु. आयुष खेडेकर यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. कु. आयुष खेडेकर यांचा महानगरपालिकेतर्फे यथोचीत जाहिर सत्कार करुन त्यांना रु. १ लाख इतकी रक्कम देउन त्यांचा सन्मान करण्यात यावा.

**सुचक :- सौ. कल्पना महेश पाटील** **अनुमोदन :- सौ. सिसीलीया बावीघर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २४/२/२००९

**प्रकरण क्र. ९९** मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारित व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ९४

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००८/२००९ चे सुधारित व सन २००९/२०१० च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरण पत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र. १०९ दि. ३/२/२००९ विचारात घेउन सविस्तर चर्चा करून मा. सदस्याचे सूचनेनुसार शासनाकडून मिळालेले रस्ता अनुदान, मे. रियालयन्स, महानगर गॅस, एमटीएनएल, रिलायन्स एनर्जी यांचेकडून रस्ता नुकसान भरपाई पोटी मिळालेली रक्कम रस्ते दुरूस्ती देखभाल यासाठी वाढीव खर्च या सूचनेसह व आवश्यक त्या दुरूस्तीसह सन २००८-०९ चे सुधारित व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. सुधारित व मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे .

## सन २००८-०९ चे सुधारित अंदाज व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक (आकडे लाखात)

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+ "वृक्षप्राधिकरण"+ "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" एकूण जमा | 42381.89 | 52256.57 |
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+ "वृक्षप्राधिकरण"+ "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" एकूण खर्च | 39096.75 | 52251.07 |
| अखेरची शिल्लक | 3285.14 | 5.50 |

सूचक - जयंत पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

अनुमोदक - श्री. नरेन्द्र एल. मेहता, गट नेता

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २४/२/२००९

प्रकरण क्र १०० मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००८/२००९ चे सुधारीत व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकासमान्यता देणेबाबत.

## ठराव क्र. ९५

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००८/२००९ सुधारित व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ११० दि. ३/२/०९ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००८/२००९ चे सुधारीत व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे आकडे लाखांत

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाजे) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1039.60 | 1326.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 105.60 | 225.00 |
| एकूण खर्च | 1144.60 | 1551.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

सूचक :- श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे

अनुमोदक :- भगवती शर्मा

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २४/२/२००९

प्रकरण क्र._ १०७ मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००८/२००९ चे सुधारीत व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

## ठराव क्र. ९९

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००८/२००९ सुधारित व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. ३/२/०९ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००८/०९ चे सुधारीत व सन २००९/१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

(आकडे लाखांत)

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 195.50 | 190.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 106.00 | 137.00 |
| एकूण खर्च | 300.50 | 326.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सूचक :- मिलन पाटील

**सही/-**

**महापौर**

मिरा भाईंदर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. ...

218

# मिरा-भाईदर महानगरपालिका

२१९

## मा. महासभा दि. २४/०२/२००९

**ठराव क्रमांक** ( ८७ )

सन २००९-२०१० या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीमधून कामे करुन घेण्याकरीता वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.

**सूचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. धुव्रकिशोर पाटील**

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

**पिठासन अधिकारी**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

२२०

## मा. महासभा दि. २४/०२/२००९

**ठराव क्रमांक ( ९८ )**

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या भुमिगत गटार योजनेच्या निविदेस मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२००९ ठराव क्र. ११६ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर मंजूर निविदा नूसार सदर योजनेस रु. ४९१,९८,५२,५०९/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर योजनेच्या सदर सुधारीत खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सदर योजनेकरीता घेण्यात येणा-या कर्जाच्या परत फेडीकरीता रु. ३,००,००,०००/- एवढी रक्कम दर महीन्यास ठेवण्यात यावी.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. धुव्रकिशोर पाटील**

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात **झाला**

**पिठासन अधिकारी**

08-09/DKV/DK/ T/ 26

# मिरा-भाईंदर महानरगपालिका

221

## मा. महासभा दि. २४/०२/२००९

ठराव क्रमांक :- ( ९९ )

लोवसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता असल्याने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९ – २०१० या वर्षाच्या अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार पावसाळयापूर्वी करावयाच्या नाले सफाई व खोदाई कामाकरीता तसेच आर.सी.सी. पाईप पुरवठा करून टाकणे कामाकरीता दरवर्षाप्रमाणे निविदा मागवून पावसाळयापूर्वी कामे करून घेण्यास व अपेक्षित रू. १.८० कोटी खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री. चंद्रकांत वैती | अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

पिठासन अधिकारी